
देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, चंदवारो, फग्गुणो मासो, सोमवार, फाल्गुन माहे.

१ एप्रिल १८८९, रोजी क्रांतीबा महात्मा ज्योतिबा फुले यांनी, "सार्वजनिक सत्यधर्म" या ग्रंथाची प्रस्तावना लिहिली.

१ एप्रिल १९२१, रोजी मुंबई कायदेमंडळाची पहिली बैठक संपन्न झाली.

१ एप्रिल १९३२, रोजी "झाडूवाल्यांच्या जागेवर ब्राम्हणांची भरती करावी." असा ठराव कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी मांडला.

१ एप्रिल १९३५, रोजी "रिझर्व्ह बँक स्थापना दिवस" "नवे आर्थिक वर्ष" विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' या ग्रंथाचा आधार घेऊन १ एप्रिल १९३५ साली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली.

१ एप्रिल १९३८, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील डेव्हिड मिल चाळ मैदानात जाहीर सभेत अध्यक्षीय भाषण.

१ एप्रिल १९७७, रोजी धर्मनिरपेक्ष, समाजवादी, एकात्मता हे शब्द राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत समाविष्ट करण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

आरबीआय बँक : या बँकेचे नेमके काम काय?

रिझर्व्ह बँकेला बँकांची बँक असं म्हंटलं जाते. या बँकेच्या स्थापनेची आणि कामकाजाची मूलभूत माहिती असणे आवश्यक आहे. आरबीआय नक्की काय काम करते? हे अनेक जणांना माहिती नसेल, तर सोप्या भाषेत या बँकेच्या कमकाजाबद्दल जाणून घ्या.

स्थापना : १ एप्रिल १९३५ रोजी ब्रिटिश सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट अंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. तर १९४९ ला आरबीआयलां राष्ट्रीय बँक म्हणून घोषित करण्यात आले.

आरबीआयची कार्यपद्धती : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया भारताची आर्थिक दिशा निर्देशित करायचे काम करीत असते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातदेखील आरबीआयचा मोठा वाटा आहे.

भारताचा आर्थिक घटक म्हणजेच अर्थव्यवस्था, महागाई, चलनदर अशा गोष्टी नियंत्रणात ठेवण्यासाठी आरबीआयला अनेक निर्णय घ्यावे लागतात.

आर्थिक संस्थांवर अंकुश : आरबीआय स्वतंत्र आर्थिक संस्था आणि बँकांवर मार्गदर्शक सूचनांच्या आधारे नियंत्रण ठेवते. या संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरबीआयने, बोर्ड ऑफ फायणांशियल सुपरविजन म्हणजेच बीएफएस अशा नावाची एक कमिटी तयार केलेली आहे. ही कमिटी स्वतंत्र वित्तीय संस्थांच्या आर्थिक वाटचालीला निर्देशित करते आणि या संस्था मार्गदर्शक सूचनांनुसार काम करीत आहेत की नाही याकडे लक्ष देते.

या कमिटीची स्थापना १९९४ मध्ये करण्यात आली. या कमिटीच्या अंतर्गत सर्व प्रकारच्या बँक, नॉन बँकिंग वित्तीय कंपनी आणि त्यासोबतच सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था काम करतात.

बीएफएस कमिटीमध्ये एकूण चार सदस्य काम करतात, या चारही सदस्यांचा कार्यकाळ प्रत्येकी दोन वर्षांचा असतो. आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर या कमिटीचे सदस्य म्हणून काम पाहतात. प्रत्येक महिन्यातून एकदा बीएफएस कमिटीची बैठक होते. या बैठकीत महिनाभराच्या कामकाजाचा आढावा घेतला जातो आणि वित्तीय संस्थांना जर काही अडचणी असतील, तर त्या सोडविण्याच्या दृष्टीने देखील काम केले जाते.

वित्तीय संरचनेवरील नियंत्रण : आरबीआय मुख्यतः वित्तीय संस्थांच्या कर्यपद्धतीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते. थोडक्यात बँकिंग क्षेत्रामध्ये सर्व व्यवहार सुरळीतपणे पार पडावेत याकडे लक्ष देण्याचं काम आरबीआय करते. आर्थिक गोष्टींमध्ये कुठलाही अडथळा न येऊ देता अविरतपणे काम सुरू राहावे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

या सर्व कार्यप्रणालीमध्ये कुठलीही अडचण किंवा अडथळा निर्माण झाला, तर त्यासाठी देखील आरबीआय तर्फे banking ombudsman सारखी तक्रार दाखल करण्याची यंत्रणा नेमण्यात आली आहे. त्यासोबतच अनेक मार्गदर्शक सूचना देखील आरबीआय वेळोवेळी या वित्तीय संस्थांना करत असते. कुठल्याही आपातकालीन परिस्थितीत बँक आरबीआयकडे मदतीसाठी जाऊ शकते.

चलन नियंत्रण : आरबीआयला नवीन चलन छापायचे अधिकार आहेत. आपल्या भारतीय चलनावर आरबीआयच्या गव्हर्नरची स्वाक्षरी असते. आरबीआय गरजेनुसार चलन तयार करते त्याचसोबत आवश्यकतेनुसार चलन नष्ट देखील करते. यामागील मुख्य उद्देश एवढाच आहे की बाजारातील चलनाचे महत्त्व कायम तर राहायला हवेच, पण त्यासोबतच पतप्रणालीला देखील कुठलाही अपाय होऊ नये.

देशामध्ये महागाई निर्माण न होता आर्थिक विकास करण्याचं आव्हान देखील आरबीआय समोर असते. याचबरोबर आरबीआय देशातील अनेक प्रकारचे रिझर्व देखील नियंत्रणात ठेवते. उदाहरणार्थ फॉरेन करंसी रिझर्व.

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, कुंजवारो, फग्गुणो मासो, मंगळवार, फाल्गुन माहे.

२ एप्रिल १८९४, रोजी शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारली.

२ एप्रिल १९३३, रोजी अखिल भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळाच्या ठाणे येथील मुंबई–ठाणे रोडवरील नामदार आगाखान यांच्या प्रशस्त बंगल्यात असलेल्या दलित विद्यार्थी आश्रमाची तपासणी करण्यासाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर हे मुद्दाम आले होते.

*२ एप्रिल १९३९, रोजी मुंबईतील विलेपार्ले येथील लोकशाही स्वराज्य पक्षातर्फे आयोजित कार्यक्रमात, मुंबई म्यूनसिपल कॉर्पोरेशनमध्ये निवडून आलेल्या कार्पोरेटर यांचे अभिनंदन करण्यासाठी झालेल्या समारंभात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, "सर्व राजकीय पक्षांनी एक

होऊन हिंदी राजकारणाची धुरा आपल्या हाती घ्यावी."*

२ एप्रिल १९४८, रोजी सिद्धार्थ कॉलेजमध्ये देविकाबाई दामोदर कांबळेंच्या अध्यक्षतेखाली सभा.

२ एप्रिल १९५९, रोजी बौद्ध धंम्मगुरू व चौदावे (१४) दलाई लामा यांचा भारतात आश्रय.

२ एप्रिल १९६३, रोजी हिरक मोहोत्त्सव समिती नाशिक रोड यांसकडून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना मानपत्र.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवारो, फग्गुणो मासो, बुधवार, फाल्गुन माहे.

३ एप्रिल १९२३, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर डी एस सी आणि बार ॲट लॉ पूर्ण करून भारतात परतले.

३ एप्रिल १९२७, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतःच्या संपादकत्त्वाखाली चळवळीचे मुखपत्र 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले.

३ एप्रिल १९५५, रोजी ब्रम्हदेशाच्या सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश यू यान टन यांचा सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई बुद्ध भुवन येथे सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "लोकशाहीचे दोन शत्रू एक हुकुमशाही आणि दोन माणसा–माणसात भेद मानणारी संस्कृती."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवारो, फग्गुणो मासो, गुरूवार, फाल्गुन माहे.

४ एप्रिल १९०६ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांचा विवाह. बाबासाहेब हे १५ वर्षांचे होते तर रमाई ९ वर्षांची होती.

४ एप्रिल १९१३, रोजी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी भीमराव आंबेडकर यांची परदेशातील उच्च शिक्षणासाठी दरमहा साडेअकरा पौंडाची शिष्यवृत्ती दोन वर्षांसाठी मंजूर केली. (पुढे भीमरावांच्या विनंतीवरून ही शिष्यवृत्ती एक वर्षाने वाढवून देण्यात आली.)

४ एप्रिल १९३८, रोजी कर्नाटक विभक्तिकरणाच्या ठरावावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे असेंबलित भाषण. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "सर्वांनी प्रथम भारतीय आणि शेवटीही भारतीय ही भूमिका घ्यावी."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सुक्कवारो, फग्गुणो मासो, शुक्रवार, फाल्गुन माहे.

५ एप्रिल ई. स. पूर्व ३०४ – सम्राट अशोक जयंती.

५ एप्रिल १९१० – रोजी अस्पृश्यांचा लष्करात प्रवेशाचा ठराव मंजूर झाला.

५ एप्रिल १९१० – रोजी शिवराम जानबा कांबळे यांची जेजुरी येथे प्रचंड सभा.

५ एप्रिल १९३८, रोजी असेंबलीमधे कर्नाटक विभक्ती करण्याच्या ठरावासंबंधी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विरोधी भाषण झाले.

५ एप्रिल १९४६, रोजी "अस्पृश्यांच्या मागण्या राखीव जागा, हक्क व संरक्षण" यासंबंधीचे निवेदन, विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्लीत कॅबिनेट मिशनलां सादर केले.

५ एप्रिल १९४६, रोजी ब्रिटिश सरकारने पाठविलेल्या त्रिमंडळ शिष्टमंडळाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मास्टर तारासिंग या अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींच्या मुलाखती घेतल्या.

५ एप्रिल १९५०, रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदीय चर्चेत भाग सी राज्य कायदा विधेयकावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 आज सम्राट अशोक यांची २३२८ वी जयंती आहे.... त्यानिमित्त एक लेख. 💎🦚🦚🦚☸☸

धम्मदायाद सम्राट अशोक.

पालि भाषेमध्ये दायाद म्हणजे उत्तराधिकारी किंवा वारसदार, तर धम्मदायाद म्हणजे धम्माचा उत्तराधिकारी किंवा धम्माचा वारसदार. याचाच अर्थ जो धम्माचे स्वत: आचरण करतो, जो धम्माचा प्रचार आणि प्रसारासाठी तन, मन, धनाने प्रयत्न करतो तोच खऱ्या अर्थाने धम्मदायाद म्हणता येईल.

या अर्थाने पाहिल्यास आणि ऐतिहासिक पुरावे ग्राह्य धरल्यास, केवळ सम्राट अशोक यांचेच नांव धम्मदायाद साठी योग्य आहे हे लक्षात येते.

सम्राट अशोक एक बहुआयामी आणि प्रतिभाशाली व्यक्तिमत्व होते. राज्य आणि राज्यातील जनता आणि धम्मासंबंधी त्यांचे दायित्व सिद्ध करायचे असेल तर त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर प्रकाश टाकायला हवा. यासाठी त्यांनी लिहिलेले शिलालेख, उभारलेल्या वास्तू, महावंस, अशोकावदान, रजतरंगिणी हे ग्रंथ आणि चीनी बौद्ध भिक्खू यांची प्रवासवर्णने पहावी लागतील. जगप्रसिद्ध इतिहासकार आणि प्रसिद्ध साहित्यिक, एच जी वेल्स "आऊटलाईन ऑफ हिस्टरी" या ग्रंथात म्हणतात, "इतिहासात गर्दी केलेल्या हजारो राजे, महाराज्यांच्या यादीत, अशोक यांचे नांव या सर्वांच्या वर एखाद्या अढळ ताऱ्याप्रमाणे चमकत आहे."

अशोक यांचा अभ्यास करायचा असेल तर शिलालेख हे उत्तम साधन आहेत. तत्कालीन भौगोलिक सीमेनुसार सम्राट अशोक यांनी त्यांच्या राज्यात अनेक ठिकाणी प्रस्तर किंवा स्तंभलेख उभारले. कलिंग येथील शिलालेखातून कळते की त्यांच्या राज्याभिषेकाच्या ८ व्या वर्षी कलिंगाशी युद्ध केले जे त्यांचे, त्यांच्या राज्याप्रति एक दायित्व होते. साम्राज्य वाढवून, आजूबाजूच्या राज्यांवर राजनैतिक दबाव निर्माण करणे व त्यामुळे आपले राज्य आणि त्यातील जनता सुरक्षित करणे हे एक राजा म्हणून त्यांचे कर्तव्य होते. या युद्धात झालेली मनुष्यहानी पाहून त्यांना पश्चाताप झाला व त्यांनी नंतर पुन्हा युद्ध करणार नसल्याचे जाहीर केले. अनेक इतिहासकार, अभ्यासक आणि साहित्यिक यांनी अशोक यांच्या या युद्धबंदीच्या निर्णयाचा विपरीत अर्थ लावला आहे. त्यांच्या मते सम्राट अशोक यांच्या या निर्णयामुळे भारतावर परकीय आक्रमण झाले. हे अतिशय खोटं आणि निर्बुद्ध आरोप आहेत. वास्तविक पाहता, सम्राटांनी स्वतःहून कुठल्याही राज्यावर युद्ध न करण्याचा मानस व्यक्त केला, मात्र कुणी जर मगध साम्राज्यावर आक्रमण

करण्याचा प्रयत्न केला असता तर तो परतावून लावण्याचे काम मगधच्या सैन्याने केले असते कारण सम्राट अशोक यांनी कुठेही सैन्य कपात केल्याचे दिसत नाही. उलट, लाखोंचे सैन्य मगधच्या संरक्षणासाठी सतत तत्पर होते. दुसरे महत्त्वाचे म्हणजे बृहदरथ पर्यंत मगधचे राज्य अजिंक्य होते. याचाच अर्थ, युद्ध न करण्याचे जाहीर करूनही, कोणीही राजा, मगध वर आक्रमण करू शकत नव्हता! सम्राट अशोक यांच्या मृत्यूनंतर देखील, संपूर्ण प्रदेशावर त्यांच्या नावाचा दबदबा होता हे सिद्ध होते.

आणखीन एक चूक इतिहासकार किंवा अभ्यासक करतात की अशोक यांनी कलिंग युद्धाच्या नंतर आणि बौद्ध भिक्खूचे विचार ऐकल्यानंतर बौद्ध धम्माचा स्वीकार केला. काळमापणानुसार पाहिल्यास, जेव्हा अशोक विदिशा नगरीचे प्रधान होते, तेव्हा त्यांचे लग्न तेथील प्रसिद्ध व्यापाराच्या मुलीशी–देवी हिच्याबरोबर झाले होते. राणी देवी ही बौद्ध धम्माची अनुयायी होती. याचाच अर्थ अशोक हे बौद्ध धम्माबद्दल जाणून होते. मात्र कलिंग युद्धानंतर, त्या युद्धाची विफलता जाणून त्यांच्या मनात समस्त जीवमात्रांविषयी प्रेम आणि करुणा जागृत झाली आणि हे बुद्ध विचार, देवी यांनी त्यांना पूर्वी सांगितली असावी. कलिंग युद्धानंतर सम्राट अशोक यांना या बुद्धीविचारांचे महत्त्व पटले असे म्हणता येईल. १३ व्या शिलालेखात सम्राट अशोक स्पष्ट लिहितात की या युद्धानंतर त्यांच्या मनात धम्माविषयी श्रद्धा उत्पन्न झाली. युद्धात लाखों लोक विनाकारण मारली जातात व अनेक परिवार नष्ट होतात. पुढे ते असे लिहितात की इतर राजांना दिग्विजय पसंत आहे तर मला 'धम्मविजय' पाहिजे. आणि म्हणूनच अधिकाऱ्यांना आदेश देताना लिहितात की प्रजेच्या प्रति द्वेष, ईर्षा किंवा आकस धरून काम करू नका, त्यांच्याशी 'मध्यममार्गाने' म्हणजेच संयतपणे व्यवहार करावा. लोक उत्सवात वेळ आणि संपत्ती वायफळपणे खर्च करतात. त्यापेक्षा त्यांनी प्रेम आणि करुणेने नोकरांशी वागावे, वृद्धांचा सन्मान करावा, ब्राह्मण, श्रमणांना दान करावे आणि सर्वांशी प्रेमाने वागावे. रुपनाथ, ब्रह्मगिरी, भाब्रु, मस्की येथील शिलालेखात सम्राट धम्माविजयाची चर्चा करतात तर सारनाथ, कोशाम्बी येथील शिलालेखात, संघाप्रति करुणा, कृतज्ञता आणि स्वास्थ्याची अपेक्षा करतात. भिक्खू संघात चाललेली धुसफूस किंवा विनय न पाळणाऱ्यांना तसेच फूट पाडणाऱ्यांना सम्राट स्पष्ट आदेश देतात की असे भिक्खू निष्कसित केले जातील. तिसऱ्या संगीतिच्या आयोजन करताना त्यांनी त्याआधी ६०,००० भिक्खुंना निष्कसित करून संघाला विनयानुसार आचरण करणे अधोरेखित केले. त्यामुळे संघात पुन्हा उपोसथ पाळणे सुरू झाले. सांची येथील शिलालेखात ते लिहितात की त्यांच्या पुत्रांनी, पौत्रांनी, प्रपौत्रांनी, चंद्रसूर्य असे पर्यंत संघात एकता राहील यासाठी दक्ष राहिले पाहिजे आणि जो संघात फूट पडण्याचा प्रयत्न करेल त्याला दंड केला पाहिजे. रुम्मनदेई शिलालेखात ते लुम्बिनी गावाला सर्व करांपासून माफ करतात. भाब्रु येथील शिलालेखात सम्राट, त्रिपिटकातील ७ सुत्तांचे उल्लेख करतात – विनयसमुकासे (सुत्त निपात), अरिवन्स सुत्त, अनागतभया सुत्त (अंगुत्तर निकाय), मुनी व मोनेय सुत्त (सुत्त निपात), उपतिस्स पन्हं (सरीपुत्त सुत्त, सुत्त निपात), अंबलट्ठीका सुत्त (राहुलोवाद सुत्त). याचाच अर्थ सम्राटांनी त्रिपिटकाचा सखोल अभ्यास केला होता हे लक्षात येते.

इतिहासकार प्रा. बरुआ यांच्या मते सम्राट अशोक यांच्या शिलालेखात २४० ठिकाणी त्रिपिटकातील संदर्भ दिसतो.

सामाजिक दायित्वासाठी सम्राट अशोकांनी अनेक लोकोपयोगी कामे केली होती. ४ थ्या स्तंभलेखात, सम्राटांनी अनेक कैद्यांचे मृत्युदंड माफ केले होते. पहिल्या आणि पाचव्या शिलालेखात सम्राटांनी अनेक पशुपक्षींना जीवदान देत, त्यांच्या खाण्यावर बंदी आणली होती. लोकांसाठी मोठे रस्ते तसेच दुतर्फा सावलीसाठी झाडे, मनुष्य आणि जनावरांसाठी दवाखाने आणि औषधालाय सुरू केले. व्यापाऱ्यांसाठी सुरक्षा आणि विश्रामगृह सुरु केल्या. बुद्धविचारांमध्ये प्रत्येक जीवांप्रति जे प्रेम, मित्रता आणि करुणा यांचा पुरस्कार केला तेच विचार सम्राटांनी आचरणात आणले. ८ व्या शिलालेखात सम्राट लिहितात की इतर राजे वनशिकार करण्यास जातात मात्र त्यांना 'धम्मविहार' म्हणजे वृद्ध, ब्राह्मण व श्रमण यांना भेटवस्तू देण्यास आवडते. ७ व्या स्तंभलेख आणि ५ व्या शिलालेखात सम्राट लिहितात की इतर राजांकडे अधिकारी आहेत मात्र त्यांच्याकडे 'धम्ममहामात्र' आहेत जे निराधार तसेच कैद्यांना शील, नीती आणि मैत्रीची शिकवण देतात. ७ वा शिलालेख हा सर्वात मोठा शिलालेख असून त्यात अशोक लिहितात की धंम्माची सक्ती कोणावरही करू नये, मात्र आपल्या आचरणाने लोकांनी धम्माकडे आकर्षित झाले पाहिजे. १२ वा शिलालेख हा सम्राट अशोक यांच्या धर्मनिरपेक्षतेचा पुरावा आहे. ते लिहितात की दुसऱ्यांच्या धर्माचा आदर केला पाहिजे. स्वतःचाच धर्म श्रेष्ठ आणि इतरांप्रति विरोध ठेवता कामे नये. पुढे ते लिहितात की इतरांच्या धर्माची शिकवण देखील समजून घेतली पाहिजे तसेच त्यांना विरोध न दर्शविता, आपल्या धर्माची लोककल्याणकारी तत्वे समजून सांगितली पाहिजे.

धर्मनिरपेक्षतेचा सर्वात मोठा पुरावा मौर्य साम्राज्यात पाहायला मिळतो. चंद्रगुप्त मौर्य हे जैन धर्माचे अनुयायी होते, बिंबिसार हे अजीवक पंथाचे अनुयायी होते तर सम्राट अशोक हे बौद्ध धम्माचे उपासक होते. भारतातील सर्वात पहिली कोरीव लेणीं त्यांनी अजीवक संघाला दान केली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. स्वतःच्या पुत्र आणि पुत्रीला श्रीलंकेत धम्माच्या प्रचाराकरिता पाठवले. त्यामुळे कालांतराने संपूर्ण श्रीलंका हे बौद्ध राष्ट्र म्हणून नावारूपास आले.

सम्राट अशोक यांनी आचरणात आणलेले बुद्धविचार तसेच चरित्र पाहून, परदेशातील अनेक राजे प्रभावित झाल्याचे दिसते. बर्माच्या राजाने साम्राटांचे उदाहरण गिरवीत संपूर्ण देशात चार दिवस उपोसथ पाळण्यासाठी सुट्टी दिली जी आजतागायत तेथे लागू आहे. ख्मेरच्या राजाने सम्राट अशोकाच्या कार्याचे गौरवोद्गार काढले. ११ व्या शतकात, थायलंडचे राजे, जयवर्मन सातवे यांनी आदेश काढला की ते स्नानगृहात अथवा शयकक्षात असले तरी काही राज्याच्या तातडीचे काम असेल तर त्यांना वर्दी देण्यात यावी. ५ व्या शतकातील चीनचे राजे लियान युन थिन यांनी साम्राटांबद्दल ऐकल्यानंतर काही काळ बुद्धीविहारामध्ये जाऊन बौद्ध भिक्खुंबरोबर राहिले.

सम्राट अशोक यांनी भ. बुद्धांच्या आयुष्यातील अनेक महत्त्वाची ठिकाणे शोधून काढली आणि तेथे घडलेल्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ स्तूप अथवा स्तंभ उभारले. महाबोधी महाविहार त्यांनी बांधले आणि तेथील बोधिवृक्षाला संरक्षण दिले. तसेच सांची आणि सारनाथ येथील स्तूप, धम्मचक्र, चारदिशेला तोंड असलेली सिंहमुद्रा आणि बौद्ध लेणीं कोरून बौद्ध संस्कृतीचे जतन केले.

भ. बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या वेळेस भन्ते आनन्द यांनी बुद्धांना विचारले की त्यांच्यानंतर उत्तराधिकारी कोण असेल. बुद्धांनी सांगितले की धम्म हाच शासक असेल. हाच धम्म संपूर्ण जगात प्रसार करण्याचे काम एक उपासक म्हणून सम्राट अशोकांनी तन, मन, धनाने केले. आपल्या संपूर्ण राज्याचा कारभार त्यांनी बुद्धविचारांनुसार केला. आज भारतासह जगभरात जी बौद्ध संस्कृती जिवंत आहे ते केवळ सम्राट अशोकांमुळेच आणि म्हणूनच त्यांच्या या कार्याचा आदर म्हणून त्यांना "धम्मदायाद" म्हटले जाते.

– अतुल मुरलीधर भोसेकर.

🐂 बैलपोळा :– सम्राट अशोकाच्या साम्राज्यात बैलांना होते अधिक महत्त्व.

सर्वात जुन्या संस्कृतीपासून ते आत्ताच्या नवं संस्कृतीपर्यंत 'बैल' या प्राण्यांचे ऋण माणूस कधीच विसरला नाही, म्हणूनच काय विविध संस्कृतीने त्याला आपल्या संस्कृतीत विशेष महत्त्व दिले. बौद्ध संस्कृती मध्येही बैलाला प्रतीक म्हणून वापरले गेले आहे.

जातकाच्या निदानकथेत शुद्धोधनाला महाराजा बनवून त्यांच्या शेतीचे वर्णन केले आहे. शुद्धोधन राजाच्या भावाचा मुलगा महाणाम या शाक्याला शेतीबद्दल भरपूर माहिती

होती. शाक्य वंशातील लोकांचा शेती आणि शेतीत राबणारे प्राणी यांसाठी *'वप्रमंगल'* नावाचा उत्सव होता. शेतीत राबणाऱ्या मजुरपासून ते बैल, नांगर यांना सजवले धजवले जायचे मग राजा नांगर धरत असे.

सिद्धार्थाचा गौतम वंश :–

सिद्धार्थाचे वडील शुद्धोधन यांचे वंशज गौतम होते. गौतम म्हणजे गाई–बैल यांचा व्यवसाय असणारे. त्यावरूनच सिद्धार्थाला गौतम नावाने ओळखल्या जाते. बैलाच्या मेहनतीला कृतज्ञ होऊन त्याची पूजा पोळ्याच्या दिवसी करणे ही शिकवण सिद्धर्थाच्या घरूनच या भारताला मिळाली.

हा सण साजरा करण्यामागे बुद्धांचा आर्थिक आणि सामाजिक विचार होता. त्या काळात गाई–बैल यज्ञात नाहक मारल्या जायचे. त्यामुळे शेतीला पूरक असलेल्या या प्राण्यांची संख्या कमी व्हायला लागली होती. पाळीव प्राण्यांवरच शेतीची उत्पादन क्षमता निर्धारित असल्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता कमी झाल्यामुळे त्याचा भुर्दंड राज्याच्या आर्थिक तिजोरीवर पडायला लागला होता.

पशुपालन आणि शेती हेच राज्याचे आर्थिक स्त्रोत होते. बुद्धांची अहिंसा ही यज्ञात नाहक मारल्या जाणाऱ्या पाळीव पशूंवर प्रतिबंधित होती. बुद्धांचा सिद्धांत हा प्राणिमात्रांवर प्रेम करण्याचा होता. कारण प्राणीमात्रांसोबतही प्रेमाने वागणे या जगाला प्रथम बुद्धांनीच शिकवले.

सम्राट अशोकाने नागवंशीयांना दिलेला अधिकार :–

सम्राट अशोक यांनीही 'बैल' या प्राण्याला त्यांनी निर्माण केलेल्या संस्कृतीमध्ये महत्त्वाचे स्थान दिले आहे. मौर्यकाळीन शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणजे बिहारमधील रामापूर्व येथे सापडलेला वृषभस्थंभ. चुनार खाणीतील पिवळ्या मऊ वालुकाश्मातील एकसंघ दगडात ते घडविले आहे. हे शिल्प ई. स. पूर्व तिसऱ्या शतकातील आहे. यावरून बौद्ध संस्कृतीमध्येही बैल या प्राण्यांचे महत्त्व कळून येते.

पोळा हा बैलांचा सण मानला जातो. परंतु तसा तो बैलांचा सण नसून शेतकऱ्यांनी बैलांप्रती प्रेम प्रक्त करण्याचा सण आहे. शेतकामात मोलाची भूमिका निभावणाऱ्या प्राण्याप्रती कृतज्ञता व्यक्त करायला लावणारा सण आहे.

नागवंशी संस्कृतीमध्ये सुरुवातीच्या काळात बैल, वाहन म्हणून आणि शेतीपयोगी कामासाठी उपयोग केला जात होता. परंतु यज्ञावंशी यांच्या आगमनानंतर आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार जमिनीचे व गुरा ढोरांचे मालक वैश्य झाले. त्यामुळे या जनावरांची देखभाल नागवंशी शुध्द लोक करीत असेल तरी यज्ञ कामाकरीता ब्राम्हण लोक जनावरांची कत्तल करून जनावरे चोरून सुधा मांस भक्षण करीत असत. त्यामुळे नागवंशी शुद्धांना त्यांच्या जनावरांच्या झालेल्या कत्तलीमुळे दुःख होत असे.

पुढे सम्राट अशोकाने नागवंशी शुद्धांना भारतात पहिल्यांदा जमिनीचे पट्टे ताब्यात दिले व त्यासोबत नागवंशी शुद्धांना जनावरांचे मालकसुद्धा केले. म्हणजेच "कसेल त्याचीच जमीन." हा नियम लागू केला. त्यामुळे जे नागवंशी शुद्ध बैलावर प्रेम करीत होते, त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्याकरिता पोळा हा सण साजरा केला जाऊ लागला.

यज्ञवंशियांकडून होणारी चोरी कर्म व मांस भक्षण या विरोधात बुध्दांनी सांगितलेले अष्टांगिक मार्गाचे तत्त्व नागवंशी शुद्धांना पटले व म्हणून ते अष्टांगिक मार्गालाच स्वतःचा मंगल मार्ग मानायला लागले. त्यामुळे आपल्यासोबत शेतात राबणाऱ्या बैलाची आपण काळजी घेतली पाहिजे या मंगल भावनेपोटी पोळा हा सण नागवंशी साजरा करू लागले.

एकेकाळी जे नागवंशी प्राणीहत्येचा विरोध करायचे व जे यज्ञावंशी प्राणिहत्या करायचे आज तेच गोप्रतीपालक म्हणून मिरवीत आहेत. मात्र इतिहासाची पुनरावृत्ती होत असते व ती होईल, बदल घडेल अशी आपण आशा बाळगुयात.

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सनिवारो, फग्गुणो मासो, शनिवार, फाल्गुन माहे.

६ एप्रिल १९३०, दांडी मिठाचा सत्याग्रह.

६ एप्रिल १९३४ – रोजी बोरगाव (बलोडी) जिल्हा वर्धा येथे अस्पृश्य परिषदेत स्त्री शिक्षण सवलती व वैवाहिक बाबतीत सुधारणा ठराव पारित.

६ एप्रिल १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेच्या चर्चेत लष्कराच्या विधेयकावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, फग्गुणो मासो, रविवार, फाल्गुन माहे.

७ एप्रिल १९३० – रोजी नाशिक येथे काळाराम प्रवेश सत्याग्रहाच्या वेळी एका स्त्री सत्याग्रहीने पूजार्याच्या कानशिलात लगावली.

७ एप्रिल १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बॉम्बे येथे जाहीर सभेत भाषण करतांना, "अनुसूचित जातीतील सदस्यांना संघटित केले जावे आणि देशातील अन्य मोठ्या समुदायांशी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानता असावी यावर भर दिला. अनुसूचित जाती महासंघाच्या ध्वजाखाली एक झाले पाहिजे." असे सांगितले.

७ एप्रिल १९४८ – जागतिक आरोग्य दिन.

७ एप्रिल १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदेच्या चर्चेत केंद्रीय व राज्य कायद्यांच्या चौकशीच्या विषयावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, चंदवारो, फग्गुणो मासो, सोमवार, फाल्गुन माहे.

८ एप्रिल १९२८ – रोजी बाळ गंगाधर टिळक यांचे चिरंजीव श्रिधरपंत टिळक यांनी गायकवाड वाड्यात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली समता संघाची स्थापना केली. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अनेक स्पृश्य–अस्पृश्य मान्यवर उपस्थित होते. समता संघाच्या धोरणानुसार गायकवाड वाड्यात स्पृश्य–अस्पृश्यांचे सहभोजन आयोजित करण्यात आले होते.

८ एप्रिल १९३३ – रोजी क्लार्क रोड, बी. आय. टी. चाळ, मुंबई येथे बहिष्कृत समाजातर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानपत्र समारंभ संपन्न झाला. त्याप्रसंगी त्यांनी, "नकली व स्वयंमान्य पुढार्यांपासून सावध राहा." असा इशारा दिला.

८ एप्रिल १९४६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधानसभेच्या वादविवाद (मध्यवर्ती) मध्ये भारतीय कामगार संघटनेवर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🌿🌿🌿💎 *सविनय जयभीम* 💎🌿🌿🌿☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, कुंजवारो, चेत मासो, मंगळवार, चैत्र माहे.

९ एप्रिल १८९३ – रोजी राहुल सांस्कृत्यायन जयंती.

*९ एप्रिल १९२७ – रोजी महाड येथील अत्याचाराचा निषेध करण्यासाठी परळ दामोदर गृहाच्या पटांगणात अस्पृश्यांची जाहीर सभा.

९ एप्रिल १९३० – रोजी काळाराम मंदिर सत्याग्रहात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या साथीदारांना दुखापत झाली, आज जातीवादी हिंदू आणि अस्पृश्य लोकांमध्ये तडजोड झाली. हे निश्चित झाले की दोन्ही बाजूचे शक्तिशाली लोक रथ ओढतील. हे पाहण्यासाठी काळाराम मंदिराच्या मुख्य दरवाज्याजवळ दुपारी हजारो लोक जमले. डॉ. आंबेडकर यांच्या पसंतीच्या पैलवाणांसह दरवाज्याजवळ उभे होते. परंतु ते रथाला स्पर्श करण्यापूर्वीच त्यांचा सवर्ण हिंदूंच्या खोडकर घटकांशी भांडण झाले आणि सवर्ण हिंदू गुप्त योजनेनुसार रथ घेऊन पळून गेले आणि दगडफेक करण्यास सुरुवात केली. क्षणार्धात अस्पृश्यांच्या जमावाने दगडांच्या ताळावात रथ गाठला आणि जप्त केला. डॉ. आंबेडकरांचे सैनिक त्याला संरक्षण देत होते आणि डॉ. आंबेडकर याणांही किरकोळ दुखापत झाली होती, जेव्हा त्यांना संरक्षण देणाऱ्या देणाऱ्या व्यक्तीची छत्री पसरली होती. संपूर्ण शहरात अस्पृश्य लोकांच्या आणि उच्चवर्णीय हिंदुंच्या गटात मोकळ्या मैदानात भांडणे सुरू होते. या सत्याग्रहाने संपूर्ण जिल्ह्यातील कट्टरपंथी हिंदूंच्या मनात द्वेषाची भावना भरून गेली. पण अस्पृश्य वर्गाचा संकल्प इतका प्रखर होता की, ऑर्थोडॉक्स हिंदूंना वर्षभर प्रसिद्ध मंदिर बंद ठेवावे लागले आणि संघर्ष चालूच राहिला.

९ एप्रिल १९८४ – रोजी महामानव विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विश्वासू सहकारी, राज्यसभेचे माजी उपसभापती, चंद्रपूर जिल्ह्याचे गौरव बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

"मी बुद्धिमान बौद्ध आहे." – महापंडित राहुल सांकृत्यायन.

"तुम्हीं हीनयान मानता कि महायान? या प्रश्नावर हसून राहुलजींनी उत्तर दिले – "मी बुद्धिमान बौद्ध आहे." बौद्ध धम्माबद्दल राहुलजींना विशेष आकर्षण वाटले आणि म्हणून त्यांनी त्या साहित्याचा अभ्यास सुरु केला. आपल्या आयुष्यातील जवळपास ४५ वर्षे त्यांनी बौद्ध साहित्याचा अभ्यास करण्यासाठी विविध देशात भ्रमंती केली. केदारनाथ पांडे म्हणून जन्माला आलेले राहुलजी सुरवातीला आर्यसमाजी होते, मात्र बुद्ध विचार पटल्यानंतर त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला व स्वतःचे नाव राहुल सांकृत्यायन ठेवले.

श्रीलंकेतील विद्यालंकार परिवेण मध्ये तेथील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना संस्कृत काव्य, व्याकरण शिकवीत व स्वतः महास्थवीर धंम्मानंद यांच्याकडून पालि, बौद्ध साहित्याचा अभ्यास करीत. पालि त्रिपिटक मध्ये मिळवलेल्या प्रावीण्यामुळे त्यांना विद्यालंकार परिवेणने "त्रिपिटकाचार्य" ही पदवी बहाल केली.

राहुलजी, अनागरिक धम्मपाल यांच्या संपर्कात आले होते. दोघांमध्ये बौद्ध धम्माबद्दल आणि महाबोधी महाविहारावर बरीच चर्चा झाली. राहुलजींनी महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या बाजूने होते आणि त्यांनी तसा प्रस्ताव गया कॉंग्रेसच्या अधिवेशनात मांडला परंतु त्यांना अपयश आले. पुढे राजेंद्रबाबूंनी स्थापन केलेल्या महाबोधी महाविहार समितीत देखील ते होते व त्यांनी बौद्धांच्या ताब्यात महाविहार देण्यात यावे यासाठी प्रयत्न केले.

प्राचीन हरवलेले बौद्ध साहित्य तिबेट मध्ये आहे हे कळल्यानंतर त्यांनी चार वेळा तिबेट यात्रा केली. या सर्व यात्रेत त्यांनी तिबेट मधील वेगवेगळ्या विहारांमध्ये अनेक ग्रंथ, चित्रे, भृजपत्रे, ताम्रपट, यांचे फोटो काढून आणले, काही स्वतः उतरवून घेतले. काही प्रमुख ग्रंथ जे भारतातून नष्ट झाले होते त्यापैकी वाद्न्याय, अभिधर्मकोषमूल, सुभाषित रत्नकोश, न्यायबिंदूपंजिका टीका, हेतुबिंदु अनुटीका, प्रातिमोक्षसूत्र, मध्यान्तविभंग भाष्य, वार्तिकालंकार, इत्यादी. शलू बौद्ध विहारातून त्यांनी नैयायिक ज्ञानश्री चे १२ ग्रंथ आणि योगाचारभूमी ग्रंथ आणले. राहुलजींनी आपल्या या यात्रांमधून भारतात प्राचीन बौद्ध साहित्यातील ३६३ ग्रंथांच्या प्रतिलिपी आणल्या. त्यांनी केवळ एकच ग्रंथ जरी तिबेट वरून आणला असता तरी त्यांना अक्षय कीर्ती मिळाली असती! राहुलजींनी एकूण १३८ पुस्तके लिहिली जी वेगवेगळ्या विषयांवर आणि भाषेत आहेत. त्यांना १४ भारतीय आणि परदेशी भाषा अवगत होत्या. राहुलजींनी आणलेले सारे साहित्य पाटणा संग्रहालयात सुरक्षित ठेवले आहे. विशेष म्हणजे कधीही कॉलेजची पायरी न चढलेले राहुलजींना लेनिनग्राड येथील विद्यापीठात ४ वर्षे प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते!

आज राहुल सांकृत्यायन यांची १३१ वी जयंती आहे. त्यांना विनम्र अभिवादन.

नमो बुध्दाय जयभिम

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

१० एप्रिल १९२५ – रोजी प्रांतिक बहिष्कृत परिषदेचे पाहिले अधिवेशन.

१० एप्रिल १९२८ – रोजी निपाणी जिल्हा बेळगाव येथे बहिष्कृत हितकारणी सभेच्या विद्यमाने मुंबई भाग प्रांतिक परिषदेचे तिसरे अधिवेशन विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

१० एप्रिल १९३२ – रोजी आमदणांव (उमरेड) येथील महारांवरील अत्याचाराची हकीकत वृतपत्र दैनिक महाराष्ट्रमध्ये प्रसिद्ध.

१० एप्रिल १९४८ – रोजी दिल्ली येथील विद्यापीठाच्या लॉ महाविद्यालयात समाजसुधारणा या संदर्भात "कायद्याचे स्थान" याविषयी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भाषण दिले. ते म्हणाले की, "मनु किंवा याज्ञवल्क्य यांच्या दैवी कायद्यामुळे हिंदू समाज कधीही सुधारू शकला नाही."

१० एप्रिल १९६५ – रोजी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, गुरूवारो, चेत मासो, गुरूवार, चैत्र माहे.

११ एप्रिल १८२७ – रोजी क्रांतिसूर्य राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले (गोऱ्हे) यांची जयंती.

११ एप्रिल १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधानसभेच्या वादविवाद (मध्यवर्ती) मध्ये खाण मातृत्व लाभ (दुरुस्ती) विधेयकावर चर्चा केली.

११ एप्रिल १९४७ – रोजी महिलांच्या न्याय्य हक्कांसाठी तयार करण्यात आलेले "हिंदू कोड बिल" विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सरकारला सादर केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सुक्कवारो, चेत मासो, शुक्रवार, चैत्र माहे.

१२ एप्रिल १९२८ – रोजी महार वतन बिल मुंबई कौन्सिल पुढे सदर करण्यात आले.

१२ एप्रिल १९३३ – रोजी नगर जिल्ह्यातर्फे मुंबई दामोदर गृहाच्या पाठीमागील पटांगणात उभारलेल्या भव्य मंडपात, डॉ. सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र अर्पण करण्यात आले.

१२ एप्रिल १९४६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधानसभा वादविवाद (मध्यवर्ती) मध्ये औद्योगिक रोजगार (स्थायी आदेश) विधेयकावर चर्चा केली.

१२ एप्रिल १९४७ – रोजी मुंबई येथील झालेल्या एका समारंभात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री. विष्णुपंत वेलणकर यांचा निरनिराळ्या संस्थांकडून जाहीर सत्कार करण्यात आला.

१२ एप्रिल १९९० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे संसदेच्या मध्यवर्ती गृहामध्ये अनावरण करण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, सनिवारो, चेत मासो, शनिवार, चैत्र माहे.

१३ एप्रिल १९२९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बहिण तुळसा हीचे मुंबईत निधन.

१३ एप्रिल १९२९ – रोजी 'भारतीय बहिष्कृत समाज सेवा संघ' च्या विद्यमाने रत्नागिरी जिल्ह्यातील खेड व चिपळूण तालुक्यातर्फे जिल्हा बहिष्कृत परिषदेचे दुसरे अधिवेशन विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली चिपळूण येथे संपन्न झाले.

१३ एप्रिल १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. सोळंकी यांस मानपत्र व प्रोपेसर राव यांचा सन्मान करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

१३ एप्रिल १९३६ – १३ व १४ एप्रिल रोजी अमृतसर येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिख मिशनरी परिषदेच्या प्रचंड मेळाव्यास उपस्थित होते.

१३ एप्रिल १९४७ – रोजी मुंबई येथील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे "प्रोफेसरांचे संशोधन कार्य" या विषयावर भाषण.

१३ एप्रिल १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्धार्थ कॉलेज मधील प्राध्यापकांना युनिवर्सिटीतील शिक्षण पद्धतीत बदल सुचविले.

*१३ एप्रिल १९५२ – रोजी भारतातील राज्यसभेचे झालेल्या पहिल्या अधिवेशनात राज्यसभा सदस्य म्हणून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांचा शपथविधी संपन्न.*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, चेत मासो, रविवार, चैत्र माहे.

१४ एप्रिल १८९१ – रोजी "विद्यार्थी दिवस" बोधिसत्त्व, परमपूज्य, विश्वरत्न, प्रज्ञासुर्य, महामानव, क्रांतिसूर्य, युगपुरुष, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विद्वान, शिलवान त्यागापुरूष, पिडिक उद्धारक, महापुरुष, धंम्मनिष्ठ, उत्कृष्ट संसदपटू, महासुर्य, धंम्मदीप, स्त्रिउद्धारक, अर्थतज्ज्ञ, कायदेपंडित, भारतभाग्य विधाता, साहित्यिक, दि सिम्बॉल ऑफ नॉलेज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती. महू येथे जन्म.

१४ एप्रिल १९०८ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांकरिता मिस क्लार्क वसतिगृहाची स्थापना केली.

१४ एप्रिल १९३७ – रोजी नाशिक येथील सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या गौरवपर भाषणात, "माझ्या चळवळीतील शंभर नंबरी सोने." म्हणून गौरव केला.

१४ एप्रिल १९६३ – रोजी पंडित राहुल सांस्कृत्यायन स्मृतिदिन.

१४ एप्रिल १९६६ – रोजी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली महू ते मुंबई भिमज्योत काढण्यात आली व मुंबईत पोहोचली.

१४ एप्रिल १९८४ – रोजी मान्यवर कांशिरामाजी साहेबांनी बहुजन समाज पार्टीची स्थापना केली.

१४ एप्रिल १९९० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न किताब बहाल.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२७, भीमाब्द १३३, चंदवारो, चेत मासो, सोमवार, चैत्र माहे.

१५ एप्रिल १४६९ – रोजी गुरुनानक जयंती.

*१५ एप्रिल १४५२ – रोजी "जागतिक कला दिन" प्रसिद्ध कलाकार लिओनार्डो दा विंची यांचा जन्मदिन जागतिक कला दिन म्हणून आयोजित केला जातो. कलेशिवाय जीवन म्हणजे, सुगंधाशिवाय फुल…!

१५ एप्रिल १९२० – रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषद संपन्न झाली.

१५ एप्रिल १९२० – रोजी श्री. उदाजिराव विद्यार्थी वस्तीगृहाची स्थापना समयी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातिभेदाविषयी भाषण केले.

१५ एप्रिल १९३२ – रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांना काळाराम मंदिर प्रवेशाच्या प्रसंगी तीन महिने धुळ्याच्या तुरुंगात शिक्षा झाली.

१५ एप्रिल १९४८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्ली येथील हार्डिंज अँव्हिण्यू या निवासस्थानी मुंबईच्या डॉ. शारदा कबीर यांच्याशी नोंदणी पद्धतीने विवाह केला.

१५ एप्रिल १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्ली येथे म्युटिनी रोडवरील आंबेडकर भवनाच्या पायाचा दगड बसविला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, चेत मासो, मंगळवार, चैत्र माहे.

१६ एप्रिल १९२२ – रोजी मुळशी सत्याग्रह सुरू झाला.

१६ एप्रिल १९३३ – रोजी कोकण पंचमहाल (राजापूर ते गोवा हद्द) महार समाज सेवा संघ मुंबई यांचे विद्यमाने माझगाव बोगद्याची वाडी, सिमेंट चाळ येथे झालेल्या सहभोजन समारंभास विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे सहकारी हजर होते.

१६ एप्रिल १९३४ – रोजी नागपूर येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

१६ एप्रिल १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिल्लीत "आंबेडकर भवन" ची कोनशिला बसविली. त्यानंतर त्यांनी मध्यवर्ती सरकारवर कडाडून हल्ला केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, चेत मासो, बुधवार, चैत्र माहे.

१७ एप्रिल १९२० – रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते वस्तीगृहाचा शिलाण्यास.

१७ एप्रिल १९३६ – रोजी शिख धर्माच्या प्रचारकार्यासाठी धर्मांतरित कार्यकर्त्यांच्या नेमणुका.

१७ एप्रिल १९४७ – रोजी "फंडामेंटल राईट्स सब कमिटी" दस्तऐवज क्रमांक ४ (i) २७ फेब्रुवारी १९४७ मध्ये नियुक्त केलेल्या अल्पसंख्यांकांच्या उपसमितीने या मसुद्याच्या कलमाची शिफारस केली. १७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत प्रथम मसुद्याच्या घोटाळ्याची तपासणी करण्याचे ठरले. हक्क उपसमितीने १६ एप्रिलच्या अहवालात अल्पसंख्यांक हक्कांच्या संरक्षणाच्या विशिष्ट हेतूसाठी त्यातील काही विस्तारित किंवा सुधारित केले जावे की नाही हे पाहण्यासाठी दस्तऐवज क्रमांक ४ (६) पहा. ही चर्चा तीन दिवसांपर्यंत म्हणजेच १७ एप्रिल, १८ आणि १९ एप्रिल चालली. अल्पसंख्यांकांच्या दृष्टिकोनातून मूलभूत हक्कांच्या प्रश्नांवर आधारित अंतिम अहवाल उपसमितीने १९ एप्रिल रोजी सदर केला. या सभेला विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, चेत मासो, गुरूवार, चैत्र माहे.

१८ एप्रिल १९१८ – रोजी शिक्षणासाठी मदत करणाऱ्या बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांची विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्यक्ष भेट घेतली.

१८ एप्रिल १९३९ – रोजी राजकोट येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तेथील राजे ठाकूरसाहेब यांची निमंत्रणावरून भेट घेऊन 'अस्पृश्यांचे प्रश्न व राखीव जागा' यावर सविस्तर चर्चा केली.

१८ एप्रिल १९४८ – रोजी नवी दिल्ली येथे लॉ युनियनच्या वार्षिक दिनानिमित्त 'हिंदी संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे' या विषयावर भाषण करताना विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "धार्मिक कायदा विरुद्ध धर्मनिरपेक्ष कायदा, या लढ्यात धार्मिक कायद्याचे वर्चस्व, हा देशाचा ऱ्हास आहे."

१८ एप्रिल १९८२ – रोजी जागतिक वारसा हक्क दिन साजरा केला जातो. मानवी वारसा जतन करणे आणि संबंधित संस्थांच्या सर्व प्रयत्नांना मान्यता देणे हे त्याचे उद्दिष्टे आहे. इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मोण्युमेंट्स अँड साईट्सने (ICOMOS) १९८२ मध्ये, १८ एप्रिल हा जागतिक वारसा हक्क दिन म्हणून घोषित केला आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, चेत मासो, शुक्रवार, चैत्र माहे.

१९ एप्रिल १९३१ – रोजी मुंबई येथे अखिल भारतीय अस्पृश्य परिषद संपन्न झाली.

*१९ एप्रिल १९३१ – रोजी पिरकल येथील गोरहेल फ्युएल सोसायटीच्या सभागृहात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

मुंबई येथे लीडर्स कॉन्फरन्स आयोजित केली. बंगाल, सिपी, मद्रास (चेन्नई) आणि महाराष्ट्रातील सर्व प्रमुख निराश वर्ग नेते आणि एन. शिवराज अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेत केलेल्या टीमचा अहवाल सादर केला. या अहवालाचे वेगवान टाळ्यांच्या कडकडाटात संम्मेलणाला अनंन्य पद्धतीने पाठिंबा दर्शविला गेला.*

१९ एप्रिल १९३९ – रोजी राजकोट संस्थानातील राजकीय सुधारणांचा नेमलेल्या मंडळावर, अस्पृश्य वर्गाचा प्रतिनिधी सुधारणा समितीवर घ्यावा त्यासाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गांधिजिंशी चर्चा केली.

१९ एप्रिल १९४२ – रोजी रोहिदास तरुण सुधारक संघाच्या महिला शाखेचे कल्याण जिल्हा ठाणे येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. "इतरांच्या मदतीवर जगू नका, स्वावलंबी व्हा." असा त्यांनी तरुणांना उपदेश केला.

१९ एप्रिल १९४५ – रोजी शिमला येथे भरलेल्या 'नॅशनल सर्विस ट्रिब्यूनल' परिषदेत 'टेक्निकल ट्रेनिंग, नॅशनल सर्विस ऑर्डीनंस आणि रोजगार योजना' यावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विचार मांडले.

१९ एप्रिल १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "लोकसभेच्या (दुरुस्ती) विधेयकावर Representation of People (Amendment) Bill" संसदीय वादविवादात पुन्हा चर्चा सुरू केली.

१९ एप्रिल १९५३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र यशवंतराव यांचा मीराबाई यांच्याशी परळच्या आर एम भट हायस्कूलमध्ये बौद्ध पद्धतीने विवाह झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबईत असूनही विवाहाला हजर राहिले नाहीत. मात्र डॉ. माईसाहेब आंबेडकर उपस्थित होत्या.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, चेत मासो, शनिवार, चैत्र माहे.

२० एप्रिल १९११ – रोजी बडोद्याच्या संस्थानाने भीमराव आंबेडकरांना दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली आणि पदवी प्राप्त केल्यानंतर बडोदा संस्थानाची नौकरी करण्याची अट घातली.

२० एप्रिल १९३८ – रोजी सातारा येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा. आपल्या भाषणात त्यांनी, "दुसऱ्यावर विसंबून राहणे म्हणजे पेशवाईतले गाडगे गळ्यात बांधून घेणे होय." असे सांगितले.

२० एप्रिल १९३८ – रोजी मुक्काम इस्लामपूर येथे जिल्हा बोर्डाच्या निवडणुकीनिमित्त विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "तुमची पवित्र मते विकू नका, ती सत्कार्यी लावा." असे सांगितले.

२० एप्रिल १९४२ – रोजी चौपाटीवर डॉ. एम. आर. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सुवर्ण जयंती साजरी करण्यात आली.

२० एप्रिल १९५४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर विमानाने दिल्लीहून नागपूरला आले. माउंट हॉटेलच्या पटांगणात त्यांनी, "धर्माप्रमाणे राजकारणातही निष्ठा बाणली नाही तर तो लफनग्यांचा बाजार ठरेल." असे सांगितले.

२० एप्रिल १९५४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना हितोपदेश करतांना, "निवडणुकीद्वारे जागा मिळविणे हे एक साधन आहे साध्य नव्हे." असे सांगितले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, चेत मासो, रविवार, चैत्र माहे.

२१ एप्रिल १९३२ – रोजी नाशिक मधील काळाराम मंदिराचे दरवाजे खुले करण्याचा सरकारी हुकूम झाला.

२१ एप्रिल १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पांढरकवडा येथे अस्पृश्यांची जाहीर सभा.

२१ एप्रिल १९४२ – रोजी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृतपत्रांनी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सेवा आणि विद्वत्ता याविषयी त्यांचा गौरव करून त्यांचे अभिनंदन केले.

२१ एप्रिल १९५४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःच्या निवडणुक प्रचारासाठी नागपूरहून भंडारा येथे आले. भंडारा संसद पोटनिवडणुकीत उभे असलेल्या चार (४) उमेदवारांच्या निवडणूक प्रचारानिमित्त केलेल्या भाषणात, "आपला देश दोन राष्ट्रांत विभागाला आहे एक वरच्या लोकांचे दुसरा खालच्या लोकांचे." असे सांगितले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ एप्रिल २०२४, बुद्धाब्द २५६७, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, चेत मासो, सोमवार, चैत्र माहे.

२२ एप्रिल १८४० – रोजी सर जेम्स प्रिन्सेप यांच्या स्मृती दिनांनिमित्ताने विनम्र अभिवादन.

२२ एप्रिल १९३३ – रोजी सोपारा, वसई येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

२२ एप्रिल १९३३ – रोजी रावबहादुर एस. के. बोले यांच्या अध्यक्षतेखाली, जी आय पी रेल्वे पोर्टर कुर्ला येथे अस्पृश्य समाजातर्फे, विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एक मानपत्र व ८० रुपयांची थैली अर्पण करण्यात आली.

२२ एप्रिल १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सरदार पटेल यांना असे सुचविले की, "आर्थिक नियोजनासाठी एक स्वतंत्र समिती नेमावी."

*२२ एप्रिल १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकप्रियतेच्या उंचावर होते. त्यांचा वाढदिवस एप्रिलमध्ये देशव्यापी साजरा करण्यात आला होता आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश छागला यांच्यासारख्या मान्यवरांनी हजेरी लावली हे स्वाभाविकच होते. मुंबईच्या नायगाव येथे वाढदिवसाच्या उत्सवाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष न्यायमूर्ती छागला म्हणाले की, "प्रत्येक भारतीय नागरिकाला आंबेडकरांचे हक्क मिळाल्याबद्दल त्यांचे कृतज्ञतेने स्मरण होईल. आंबेडकर हे अनुसूचित जातीचे नेते असल्यामुळे ते या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत, परंतु ते त्यांना संपूर्ण देशाचे नेते मानतात म्हणून ते उपस्थित राहिले. भारताचा नामांकित आणि लोकप्रिय न्याय अभिमानाने आठविते. आंबेडकर आणि त्यांनी इंग्लंडमधील बारसाठी एकाचवेळी अभ्यास कसा केला, त्याचवेळी त्यांनी कसा

अभ्यास सुरू केला आणि दोघांनी मुंबईच्या लॉ कॉलेजमधे शिकविले कसे. आंबेडकर हे आता घटनात्मक कायद्यावरील एक महान अधिकार म्हणून जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त नाव असल्याचे नमूद केले."*

२२ एप्रिल १९५७ – रोजी नागपूर चिंचोली येथील ११.३६ एकर जमीन दान दिल्यानंतर गोडबोले यांनी तेथेच शांतिवन नावाचा आपला प्रकल्प स्थापन केला. शांतिवनात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ वस्तू संकलित करून त्यांचे एक दुमजली संग्रहालय बनविले.

२२ एप्रिल १९७० – "जागतिक वसुंधरा (धरणी/पृथ्वी) दिन." पर्यावरणरक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने अमेरिकेचा सेनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल, इ.स. १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला, तरीही त्या कार्यक्रमाचा राष्ट्रीय समन्वयक असलेला डेनिस हेस याने स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन करून पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सध्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🏵🏵🦚🦚🦚💎 जागतिक वसुंधरा (धरणी/पृथ्वी) दिन 💎🦚🦚🦚🏵🏵

पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी जागृती करण्यासाठी हा दिवस जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी, संपातबिंदू पृथ्वी दिन पाळतात.

पर्यावरणरक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने अमेरिकेचा सेनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल, इ.स. १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला, तरीही त्या कार्यक्रमाचा राष्ट्रीय समन्वयक असलेला डेनिस हेस याने स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन करून पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सध्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली.

पृथ्वीचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाचे

वृक्षारोपण करावे आणि वृक्षतोड कमी करावी.

नद्याचे जल स्वछ ठेवणे.

आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे.

शेतीत जैविक खतांचा वापर करा, रासायनिक खते कमी वापर.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🏵🏵🦚🦚🦚💎 सर जेम्स प्रिन्सेप यांच्या १८४ व्या स्मृती दिनां निमित्ताने विनम्र अभिवादन. 💎🦚🦚🦚🏵🏵

२६ मे १९५० – रोजी सिलोन येथे जागतिक बौद्ध परिषद "टेम्पल ऑफ दी टूथ" नावाच्या मंदिरात २७ देशांचे बौद्धधंम्मिय प्रतिनिधित बौद्ध धंम्माच्या पूनरूज्जीवन विषयी एकत्रित आले. त्या परिषदेत "जागतिक बंधुत्व" या विषयावर ठराव संमत करण्यात आला. त्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संमेलनाला संबोधित करताना म्हणाले की, "नास्तिकांनी अष्टांगी मार्ग (आठ बाजूंनी) ग्रहण करावा."

२६ मे १९५२ – रोजी कोलंबिया विद्यापीठाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना डॉक्टर ऑफ लॉ पदवी दिल्याबद्दल आंबेडकरांना अभिनंदनाचे पत्र.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, वेसाख मासो, सोमवार, वैशाख माहे.

२७ मे १९२८ – रोजी समाज समता संघातर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दिवंगत श्रिधरपंत टिळकांच्या दुखवट्याची सभा पार पडली.

२७ मे १९३५ – रोजी महासूर्याची सावली, कोट्यावधीची माऊली, करुणेचा महासागर, त्यागाचे सर्वोच्च प्रतीक, त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांचे राजगृह दादर या राहत्या घरी निधन झाले.

२७ मे १९४७ – रोजी मुंबईतील एच एम आय डॉकयार्डमधील अस्पृश्य कामागारांमार्फत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १००१/- रुपयांची थैली अर्पण करण्याचा समारंभ सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये पार पडला.

२७ मे १९५३ – रोजी नरे पार्क तसेच वरळी येथील आंबेडकर मैदानावर बुद्धांची जयंती, महानिर्वाण दिनानिमित्त आयोजित सभांमधून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुयायांना बौद्ध धंम्म स्वीकारण्याचे आवाहन केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, वेसाख मासो, मंगळवार, वैशाख माहे.

२८ मे १८९५ – ०९ डिसेंबर १९५० रोजी कोल्हापूर नगरीत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जगातील पहिला पुतळा उभारणारे माधवराव बागल यांना जन्मदिन.

२८ मे १९३३ – रोजी महार एज्युकेशन सोसायटी तर्फे वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे अस्पृश्यांची जाहीर सभा संप्पंन्न झाली.

२८ मे १९४० – रोजी भंडारा येथे विडी मजुरांची जाहीर सभा.

२८ मे १९४६ – विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लॉर्ड पथिक यांना पाठविलेले पत्र – कॅबिनेट मिशनने जारी केलेल्या निवेदनाबाबत लॉरेन्स लॉर्ड पथिक – लॉरेन्स यांनी २८ मे १९४६ रोजी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना पाठविलेल्या त्या पत्राचे स्पष्टिकरण दिले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, वेसाख मासो, बुधवार, वैशाख माहे.

२९ मे १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला Protection of the Interests of the Depressed Classes हा ग्रंथ प्रकाशित झाला.

२९ मे १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांची गाऱ्हाणी व मागण्यांचे दोन छापिल खलिते सायमन कमिशनला बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने पाठविले.

२९ मे १९२९ – रोजी विदर्भातील जळगांव–जामोद येथे मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतातील दलित (बहुजन) वर्गाची परिषद विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली. अस्पृश्यांनी धर्मांतर करून अंन्य धर्म स्वीकारावा असा ठराव संमत करण्यात आला.

२९ मे १९२९ – रोजी मुक्काम पातुर्डा जिल्हा बुलढाणा येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत व वऱ्हाड अस्पृश्य परिषदेचे अधिवेशन पार पडले.

२९ मे १९३१ – रोजी डिलाईड रोड, मुंबई येथे अस्पृश्य वर्गाच्या जाहीर सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "अस्पृश्यांच्यात भांडणे लावणाऱ्या हितशत्रूचा डाव ओळखा."

२९ मे १९३२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेकडून मुंबई प्रांतातील दलितांच्या शैक्षणिक स्थितीबद्दल सायमन कमिशनला निवेदन.

२९ मे १९४६ – रोजी दि बॉंबे शेड्युल्ड कास्टस इम्प्रुवमेंट ट्रस्टची पहिली सभा विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

२९ मे १९५३ – रोजी चेंबूर, मुंबई येथील "अस्पृश्य संघटना मंडळ" तर्फे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हिरक रूपाने इमारत फंडास १००१/- रुपये अर्पण केले. सदर प्रसंगी त्यांनी सांगितले की, "आपल्याला कमीपणा येईल असा पोशाख करू नका."

२९ मे २००३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नी माईसाहेब डॉ. सवितामाई भीमराव आंबेडकर यांचा स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, वेसाख मासो, गुरूवार, वैशाख माहे.

३० मे १९२० – रोजी नागपूर येथे भारतीय बहिष्कृत वर्गाची पहिल्या अखिल भारतीय परिषदेचे अधिवेशन छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली भरले. या परिषदेला विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेसच्या वतीने अस्पृश्यांच्या प्रतिनिधींच्या नेमनुकिसंबंधी सरकारला दिलेले निवेदन अस्पृश्यांच्या हिताला बाधक असल्याचे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिंदेंच्या धोरणांचा विरोध करून तसा ठराव परिषदेत संमत करून घेतला.

३० मे १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत, मुंबईतील कामगार मैदान, परेल येथे मुंबई प्रांताच्या महार परिषदेचे अधिवेशन हैद्राबाद संस्थानातील प्रख्यात पुढारी श्री. बी. एस. व्यंकटराव उर्फ हैद्राबादी यांचे अध्यक्षतेखाली संप्पंन्न झाली.

३० मे १९३७ – रोजी स्वतंत्र मजूर पक्षाच्या आमदारांच्या अभिनंदनासाठी परळ कामगार मैदानावर सभा. यावेळी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांना भाषणातून म्हणाले की, "केवळ निवडणुकीत विजय मिळविल्याने चळवळीचे कार्य संपले असे समजू नका."

३० मे १९५८ – रोजी सय्यद पिंपरी, जि. नाशिक येथे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते स्तूपाचे अनावरण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३१ मे २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, वेसाख मासो, शुक्रवार, वैशाख माहे.

*३१ मे १७२५ – अहिल्याबाई होळकर जयंती.

३१ मे १९२० – रोजी नागपूर येथे भारतीय बहिष्कृत वर्गाच्या परिषद अधिवेशनाचा दुसरा दिवस.

३१ मे १९३१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुक्काम वडनेर तालुका चांदवड जिल्हा नाशिक येथे युवकांना संदेश दिला की, "प्रत्येक गावात निर्भय तरुणांच्या संघटना स्थापन करून, लाठी चालविणे, व्यायाम करणे, शारीरिक खेळ शिकणे, वृत्तपत्र वाचणे आणि अज्ञानी लोकांना परिस्थितीबद्दल माहिती देणे यामुळे काम अधिक व्यापक बनते. मग आपल्या लढाईत यशस्वी होणे कठीण होणार नाही. खडतर परिस्थितीशी झगडुंनच समाजोन्नती शक्य आहे."

३१ मे १९३६ – रोजी पुरंदरे स्टेडियम दादर, मुंबई येथे हैद्राबादचे बी. एस. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अखिल मुंबई प्रांत महार परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "मुक्ती कौन (कोण) पथे" हे प्रसिद्ध भाषण केले.

३१ मे १९५२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेला कोलंबिया विद्यापीठाची एल. एल. डी. पदवी स्वीकारण्यासाठी जाणार असल्याने त्यांचे चाहते, अनुयायी, मित्र आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे कर्मचारी यांनी क्रिकेट क्लब ऑफ इंडिया येथे सत्कार जेवण प्रसंगी त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, वेसाख मासो, शनिवार, वैशाख माहे.

१ जून १८६९ – रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी छत्रपती शिवाजीराजं भोसले यांचा पोवाडा हा ग्रंथ प्रकाशित केला.

१ जून १८७३ – रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी गुलामगिरी ग्रंथ प्रकाशित केला.

१ जून १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत अखिल मुंबई प्रांत महार परिषद जोडून संत परिषद घेण्यात आली. त्यावेळी सभामंडपात साधूंनी माळा होमकुंडात टाकून दिल्या व धंम्मांतराला पाठिंबा जाहीर केला.

१ जून १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय परिषदेपुढे केलेल्या भाषणात राजकीय सुधारणांबाबत माहिती दिली. तसेच आपल्या भाषणात सांगितले की, "कायदे मंडळावर पक्षाचा लायक उमेदवारच निवडून आणा."

१ जून १९४२ – रोजी दुसऱ्या महार बटालियनची कामठी येथे स्थापना झाली.

१ जून १९५२ – रोजी कोलंबिया विद्यापीठाने बहाल केलेली एल. एल. डी. पदवी स्वीकारण्यासाठी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईहून विमानाने न्यूयॉर्कला पदवीदान समारंभासाठी प्रयाण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, वेसाख मासो, रविवार, वैशाख माहे.

२ जून १९१५ – रोजी भिमारावांनी सादर केलेला शोधनिबंध न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठाने स्वीकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एम. ए. ची पदवी बहाल केली.

२ जून १९३५ – रोजी मुंबई सरकारने डॉ. भीमराव आंबेडकरांची विधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमणूक केली.

२ जून १९३६ – रोजी मुंबईतील दादर नायगाव येथे झालेल्या अखिल मुंबई प्रांत महार परिषदेच्या मंडपात मातंग परिषदेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धंम्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देण्यात आला. भाषणात बाबासाहेब म्हणाले की, "धंम्मांतराने अस्पृश्यांना समानतेचा हक्क प्राप्त होणार आहे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, वेसाख मासो, सोमवार, वैशाख माहे.

३ जून १९२९ – रोजी श्री. गोविंदनाथ सुरेंद्र टिपणीस यांचे अध्यक्षतेखाली महाड, माणगाव तालुक्यातील अस्पृश्य लोकांची जाहीर सभा.

३ जून १९३५ – रोजी मुंबई शे. का. फे. ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

३ जून १९५३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती महिला मंडळाच्या सार्वजनिक सभेत रवली कॅम्प, शिवन, मुंबई येथे भाषण केले. त्यावेळी बाबासाहेबांनी आपल्या भाषणात सांगितले की, "बुद्ध जयंतीच्या दिवशी त्यांनी दिलेल्या भाषणावर कडाडून टीका केली गेली आणि श्रोतांना या टीकांनी गोंधळात न पडण्याची सूचना केली – लोकांनी टीकेची पर्वा न करता आपला मुक्तीचा कार्यक्रम चालू ठेवावा. "शिलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, वेसाख मासो, मंगळवार, वैशाख माहे.

४ जून १९१३ – रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बडोदा संस्थानची अट मान्य करून करारावर सही केली. सदर करारानुसार बाबासाहेबांनी संकल्पित विषयांचा अभ्यास अमेरिकेत करावा व नंतर १० वर्षे बडोदा सरकारची नोकरी करावी अशी अट घालण्यात आली.

४ जून १९२० – रोजी आकोट येथे ब्राम्हणेतर अकोला जिल्हा परिषद घेण्यात आली.

४ जून १९२७ – रोजी रात्री साडेआठ वाजता विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार, बहिष्कृत भारताचे संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत चिरा बाझार येथे बहिस्कृत वर्गाच्या झालेल्या जाहीर सभेत त्यांनी आपल्या भाषणात लोकांना स्पष्ट शब्दात समजावून सांगितले की, "स्वत:चा बचाव करण्यासाठी आपण स्वत:ला तयार केले पाहिजे. हे काम एक किंवा दोन लोकांचे नाही. यात बऱ्याच लोकांनी आपली छाती दाखवावी आणि शत्रूंसमोर त्यांची माणुसकी सिद्ध करावी आणि या कामात अनेकांचा बळी दिला जाईल. आमच्या पूर्वजांनी रणांगणात युद्ध केले. त्याने त्यांच्या मनगट हाताची शक्ती सिद्ध केली आहे. आता आपल्या बुद्धिमत्तेद्वारे आपण आज सामाजिक युद्धामध्ये आपले सर्वोत्तम स्थान प्राप्त केले पाहिजे. आपला उद्धार करायला आपणच कंबर कसली पाहिजे." हे ऐकल्यानंतर दोन–तीन तरुण उठले आणि त्यांनी नमन केले आणि म्हणाले – बाबासाहेब, आम्ही तुमच्या ध्वजाखाली लढायला तयार आहोत.

४ जून १९२९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकमत आजमाविण्यासाठी जळगाव आणि पाथरुड येथे धंम्मांतराची मर्यादित घोषणा करून हिंदूंच्या मनाचा ठाव घेण्याकरिता खडा टाकून पाहिल्यानंतर जळगावातील सुमारे १२ महारांनी मुसलमान धर्माची दीक्षा घेतली.

४ जून १९४७ – रोजी प्रा. डॉ. धंम्मानंद कोसंबी स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, वेसाख मासो, बुधवार, वैशाख माहे.

५ जून १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वाय. एम. बी. ए. कोलंबोद्वारा आयोजित श्रीलंकेतील कोलंबो येथे "यंगमेंस बुद्धिस्ट असोसियशन" च्या विश्व बौद्ध भातृत्त्व संमेलनात भारतातील बौद्ध धंम्माचा उदय आणि अस्त या विषयावर भाषण केले.

५ जून १९५२ – रोजी कोलंबिया विद्यापीठाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना डॉकटर ऑफ लॉ ही बहुमानाची पदवी प्रदान केली. पदवीच्या अवतरणात "भारतीय घटनेचे शिल्पकार, मंत्रीमंडळाचे सदस्य, राज्यसभेचे सभासद, भारतीय नागरिकांपैकी एक प्रमुख नागरिक, महान समाज सुधारक आणि मानवी हक्कांचा आधारस्तंभ असणारा एक पराक्रमी पुरुष." असे वर्णन केलेले आहे.

५ जून १९७२ – रोजी "जागतिक पर्यावरण दिन (World Environment Day.)" जागतिक पर्यावरण दिनाची स्थापना १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्टॉकहोम कॉन्फरन्स ऑन द ह्यूमन एन्व्हायर्नमेंट (५ जून १९७२) येथे केली, ज्याचा परिणाम मानवी संवाद आणि पर्यावरणाच्या एकात्मतेवर झालेल्या चर्चेतून झाला होता. दोन वर्षांनंतर, १९७४ मध्ये "फक्त एक पृथ्वी" या थीमसह पहिला जागतिक पर्यावरण दिन आयोजित करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

*जागतिक पर्यावरण दिन (World Environment Day)*

जागतिक पर्यावरण दिन (WED) दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख साधन आहे. १९७३ मध्ये पहिल्यांदा आयोजित करण्यात आलेले, ते सागरी प्रदूषण, जास्त लोकसंख्या, ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभोग आणि वन्यजीव गुन्हेगारी यांसारख्या पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी एक मंचक आहे. जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक मंचक आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर–सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम (विचार) आणि मंच प्रदान केला आहे.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी या दिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो.

इतिहास

जागतिक पर्यावरण दिनाची स्थापना १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्टॉकहोम कॉन्फरन्स ऑन द ह्यूमन एन्व्हायर्नमेंट (५ जून १९७२) येथे केली, ज्याचा परिणाम मानवी संवाद आणि पर्यावरणाच्या एकात्मतेवर झालेल्या चर्चेतून झाला होता. दोन वर्षांनंतर, १९७४ मध्ये "फक्त एक पृथ्वी" या थीमसह पहिला जागतिक पर्यावरण दिन आयोजित करण्यात आला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

कोणती झाडे लावायची?

१) गल्ली छोटी असेल तर घरापुढे कोणते झाडे लावता येवु शकतात?

☸️➡️ – अनंत, अडुळसा.

२) हाऊसिंग एरीयात घरापुढे?

☸️➡️ – बहावा, कांचन, चाफा, अशोकनिंब (बुचाचे), कैलाशपती, अंजनी, आंबा.

३) रस्त्याच्या बाजुला?

☸️➡️ – पिंपळ, वड, चिंच, फुलसावर.

४) मोकळ्या मैदानाजवळ?

☸️➡️ – पिंपळ, वड, आंबा, उंबर, कवठ, कडुलिंब, चिंच, बदाम, फुलसावर (रेनट्री).

५) गावाबाहेरील अदिवासी वस्तीत?

☸➡ – शक्यतो फळांचे, आंबा, सिताफळ, चिंच, चिकु, फणस, रिठा; जेणेकरून त्यांना उत्पन्न मिळेल.

६) नदी किनारी?

☸➡ – बांबु, पिंपळ, वड, चिंच, कडुलिंब,

७) शाळेच्या आवारात?

☸➡ – वड, बहावा, चाफा, तनिश, सावर, बदाम, कडुलिंब.

८) मंदिरा जवळ?

☸➡ – बकुळी, औदुंबर, बेल, पळस.

९) शेत बांधावर?

☸➡ – रेनट्री, कडुलिंब, आपटा, कांचन, बहावा, सुरू.

१०) ज्यांना कुठेच जागा नसेल त्यांनी जेथे झाड दिसेल किमान तेथे पाणी टाकावे.

कृपया निलगीरी, गुलमोहर, सप्तपर्णी आजीबात लावू नका. त्यांची गरम वाफ असते.

झाड लावल्यावर त्याच्याभोवती जाळी लोखंडाची बसवू नये. लोखंडामुळे जमिनीत झाडाजवळ लोह वाढते आणि वाढ खुंटते. त्यात लोखंडाची जाळी खर्चिक असते. त्याऐवजी तीन काठ्या खोचुन त्यावर जुनी साडी, गोणपाट किंवा हिरवी नेट फिरवू शकतात. किंवा काटेरी कुंपन, साबरीच्या फांद्या, किंवा काथ्या.

फक्त ६ महीने काळजी घेण्याची गरज आहे नंतर झाड आपोआप जगते–वाढते. घरातील सदस्याप्रमाणे प्रेम द्यायचे आहे बस्स.

खुप नका लावू प्रत्येकाने फक्त ३ झाडे दरवर्षी लावा..आणि जगवा.

झाडे कुठे मिळतील?

गटारी जवळ किंवा आडजागेवर वड, पिंपळाची रोपे उतरतात. ती काढुन पाण्यात टाकायची. ३ दिवसात त्यांना मुळे फुटतात. ती कोकोपीट मधे लावल्यास रोप लवकर वाढते.

कोकोपीट कसे बनवायचे?

नारळाच्या शेंड्या बारीक करुन मातीत मिक्स करायच्या बस्स.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, वेसाख मासो, गुरूवार, वैशाख माहे.

६ जून १८७६ – रोजी महास्थविर चंद्रमणी जयंती.

*६ जून १९२७ – रोजी महाडच्या चवदार तळ्यातील दंगेखोरांना न्यायाधीशाने चार (४) महिन्याची सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावल्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असे उद्गार काढले की, "न्यायालयातील मुख्याधिकारी स्पृश्य हिंदु असते तर आपल्याला कदाचित न्याय मिळाला नसता. पेशव्यांचे राज्य असते तर अशा सामाजिक बंडखोरांना हत्तीच्या पायाखाली देण्यात आले असते."*

६ जून १९४० – रोजी विधान सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "महार वतन बिल" मांडले.

६ जून १९४० – रोजी घटना समितीने संघराज्याची मूलतत्त्वे ठरविण्यासाठी एक उपसमिती गठित केली होती. या उपसमितीचे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभासद होते.

६ जून १९५० – रोजी श्रीलंकेत २५ मे ते ६ जून १९५० या कालावधीत बौद्धांच्या जागतिक फेलोशिपचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बी. आर. आंबेडकरांनी परिषदेत भाग घेतला. कोलंबो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय यंगमेंस बुद्धिस्ट असोसियशनच्या तरुणांपुढे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "बौद्ध धंम्म स्वीकारल्यानंतर अशोक यांनी देवपूजा प्रथा बंद केल्या आणि अशा देवतांच्या मूर्ती काढून टाकल्या. अशोक म्हणाले होते, ज्योतिपुंज असलेल्या बुद्धांमध्ये माझा आदर असल्यामुळे इतर कोणत्याही दैवताची उपासना करण्याची गरज नाही. अशोकाच्या कृतीने ब्राम्हण खूप अस्वस्थ झाला. कारण त्यामुळे त्यांचे उदरनिर्वाह आणि त्यांचे शोषण करण्याचे अनुचित साधन थांबले. या नुकसानीचा बदला घेण्याचे त्यांनी ठरविले!"

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 भदंत महास्थविर चंद्रमणी जन्मदिन 💎🦚🦚🦚☸☸

जन्मदिन – ६ जून १८७६ (ब्रह्मदेश); स्मृतीदिन – ८ मे १९७२.

पूज्य चंद्रमणी यांचा जन्म १८७६ मध्ये ब्रह्मदेशातील आराकान प्रांतात झाला. ब्रह्मदेशातील बहुसंख्य लोक बौद्ध. ते भारताकडे पवित्र भावनेने पाहतात, कारण तेथे गौतम बुद्धांनी आपला धंम्म प्रस्थापित केला व तो जगातील इतर भागांत पसरत गेला. ब्रह्मदेश हा अशा भागांपैकी एक भाग होय. पूज्य चंद्रमणी १६ वर्षांचे असताना (१८८९) भारतात बौद्ध तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी आले. ज्या भारतात बौद्ध धंम्म निर्माण झाला त्या धंम्माला भारतात बहुसंख्येने अनुयायी नसावेत, हे दृश्य पाहून पूज्य चंद्रमणी यांना अत्यंत आश्चर्य आणि दुःख वाटले.

भारतात राहून बौद्ध धंम्म प्रसाराचे कार्य करण्याचे त्यांनी ठरविले आणि ते १८८९ पासून भारतातच राहिले. भगवान बुद्ध यांचे महानिर्वाण ज्या गावाच्या शिवेत झाले ते कुशीनगर हे गाव त्यांनी आपल्या कार्याचे केंद्र बनविले. या ठिकाणी त्यांनी बुद्ध जयंती आणि बौद्ध धंम्मीयांची संमेलने भरविण्याचा पायंडा घातला. आणि त्यानंतर भारतातील इतर ठिकाणी हे कार्यक्रम होऊ लागले. बौद्ध धंम्माचे उच्च शिक्षण आणि वाङ्मय प्रसार या कामासाठी त्यांनी शेकडो तरुण तरुणींना प्रोत्साहन दिले. काही जणांना सिलोन, जपान, ब्रह्मदेश वगैरे बौद्ध धंम्मीय देशांत पाठवून त्यांना बौद्ध धंम्माचे उच्चतम शिक्षण घेण्यास लावले. या तरुणांपैकी दोघांनी बौद्ध धंम्माचा स्वीकार केला. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून आपल्या विद्वत्तेचा फायदा जगाला करून दिला. ते दोन बौद्ध पंडित म्हणजे आनंद कौसल्यायन आणि राहुल सांकृत्यायन. राहुल सांकृत्यायन यांनी तिबेट मध्ये राहून बौद्ध धंम्माची हजारो हस्तलिखिते मिळविली आणि ती भारतात दहा बारा गाढवांच्यावर लादून आणली. बौद्ध धंम्मावरील जगातील अधिकृत लेखकांच्या पंक्तीमध्ये राहुल सांकृत्यायनांचे स्थान फार वरचे आहे, ते त्यांच्या प्रदीर्घ अभ्यासामुळे व प्रयत्नांमुळे.

पूजनीय चंद्रमणी यांनी कुशिनारा येथे धंम्मशाळा, दवाखाने, स्तूप वगैरे बांधले. गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी कुशिनारा येथे ज्या इमारती बांधल्या त्यांची किंमत चाळीस वर्षा पूर्वी सात लाख रुपये होती. पूजनीय चंद्रमणी यांनी ब्रह्मी आणि हिंदी भाषेत बौद्ध धंम्मावर विद्वत्ताप्रचुर असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी धम्मपद, मंगलसूक्त, भगवान बुद्धाचे चरित्र, बुद्धाचे उपदेश, वगैरे ग्रंथ प्रमुख आहेत. अशा ऐंशी वर्षांच्या आणि महाविद्वान बौद्ध भिक्खूच्या हातून दीक्षा घेण्याचे बाबासाहेबांनी ठरविले. बाबासाहेबांनी त्यांना पत्र लिहून नागपूरच्या धम्मदीक्षा सोहळ्याचे आमंत्रण दिले. पूजनीय चंद्रमणी यांनी बाबासाहेबांचे आमंत्रण स्वीकारले आणि भारतातील ऐतिहासिक धम्मदीक्षा त्यांच्या हातून झाली.

संदर्भ :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड १२

#भदंत_चंद्रमणि_महास्थविर...

– भारतीय उप महाद्विप विशेषत भारत आणि नेपाळ देशात बौद्ध धम्माचे पुनःउद्धारक.

– बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना बौध्द धम्म दिक्षा देणारे.

• जन्म – ६ जून १८७३, बरमा (म्यानमार) देशातील अराकान प्रदेशातील अक्याब जिल्हातील म्रोहाऊ तालुक्यातील पौपंग्वांड गाव या ठिकाणी झाला. हे ठिकाण रच्छौ नदी च्या किनाऱ्यावर होते.

• लहानपणापासून चिंतनशील स्वभावाचे होते. दुखी प्राणी यांना बघून त्यांची चिंता स्वभावतः वाढत असायची.

• १८८३ वयाच्या ७ व्या वर्षी शिक्षणासाठी प्रधान महास्थविर यांच्याकडे प्रस्थान. काही वर्षांतच वर्णमाला, परित्त पाठ आणि कच्चायन व्याकरण यात पारंगत झाले.

• १८८६ वयाच्या १० व्या वर्षी गृहत्याग. आणि २ वर्षांनी भंते ऊ चंदिमा यांच्याद्वारे प्रवजित झाले.

• यानंतर श्रामणेर चंदा नाव देण्यात आले. पुढे चंद्रमणी नावाने ओळखले जाऊ लागले.

• भारतात बौध्द धम्म प्रचारक अनागरिक धम्मपाल यांनी बर्मा देशात जावून भंते ऊ चंदीमा यांना योग्य बौध्द धम्म प्रचारक भारतात पाठवावा अशी विनंती केली.

• १८९१ साली भंते ऊ चंदीमा यांनी श्रामणेर चंदा, श्रामणेर सुरिय आणि सोबत बालक सदोऊ यांना धम्म प्रचारासाठी भारतात पाठविले.

• भारतात कोलकाता वरून बौद्धगया इथे आले. बौद्धगयेमध्ये बर्मा देशाचे राजा तिबो यांनी बांधलेल्या विहारात श्रीलंकन लोकासमवेत राहून बोधिवृक्षाची सेवा आणि तथागत भगवान बुद्ध वंदना यात मग्न झाले.

• त्याकाळी ईतर धर्मीय महंत यांचा तिथे रहिवाशी म्हणून वावर होता. एके दिवशी बौध्द विहारात आक्रमण करून वास्तव्यास असलेल्या भिक्खूना मारपीट केली.

• ह्या घटनेनंतर श्रामणेर चंदा कलकत्ता येथे निघून गेले आणि तिथे राहून आधुनिक आणि प्राच्य भारतीय भाषेचे अध्ययन केले.

• वरील बौध्दगयेतील घटनेने ते व्यतिथ होते आणि नंतर त्या कारणाने ते १८९२ साली बर्मा परत गेले.

• ज्या वृत्तपत्रांनी भारतात आल्यावर स्तुती सुमने उधळली होती त्यांनीच उद्देश पूर्ण न करता बर्मा देशात परत गेल्याने निंदा केली.

• आपल्या गुरूंची पुनः आज्ञा घेऊन १८९३ साली ते परत भारतात आले. कलकत्ता इथे राहून आपले अध्ययन सुरू ठेवले.

• पुढे १८९५ साली एका बर्मी उपासकाकडे भिक्षाटन करताना त्यांची भेट भंते महावीर महास्थविर यांच्याशी झाली. पुढे भंते महावीर यांनी श्रामणेर चंदा यांची राहण्याची आणि अध्ययन करण्याची सोय आपल्याकडेच करून घेतली.

• भंते महावीर यांच्याकडे राहून श्रामणेर चंदा यांनी संस्कृत, पाली, बंगाली, हिंदी इत्यादि भाषांचे अध्ययन सुरू केले आणि काही दिवसातच संस्कृत व्याकरण आणि ईतर भाषांमध्ये पारंगत झाले.

• पुढे भंते महावीर यांच्या सांगण्यावरून ते गाजीपुर येथील मगहर ठिकाणी संस्कृत भाषेचे अध्ययन सुरू केले. येथे त्यांनी लघु सिद्धांत कौमुदी, सिद्धांत कौमुदी आणि अनेक काव्य ग्रंथाचे, कोषाचे अध्ययन केले.

• पुढे श्रामणेर चंदा १८९८ साली ते कुशीनगर इथे आले.

• १८९८ साली भंते महावीर कुशीनगर येथे महापरिनिर्वाण धंम्मशाळा आणि विहार निर्माण कार्यात मग्न होते. श्रामणेर चंदाही त्यांच्यासोबत कार्यात सहभागी झाले.

• १९०२ साली विहार निर्माणचे काम पुर्ण झाले. भारताच्या कानाकोपऱ्यातील आयुर्वेद आणि ज्योतिषच्या विद्वानांना भेटून त्यांच्याकडून आयुर्वेद आणि ज्योतिष शास्त्राचे अध्ययन केले. काही दिवसांत ह्यात ते पारंगत झाले.

• पुढे काही दिवस कुशीनगर येथे राहिल्यावर ते १८९९ साली पाली साहित्यच्या अध्ययनसाठी बर्मा देशात परत गेले. तिथे महास्थवीर आचार्य ऊ सागर यांच्याकडे त्यांनी पाली त्रिपिटकचे अध्ययन केले. त्यापाठोपाठ सम्पूर्ण पाली साहित्य आणि बौद्ध दर्शनचे अध्ययन केले.

• ९ फेब्रुवारी १९०३ साली त्यांची उपसम्पदा झाली. उपसम्पदेनंतर त्यांचं नाव भिक्खू ऊ चंद्रमणि ठेवण्यात आले. बर्मा देशात मौलसीन नगर येथील वैजयंत महाविहार मध्ये राहून त्यांनी त्रिपिटक ग्रंथांचा पुनः अध्ययन केले.

• त्यानंतर कुशीनगर येथे परत आले ते कायमचे स्थायिक होऊन बहुजन हिताय बहुजन सुखाय हितांसाठी अविरतपणे कार्य करीत राहिले.

• १८७६ साली महापरिनिर्वाण मुद्रेतील तथागत भगवान गौतम बुद्धांची मूर्ती प्राप्त झाली होती. तेव्हा छोटेसे विहार बांधून सुरक्षित करण्यात आले होते. तेथील कारभार ईतर धर्मीयांच्या हाती होता. भंते चंद्रमणी यांनी भारतातून इग्लंडला पत्रव्यवहार करून, स्वतः प्रत्यक्ष भेटी देऊन ह्यावर समाधान मिळवले.

• १९०४ साली बौद्धांच्या हाती विहाराचा अधिकार आला.

• भंतेनी बौध्द धम्माच्या प्रचारार्थ अनेक निर्माण कार्य केले.

१९०२ – कुशीनगर मध्ये निर्वाण धर्मशाळा.

१९१० – सारनाथ येथे बर्मी धर्मशाळा.

१९२६ – महानिर्वाण स्तूप कुशीनगर.

१९२८ – कुशीनगर येथे माथाकुवार विहार.

१९२९ – निःशुल्क पाठशाळा.

१९३६ – कुशीनगर येथील सीमा विहार इत्यादि.

• तसेच श्रावस्ती येथील बर्मी बौद्ध विहार, लुम्बिनी येथील बौद्ध विहार, बलरामपुर येथील बौद्ध धर्मशाळा, महावीर जूनियर हाईस्कूल कुशीनगरच्या निर्माणसाठी खूप सहाय्य केले.

• ह्याव्यतिरिक्त कुशीनगर मध्ये आरकानी धर्मशाळा, आणि बसही कुटी इत्यादी महत्वपूर्ण भवनांचे निर्माण करवून घेतले.

• ह्यासोबतच शिक्षा क्षेत्रामध्ये पण अनेक कार्य केले. ह्याचाच एक प्रत्यय म्हणू १९२९ साली श्रीलंकेच्या शिष्य श्रद्धानंद यांच्या साहाय्याने चंद्रमणि निःशुल्क प्राइमरी पाठशाळा ला सुरू केली.

• १९२९ मध्ये बुद्ध हाई स्कूल ची सुरुवात केली. जे पुढे जावून बुद्ध इंटर कॉलेज आणि त्यानंतर बुद्ध स्नात्कोत्तर महाविद्यालय मध्ये परिवर्तित झाले.

• १९३६ मध्ये महापरिनिर्वाण संस्कृत पाठशाळा सुरू केले जे आज कसियाच्या शिव मंदिर येथे सुरू आहे.

• १९४४ मध्ये महावीर जूनियर हाई स्कूल स्थापित करून कुशीनगर व आस–पासच्या ग्रामीण जनतेला शिक्षित बनविले.

• भंते चंद्रमणी जेव्हापर्यंत कुशीनगर येथे राहत होते तोपर्यंत शेकडो रोगी लोकांचे चिकित्सा करत होते. त्या रोगासंबधित दवा बनविण्यासाठी ३–४ सेवक नेहमी असायचे.

• देश–विदेशातील असंख्य विद्यार्थी और भंतेना उपासक–उपासिका ह्यांना पाली, संस्कृत आणि ज्योतिष विद्याची शिक्षा प्रदान केली आणि पुढे ते सर्वजण आपापल्या विद्येत पारंगत होऊन आपापल्या क्षेत्रात निघून गेले.

• भंते चंद्रमणी यांनी अनाथांची सेवा आपल्या अंतिम क्षणापर्यंत करीत राहिले. अध्यापन कार्यासोबतच त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आणि अनेक ग्रंथांचे अनुवादनही केले.

• १९०९ साली धम्मपदचे हिंदी अनुवाद केले. मंगल सुत्ताचे देवनागरी लिपीत लिहिले.

• भगवान तथागत गौतम बुद्ध यांचे जीवन चरित्र हिंदी भाषेत लिहिले. तसेच रम्भा शुक संवाद, महासति पट्ठान सुत, विरबल विनोद व स्वरोदय नामक ग्रंथ यांचे बर्मी भाषेमध्ये अनुवाद केले.

• धम्म चक्क पवत्तन सुत्तं, अनन्त लखण सुत्त, संगीति सुत्तं, सिंगालो वाद सुत्तं, महापरिनिब्बान सुत्तं इत्यादि ग्रंथांचे हिंदी मध्ये अनुवाद केले.

• कुशीनगर जवळील लोकांना बौद्ध धम्माची दिक्षा देऊन पुढे भंते बनविण्यात आले. ह्यात भंते अच्चुतानंद, भंते धंम्मरक्षित, भंते जिनानंद, भंते प्रशावंश, भंते सत्यानंद, भंते विजयानंद, भंते संघरक्षित, भंते विसुद्धानंद, भंते रसबोधि इत्यादि प्रमुख होते.

• बर्मा, श्रीलंका, थाईलैंड, जापान, चीन, मंगोलिया, तिब्बत मध्येसुद्धा ह्यांचे अनेक शिष्य राहिले आहेत. ह्या व्यतिरिक्त राहुल सास्कृत्यायन, भंते जगदीश कश्यप, भंते आनंद कौसल्यायन ह्या सर्वांचे प्रेरक हेच होते.

• १९४४ साली थेरवादी बौद्ध धम्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी नेपाळला गेले. तिथे नेपाळ धर्मोदय सभाची स्थापना केली. काही दिवसांत त्यांनी अनेक उपासक व उपासिकाना थेरवादी बौद्ध धम्माच्या अध्ययनसाठी बर्मा आणि श्रीलंका देशात पाठविले. ह्यांच्या प्रभावाने प्रेरित होऊन अनेक लोकांनी उपसम्पदा ग्रहण केली.

• १९५४ मध्ये बर्माच्या ६ व्या संगिती समारोह मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी बर्मा येथे भेट झाली. ह्यांच्या धम्मदेसनेंशी संतुष्ट होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोटी अनुयायी समवेत १४ ऑक्टोबर १९५६ नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.

• ८ मे १९७२ साली सकाळी ९ वाजून ४५ मिनिटांनी कुशीनगर येथे परिनिर्वाण झाले.

🌼🏵️🌻🌸🌼🌺🌼

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, जेठ्ठ मासो, शुक्रवार, जेष्ठ माहे.

७ जून १९२० – रोजी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन फंड संस्था स्थापन केल्याबद्दल राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र.

७ जून १९४१ – रोजी "दंगा झाला दंगा झाला, काही उपाय नाही त्याला." विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जनता वृत्त पत्रात अग्रलेख.

७ जून १९४५ – रोजी विधान सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्यकारी परिषदेत अनुसूचित जातींचे पुरेसे प्रतिनिधित्त्व करण्याची करण्याची मागणी करण्यासाठी फील्ड मार्शल लॉर्ड व्हिस्कोल वेव्हल यांना पत्र लिहिले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, जेठ्ठ मासो, शनिवार, जेष्ठ माहे.

८ जून १९२७ – रोजी कोलंबिया विद्यापीठाने विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना "पी. एच. डी. Doctor of Philosophy Degree पदवी" प्रदान केली. प्रबंधाचा विषय :– The Evolution of Provincial Finance in British India.

८ जून १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दामोदर गृह, मुंबई येथे मिलिटरी पेंशनर्सची सभा.

८ जून १९३२ – रोजी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांना खुले करण्याच्या महाड कोर्टाचे (न्यायालयाचे) सब जज व्ही. आर. सराफ ह्यांच्या निकालाविरुद्ध महाडच्या सवर्ण हिंदू फिर्यादिने जिल्हा न्यायालयात ठाणे येथे अपील केले.

८ जून १९५८ – रोजी दलित साहित्य संघाच्या नाट्यशाखेचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या हस्ते मुंबई येथे उद्घाटन झाले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ९ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, जेठ्ठ मासो, रविवार, जेष्ठ माहे.

९ जून १९०० – रोजी बिरसा मुंडा स्मृतिदिन. ९ जून १९०० रोजी ब्रिटिशांनी तुरुंगात असतांना बिरसा मुंडाला हळू विष दिले, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. बिरसा मुंडा यांची गणना महान देशभक्तांमध्ये केली जाते. ते भारतीय इतिहासातील एक (१) नायक होते, ज्यांनी आपल्या झारखंड, भारतमध्ये क्रांतिकारक विचारसरणीच्या काळात १९ साव्या शतकाच्या उत्तरार्धात आदिवासी समाजाची स्थिती आणि दिशा बदलून नवीन सामाजिक व राजकीय युग सुरू केले.

९ जून १९२० – रोजी भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर येथे झालेले स्वागत व विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण 'दैनिक महाराष्ट्र टाइम्स' मध्ये प्रसिद्ध झाले.

९ जून १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसद अपात्रता प्रतिबंधक विधेयक Parliament Prevention of Disqualification Bill यावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १० जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, जेठ्ठ मासो, सोमवार, जेष्ठ माहे.

१० जून १९२६ – रोजी 'जागतिक दृष्टिदान दिन World Eye Donation Day' डॉ. रामचंद्र लक्षमण भालचंद्र यांच्या स्मृती प्रित्यर्थ. यांचा जन्म १० जून १९२६ लां झाला व मृत्यू १० जून १९७९ रोजी झाला. भारतात अंधत्व दूर करण्यासाठी स्वतंत्रपणे राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम सन १९७६ पासून राबविण्यात येतो. डॉ. भालचंद्र हे प्रख्यात नेत्र शल्य विशारद होते. त्यांनी त्यांच्या कालावधीत १०००० यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या. त्यांनी केलेल्या कार्याचा सन्मान 'जागतिक दृष्टिदान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

१० जून १९२९ – रोजी मद्रास (चेन्नई) येथे ब्राम्हण आदि द्रविड या समाजातील वधु वरांचा विवाह.

१० जून १९३६ – रोजी इटालियन बौद्ध भिक्षू रे लोकनाथ यांनी धंम्मांतराविषयी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजगृह येथे भेट घेतली जेणें करून ते त्यांना बौद्ध धंम्मात परिवर्तनासाठी राजी करू शकतील.

१० जून १९५० – रोजी "घटनात्मक नितीचे काटेकोरपणे पालन करा." विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विधान मंडळामध्ये लेजिस्लेटिव्ह चेंबर त्रिवेंद्रम येथे आवाहन. चेंबरच्या मोठ्या सभागृहात सरकारी अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि अस्पृश्य बांधव–भगिनींची गर्दी होती.

१० जून १९५६ – रोजी दिल्लीत आंबेडकर भवनाच्या मैदानावर एक बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये ३०,००० याहून अधिक लोकसमुदाय उपस्थित होते. या सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले की, "भगवान बुद्धांनी त्यांच्या अनुयायांना सांगितले की, त्यांनी काळजीपूर्वक विचार करून कोणतीही गोष्ट पूर्णपणे स्वीकारली पाहिजे. विचार न करता काहीही स्वीकारू नका. मनुष्य स्वभावतः स्वतंत्र आहे, म्हणूनच मी तुम्हाला मुक्त विचारप्रणालीचा स्वतंत्र निडर नागरिक होण्यासाठी सांगेन."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

World Eye Donation Day :– नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन दरवर्षी १० जून हा दिन 'जागतिक दृष्टिदान दिन' (World Eye Donation Day) म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून लोकांमध्ये नेत्रदानाची जनजागृती केली जाते. सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. आर. ए. भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिन 'दृष्टिदान दिन' म्हणून साजरा केला जातो.

जागतिक दृष्टीदान दिनाचं महत्त्व नेमकं काय?

जागतिक दृष्टीदान दिनाचं सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजेच लोकांना नेत्रदानाचं महत्त्व पटवून देणे आणि नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्याची प्रतिज्ञा घेण्यास प्रवृत्त करणे असा आहे. भारतासह अनेक देशांमध्ये आजही अंधत्व ही मुख्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार कार्निया संबंधित आजार, मोतीबिंदू आणि काचबिंदू नंतर होणाऱ्या दृष्टी हानि आणि अंधत्वच्या मुख्य कारणांपैकी आहे.

डोळ्यांची काळजी कशी घ्यावी?

१. निरोगी आहाराचे सेवन करावं :– आपल्या आहारात हिरव्या पालेभाज्या, अंडी, बीन्स, आणि गाजराचा समावेश जास्तीत जास्त करावा.

२. धूम्रपान सोडावं :– धूम्रपान केल्यामुळे मोतीबिंदू, ऑप्टिक आणि मज्जातंतूच्या नुकसानासह दृष्टी संबंधित समस्या उद्भवतात.

३. सनग्लासेस वापरा :– सूर्याच्या थेट प्रकाशापासून वाचण्यासाठी यूव्ही सनग्लासेस वापरणे. हे आपल्या डोळ्यांचा संरक्षणासाठी चांगले आहेत.

४. टीव्ही बघताना किंवा संगणकावर काम करतांना अँटी ग्लेयर चष्माचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.

५. कमी प्रकाशात वाचू नका :– डोळ्यांच्या त्रासांसाठी हे देखील कारणीभूत असतं.

६. डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमाने डोळ्यांची तपासणी करा.

७. खिडकी किंवा दिव्यांमधून येणार थेट प्रकाश संगणकावर पडू देऊ नये. डोळ्यांवर चकाकी पासून वाचण्याचा प्रयत्न करा. गरज असल्यास अँटी ग्लेयर स्क्रीनचा वापर करा.

८. उन्हात बाहेर जात असताना सनग्लासेस घाला. सनग्लासेस धोकादायक अल्ट्रा व्हायलेट 'ए' आणि अल्ट्रा व्हायलेट 'बी' किरणांना रोखतात.

९. जर तुम्ही पॉवर लेन्स वापरत असाल तर नक्कीच सनग्लासेस घाला ज्यामुळे UV किरणांचा डोळ्यांना त्रास होणार नाही.

१०. दररोज किमान दोन लिटर पाणी प्यावे ज्यामुळे डोळे आणि त्वचेचा डिहायड्रेट होत नाही.

११. प्रत्येक अर्ध्या तासाने डोळ्यांना ५–१० मिनिटे विश्रांती देण्यास विसरू नका.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ११ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, जेठ्ठ मासो, मंगळवार, जेष्ठ माहे.

११ जून १८८५ – रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांनी मराठी लेखक परिषदेला पत्र लिहिले. त्यांनी शुद्रांच्या हक्कांबद्दलही सांगितले आणि शुद्रांशी होणाऱ्या व्यवहाराबद्दलही त्यांनी लिहिले. हे पत्र नंतर ११ जून १८८५ च्या "ज्ञानोदय वृत्तपत्र" यामधे प्रकाशित झाले.

११ जून १९५० – रोजी सिद्धार्थ कॉलेज विद्यार्थी संसदेत हिंदू कोड बिलावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष व्याख्यान.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १२ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, जेठ्ठ मासो, बुधवार, जेष्ठ माहे.

१२ जून १९२० – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी डिप्रेस्ड क्लास वसतिगृहास ५००० रुपयांची देणगी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावे पाठविली.

१२ जून १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अकोला येथे प्रायमरी शाळेसमोरील मंडपात सरदार बुधालिंग ऑ मॅजिस्ट्रेट अध्यक्ष यांच्यासमवेत झुणका भाकर सहभोजन.

१२ जून १९५१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे भाषण केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, "मी पाहिले की आमच्यातील काहींनी आपल्या जातीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी मतदार संघात प्रवेश करणे बंधनकारक आहे. तेव्हा सर्व दरवाजे आणि खिडक्या आमच्यासाठी बंद होत्या. माझा स्वतःवर विश्वास नव्हता, परंतु तरीही मी उभे राहून बंगालमधून निवडणूक जिंकली. त्यावेळी, संपूर्ण देशासाठी मी काहीही करेन याची मला कल्पना नव्हती. देशाची घटना घडविण्याची जबाबदारी माझ्या खांद्यावर टाकली गेली. आता मला ते जाणवत आहे. ही माझ्यासाठी आणि समाजासाठी एक सुवर्णसंधी होती. या घटनेची रचना करून मी हिंदूंना समजाऊन सांगितले जे गेल्या २० वर्षांपासून मला व माझ्या पक्षाला देशद्रोही म्हणत आहेत, ते पूर्णपणे चुकीचे आहे."

१२ जून १९५५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथील सर्व भारतीयांनी बौद्ध धंम्म स्वीकारावा असे आवाहन केले.

१२ जून २००२ – रोजी World Anti–Child Labor Day जागतिक बालकामगार विरोधी दिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 World Anti–Child Labor Day जागतिक बालकामगार विरोधी दिन. 💎🦚🦚🦚☸☸

जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे. हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (आयएलओ) १२ जून २००२ रोजी केली. बाल कामगारांच्या जागतिक स्थितीवर लक्ष केंद्रित करणे आणि बालमजुरी पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे या उद्देशाने जागतिक बालकामगार विरोधी दिन साजरा करण्यात येतो.

जागतिक बाल कामगार विरोधी दिवसाचा इतिहास :–

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना ही संयुक्त राष्ट्रांची शाखा आहे. ही संघटना कामगार आणि कामगारांच्या हक्कांसाठी नियम बनवते, त्यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेला यासाठी अनेक वेळा पुरस्कारही देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावर बाल कामगार थांबविणे किंवा बंदी घालण्याचा आग्रह धरला होता. त्यानंतर २००२ मध्ये सर्वानुमते कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे श्रम करणे हा गुन्हा मानला जातो. यावर्षी प्रथमच १२ जून रोजी बाल कामगार निषेध दिन साजरा करण्यात आला.

भारतात बाल कामगार निषेध दिन :–

भारतात बाल कामगारांची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. भारतात बाल कामगारांची सुद्धा तस्करी केली जाते. या संदर्भात केंद्र आणि राज्य सरकार कौतुकास्पद पावले उचलत आहेत. यासाठी १९८६ मध्ये पहिला बाल कामगार बंदी आणि नियमन कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार १४ वर्षाखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर ठरविले गेले. याद्वारे भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद २३ मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. तर कलम ४५ अंतर्गत देशातील सर्व राज्यांना १४ वर्षाखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १३ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, जेठ्ठ मासो, गुरूवार, जेष्ठ माहे.

१३ जून १९२९ – रोजी महाडच्या चवदार तळ्यासंबंधीचा दावा सब जज वि. वि. पंडित यांनी काढून टाकला. त्यामुळे महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले झाले.

१३ जून १९३३ – रोजी संयुक्त समितीच्या सभासदांची विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कडून साक्ष तपासण्यात आली.

१३ जून १९३६ – रोजी दामोदर गृह मुंबई येथे देवदासी, मुरळ्या, जोगतिनी आदि स्त्रियांची परिषद संप्पंन्न झाली.

१३ जून १९४९ – रोजी हिंद पार्लमेंटला प्रांत विषयक कायदे करण्याचा ठराव घटना समितीत पास.

१३ जून १९५३ – रोजी "लोकशाही फसल्यास साम्यवाद" या विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बीबीसीवर मुलाखत प्रकाशित झाली.

१३ जून १९६९ – रोजी आचार्य प्रल्हाद अत्रे स्मृतीदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸💐💐💐💎 *सविनय जयभीम* 💎💐💐💐☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १४ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, जेठ्ठ मासो, शुक्रवार, जेष्ठ माहे.

१४ जून १९२८ – रोजी बहिष्कृत हित्कारिणी सभा विसर्जित करून विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ आणि भारतीय समाज शिक्षण प्रसारक मंडळ या संस्था स्थापन केल्या.

१४ जून १९३२ – रोजी गोलमेज परिषदेचे काम संपले.

१४ जून १९४१ – रोजी देविदास कांबळे या मातंग विद्यार्थ्याच्या पत्राला विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जनता वृतपत्रामधून उत्तर.

१४ जून १९५२ – रोजी कोलंबिया विद्यापीठाने बहाल केलेली एल. एल. डी. Doctor of Law ही पदवी स्वीकारल्यानंतर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे न्यूयार्ककडून विमानाने मुंबईलां परतले.

१४ जून १९५२ – रोजी "अमेरिकेतील अनुभव" या विषयावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुलाखत.

१४ जून २००४ – रोजी जागतिक रक्तदाता दिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸💐💐💐💎 जागतिक रक्तदाता दिन. 💎💐💐💐☸☸

जागतिक रक्तदात्या दिनाचा इतिहास :

जगभरातील अनेक देशांमध्ये दरवर्षी १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिन साजरा केला जातो. १८६८ मध्ये १४ जून रोजी कार्ल लँडस्टाइनर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी जागतिक रक्तदाता दिन साजरा केला जातो. एबीओ रक्तगट प्रणालीच्या शोधासाठी लँडस्टाइनर यांना नोबेल पारितोषिक देण्यात आले. निरोगी व्यक्तीने स्वेच्छेने आणि विनाशुल्क सुरक्षित रक्तदान (त्याच्या उत्पादनांसह) करण्याची गरज याबद्दल जनजागृती करण्यासाठी २००४ मध्ये हा कार्यक्रम पहिल्यांदा सुरू करण्यात आला. रक्तदाते या दिवशी महत्त्वाची भूमिका बजावतात कारण ते गरजू व्यक्तीला जीवनरक्षक रक्त देणगी देतात.

जागतिक रक्तदाता दिन :

२००४ मध्ये "जागतिक आरोग्य संघटना, रेड क्रॉस आणि रेड क्रेसेंट सोसायटीजचे आंतरराष्ट्रीय संघ" यांनी दरवर्षी १४ जून रोजी साजरा करण्यासाठी याची सुरुवात केली आणि स्थापना केली. जागतिक रक्तदात्या दिनाची स्थापना जागतिक आरोग्य संघटनेने त्याच्या १९२ सदस्य राष्ट्रांसह मे २००५ मध्ये ५८ व्या जागतिक आरोग्य सभेत अधिकृतपणे केली. या दिनाची स्थापना जगभरातील सर्व देशांना रक्तदात्यांना त्यांच्या मौल्यवान पावलाबद्दल धन्यवाद देण्यासाठी, पुरेसा रक्तपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी स्वेच्छेने, सुरक्षित आणि न चुकता रक्तदान करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी करण्यात आली.

जागतिक रक्तदात्या दिन साजरा करणे हा सर्व रक्तदात्यांसाठी राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर तो साजरा करण्याची तसेच कार्ल लँडस्टाइनर (एबीओ रक्तगट प्रणालीच्या महान शोधासाठी नोबेल पारितोषिक जिंकणारे एक महान शास्त्रज्ञ) यांच्या वाढदिवसाचे स्मरण करण्याची एक मौल्यवान संधी घेऊन येतो.

जागतिक रक्तदाता दिन का साजरा केला जातो?

जगात कुठेही गरजू व्यक्तीला रक्त संक्रमण आणि रक्त उत्पादने संक्रमणाची गरज पूर्ण करण्यासाठी जागतिक रक्तदाता दिन साजरा केला जातो. ही मोहीम दरवर्षी लाखोंहून अधिक लोकांचे जीव वाचवते आणि रक्त घेणाऱ्यांच्या चेहऱ्यावर एक नैसर्गिक हास्य आणते. रक्त संक्रमण विविध जीवघेण्या आरोग्य समस्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मदत करते आणि त्यांना दीर्घ आणि दर्जेदार आयुष्य जगण्यास उत्तेजन देते. जगभरातील अनेक जटिल वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया प्रक्रिया सोडवते. गर्भधारणेपूर्वी आणि नंतर महिलांची काळजी घेण्यासाठी ही मोहीम जीवनरक्षक भूमिका बजावते.

२०१३ मध्ये जागतिक रक्तदाता दिन साजरा करण्याचे आयोजन फ्रान्सने "त्यांच्या राष्ट्रीय रक्तसेवा, आस्थापना फ्रँकाइस डू संग (EFS) द्वारे" केले होते. १९५० पासून फ्रान्स स्वेच्छेने आणि विनाशुल्क रक्तदानाच्या प्रचारात सहभागी आहे. २०१३ च्या उत्सवाचे घोषवाक्य "जीवनाची भेट द्या: रक्तदान करा" असे होते, जेव्हा त्यांनी रुग्णांना रक्तदानाचे मूल्य केंद्रित करून १० वा वर्धापन दिन साजरा केला.

जागतिक रक्तदाता दिन २०२५: इतिहास

१९४० मध्ये आधुनिक रक्तसंक्रमणाचा पाया घातला गेला, जेव्हा शास्त्रज्ञ रिचर्ड लोअर यांनी प्रतिकूल परिणामांशिवाय दोन कुत्र्यांमध्ये यशस्वीरित्या रक्त संक्रमण केले. या यशामुळे आरोग्यसेवेत सुरक्षित रक्तदान आणि रक्तसंक्रमण पद्धतींचा मार्ग मोकळा झाला. २००५ मध्ये, जागतिक आरोग्य सभेने १४ जून हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून घोषित केला आणि तेव्हापासून तो जागतिक स्तरावर साजरा केला जात आहे.

जागतिक रक्तदाता दिन २०२५: महत्त्व

२०२५ चा जागतिक रक्तदाता दिन रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यावर आणि आरोग्यसेवेच्या गरजांसाठी शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतो. रक्त आणि प्लाझ्मा देणग्यांच्या महत्त्वाच्या मागणीबद्दल जनजागृती करणे, ते जीव कसे वाचवतात यावर भर देणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. हे नवीन आणि नियमित रक्तदात्यांना वारंवार योगदान देण्यास प्रोत्साहित करते, ज्यामुळे स्थिर आणि पुरेसा रक्तसाठा राखण्यास मदत होते.

याव्यतिरिक्त, हा दिवस रक्तदात्यांच्या सखोल प्रभावावर प्रकाश टाकतो, त्यांच्या निःस्वार्थ कृतींद्वारे एकता, करुणा आणि समुदायाच्या मूल्यांना प्रोत्साहन देतो. शेवटी, हा उपक्रम सरकार आणि विकास भागीदारांकडून राष्ट्रीय रक्त कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आणि त्यांना बळकटी देण्यासाठी पाठिंबा मिळवून देण्याचा प्रयत्न करतो, जेणेकरून जगभरातील प्रत्येकासाठी सुरक्षित रक्त संक्रमण उपलब्ध होईल याची खात्री होईल. या प्रयत्नांद्वारे, जागतिक रक्तदाता दिन जागतिक आरोग्यसेवा आव्हानांना तोंड देण्यासाठी सामूहिक कृतीला प्रेरणा देतो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १५ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, जेठ्ठ मासो, शनिवार, जेष्ठ माहे.

१५ जून १९२९ – रोजी धारवाड येथील बहिष्कृत विद्यार्थी आश्रमात प्रवेश घेण्याविषयी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाहीर पत्र.

१५ जून १९३६ – रोजी हिंदू महासभेचे नेते डॉ. मुंजे यांनी मुंबईतील राजगृह येथे विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन शिख धर्म स्वीकारण्याचे सुचविले.

१५ जून १९४९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत निवडणूक कमिशनचे बिल सदर केले.

१५ जून १९५२ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अमेरिकेतील अनुभव या विषयावर वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींशी मुलाखत.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १६ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, जेठ्ठ मासो, रविवार, जेष्ठ माहे.

*१६ जून १९१० – रोजी जागतिक पितृदिन.

दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारी जागतिक पितृदिन साजरा केला जातो. जागतिक फादर्स डे हा वार्षिक उत्सव आहे जो संपूर्ण कुटुंब आणि समाजात वडील बजावत असलेल्या महत्त्वाच्या भूमिकेचा सन्मान आणि कौतुक करण्यासाठी जागतिक स्तरावर केला जातो.

युरोपातील कॅथोलिक देशांमध्ये, मध्ययुगापासून १९ मार्च हा दिवस सेंट जोसेफ डे म्हणून साजरा केला जात आहे. युनायटेड स्टेट्समध्ये, १९१० मध्ये सोनोरा स्मार्ट डॉड यांनी वॉशिंग्टन राज्यात फादर्स डेची स्थापना केली होती. फादर्स डे हा लिथुआनिया आणि स्पेनच्या काही भागांमध्ये एक मान्यताप्राप्त सार्वजनिक सुट्टी आहे आणि त्यामध्ये असे मानले जाते. इटली १९७७ पर्यंत. हा एस्टोनिया, सामोआ आणि दक्षिण कोरियामध्ये राष्ट्रीय सुट्टी आहे. जिथे तो पालक दिन म्हणून साजरा केला जातो . शीख लोक २९ डिसेंबर रोजी गुरू गोविंद सिंग यांचा जन्मदिवस फादर्स डे साजरा करतात.*

१६ जून १९३३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांची मुंबई मधील मणिभुवन येथे मुलाखत.

१६ जून १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथील पोयबावडी वरिल दामोदर गृहामध्ये देवदासी, मुरळ्या, जोगतीणी, आराधिनी व पोतराज यांच्या धर्मांतराला पाठिंबा देणाऱ्या परिषदेत भाषण देतांना ते म्हणाले की, "आपण आमच्याबरोबर धंम्मांतर करीत आहात की नाही, या गोष्टीचे माझ्यासाठी फारसे महत्त्व नाही. पण मी तुम्हाला उद्युक्त करतो की तुम्ही आमच्याबरोबर यावे अशी इच्छा असल्यास आपले लाजिरवाणे जीवन सोडून द्या."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १७ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, जेठ्ठ मासो, सोमवार, जेष्ठ माहे.

१७ जून १३९९ – संत कबीर जयंती.

१७ जून १६७४ – रोजी राजमाता जिजाऊ स्मृतिदिन (तारखेप्रमाणे).

१७ जून १९३१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे त्रिचुर येथील विधुर मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या संयोजकांना आव्हान केले की, "काँग्रेसची मदत घेऊ नका."

१७ जून १९३८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर धुळे खानदेश येथे कोर्टाच्या कामानिमित्त गेले असता शाळा क्रमांक ५ च्या पटांगणावर भरलेल्या जाहीर सभेत त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "राजकारणातील आपली प्रगती ब्रम्हदेवही थांबऊ शकणार नाही." काम पूर्ण झाल्यानंतर बाबासाहेबांनी वकिलांच्या विनंतीचा सन्मान करत बार लायब्ररीत गेले. काकासाहेब बर्वे यांच्याकडून चहाची व्यवस्था होती.

१७ जून १९४७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील सर्व संस्थांना आव्हान केले की, "सर्व संस्थांनी भारतात विलीन व्हावे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १८ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, जेठ्ठ मासो, मंगळवार, जेष्ठ माहे.

१८ जून १५९५ – रोजी गुरु हरगोविदसिंह जयंती.

१८ जून १९२९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लंडन विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी Master of Science देण्यात आली. Thesis "Provincial Decentralization."

१८ जून १९३३ – रोजी नागपूर जिल्हा दलित परिषदेचे अधिवेशन बाबूळखेडा येथे झाले.

१८ जून १९३७ – रोजी डॉ. मुंजे यांनी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेतली.

१८ जून १९३८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धुळे खानदेश जिल्ह्यातील लळिंग येथे जाहीर सभेत भाषण करून, महार सैनिकांनी प्रशंसा केली. तसेच सार्वजनिक विहिरीवर पाणी भरून आपला माणुसकीचा हक्क प्रस्थापित करण्यास सांगितले.

१८ जून १९३९ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सकाळी १० वाजता मुंबईतील परळ येथील आर. एम. भट येथील हायस्कूलमध्ये केलेल्या भाषणात त्यांनी दीड वर्षापूर्वीचे शब्द वापरले की, "अस्पृश्य समाजाच्या सार्वजनिक कामासाठी मुंबईत मोठी इमारत उभारणे आवश्यक आहे. मी हे देखील म्हटले होते की हे कार्य पूर्ण करण्यासाठी महार जातीने त्यामध्ये सर्वात सक्रिय असणे आवश्यक आहे आणि निधी गोळा केला पाहिजे. माझ्या माहितीनुसार काही विभागात काम करणाऱ्या लोकांनी अडीच हजार रुपये जमा करून पैसे जमा केले आहेत."

१८ जून १९५१ – रोजी भारतीय संविधानमध्ये पहिली घटनादुरुस्ती करण्यात आली. या घटनादुरुस्तीद्वारे कलम १९ मध्ये दिलेल्या स्वातंत्र्याच्या हक्कांवर बंधने घालण्यात आली होती. पुढील परिस्थिती ही बंधने घालण्यात आली. सामाजिक सुरक्षा, परकीय राष्ट्रांबरोबरचे मैत्रीचे संबंध, व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला इत्यादी.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १९ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, जेठ्ठ मासो, बुधवार, जेष्ठ माहे.

१९ जून १९१० – रोजी पितृदिन वडील दिवस वडिलांसाठी उत्सव. हे आपल्या पूर्वजांच्या स्मृती आणि सन्मानार्थ देखील साजरे केले जाते. फादर्स डे जगभरात विविध तारखांना साजरा केला जातो – चुकीच्या माहितीमुळे आणि वेस्ट व्हर्जिनियाने पहिल्या फादर्स डेची सुट्टी म्हणून नोंदणी न केल्यामुळे, इतर स्त्रोतांचा असा विश्वास आहे की पहिला फादर्स डे दोन वर्षांनंतर १९ जून १९१० रोजी, स्पोकेन, वॉशिंग्टनच्या सोनोरा स्मार्ट डोडच्या प्रयत्नातून फेअरमॉन्ट, वेस्ट व्हर्जिनिया येथे साजरा करण्यात आयोजित करण्यात आला होता. या विशेष दिवसाचे आयोजन श्रीमती ग्रेस गोल्डन क्लेटन यांनी काही महिने अगोदर ६ डिसेंबर १९०७ रोजी पश्चिम व्हर्जिनियामधील मोनोंगा येथे खाण अपघातात मृत्यू झालेल्या २१० वडिलांच्या सन्मानार्थ केले होते. पहिले फादर्स डे चर्च आजही फेअरमॉन्टमध्ये सेंट्रल युनायटेड मेथोडिस्ट चर्च म्हणून अस्तित्वात आहे.

१९ जून १९२४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांना पुत्र झाला. त्याचे नाव राजरत्न असे ठेवले होते.

१९ जून १९३७ – रोजी सी. पी. एंड. बेरार दलित फेडरेशनचे समाजकल्याण मंत्री श्री. विठ्ठलराव साळवे यांचे पत्रक जनता वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध.

१९ जून १९३८ – रोजी सायंकाळी साडेआठ वाजता डॉ.बाबासाहेब चाळीसगाव येथे दाखल झाले. बाबासाहेबांनी जेवण घेतल्यावर बोर्डिंग पाहिले. त्यानंतर चाळीसगाव येथील अस्पृश्य विद्यार्थी बोर्डिंगसमोर पटांगणातील प्रचंड सभेत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, "- जे इतरांवर विश्वास ठेवतात त्यांना काम नसते. म्हणून आपण आपले कार्य स्वत:च केले पाहिजे. - मी गांधींच्या कार्याची काळजी घेत नाही. गांधींच्या मुठीत काँग्रेस आहे. गांधी बोलतात आणि काँग्रेस त्या प्रमाणे करते. जर आपण १५ वर्ष एकजूट झालो तर मला खात्री आहे की तुमचंच राज्य असेल. तुम्ही सर्व मला देव म्हणता. पण मी देव नाही तर महार आहे.

१९ जून १९४५ – रोजी राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त पुथुवायिल नारायण पणिकर यांचा सन्मान. "भारताच्या ग्रंथालय चळवळीचे जनक" असे टोपणनाव.

१९ जून १९५० – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीतर्फे अस्पृश्य व गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून मिलिंद महाविद्यालय याची स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 पितृदिन वडील दिवस वडिलांसाठी उत्सव. 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

फादर्स डे हा वडिलांच्या सन्मानार्थ मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाणारा सण आहे ज्यामध्ये पितृत्व, पितृत्व आणि समाजातील वडिलांचा प्रभाव साजरा केला जातो. अनेक देशांमध्ये तो जूनच्या तिसऱ्या रविवारी साजरा केला जातो आणि इतर देशांमध्ये इतर दिवशी साजरा केला जातो. आईच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा मदर्स डे याला पूरक आहे.

इतिहास :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस पितृत्व आणि पुरुष पालकत्वाचा सन्मान करण्यासाठी मातृदिनाचा पूरक उत्सव म्हणून पितृदिनाची सुरुवात झाली. हे आपल्या पूर्वजांच्या स्मृती आणि सन्मानार्थ देखील साजरे केले जाते. फादर्स डे जगभरात विविध तारखांना साजरा केला जातो – भेटवस्तू देणे, वडिलांसाठी विशेष जेवण आणि कौटुंबिक क्रियाकलाप. लोकप्रिय समजुतीच्या विरोधात, फादर्स डे प्रत्यक्षात प्रथम १९ जून १९१० रोजी फेअरमॉन्ट, वेस्ट व्हर्जिनिया येथे साजरा करण्यात आला. या विशेष दिवसाचे आयोजन श्रीमती ग्रेस गोल्डन क्लेटन यांनी काही महिने अगोदर ६ डिसेंबर १९०७ रोजी पश्चिम व्हर्जिनियामधील मोनोंगा येथे खाण अपघातात मृत्यू झालेल्या २१० वडिलांच्या सन्मानार्थ केले होते. पहिले फादर्स डे चर्च आजही फेअरमॉन्टमध्ये सेंट्रल युनायटेड मेथोडिस्ट चर्च म्हणून अस्तित्वात आहे.

चुकीच्या माहितीमुळे आणि वेस्ट व्हर्जिनियाने पहिल्या फादर्स डेची सुट्टी म्हणून नोंदणी न केल्यामुळे, इतर स्त्रोतांचा असा विश्वास आहे की पहिला फादर्स डे दोन वर्षांनंतर १९ जून १९१० रोजी, स्पोकेन, वॉशिंग्टनच्या सोनोरा स्मार्ट डोडच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आला होता. तिला इतर वडिलांच्या सन्मानार्थ हा उत्सव साजरा करायचा होता, जसे की तिचे वडील, विल्यम स्मार्ट, एक निवृत्त सैनिक ज्याने सोनोरा १६ वर्षांची असताना त्यांच्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांच्या सहाव्या मुलाच्या जन्मानंतर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚🔵🔵🔵💎 राष्ट्रीय वाचन दिनानिमित्त पुथुवायिल नारायण पणिकर यांचा सन्मान 💎🔵🔵🔵🦚🦚🦚☸☸

साक्षरता आणि ग्रंथालयांसाठी चॅम्पियन असलेल्या पुथुवायिल नारायण पणिकर यांच्या सन्मानार्थ भारत १९ जून रोजी राष्ट्रीय वाचन दिवस साजरा करतो. "भारताच्या ग्रंथालय चळवळीचे जनक" असे टोपणनाव असलेले पणिकर यांचा असा विश्वास होता की शिक्षण आणि पुस्तके ही प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

त्यांच्या समर्पणामुळे १९४५ मध्ये केरळच्या पहिल्या सार्वजनिक वाचनालयाची स्थापना झाली आणि राज्यव्यापी ग्रंथालय चळवळीला प्रेरणा मिळाली. त्यांचे योगदान ओळखण्यासाठी, १९ जून हा राष्ट्रीय वाचन दिवस १९९६ मध्ये घोषित करण्यात आला. या दिवशी, भारतीयांना पुस्तक उचलून वाचन क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

राष्ट्रीय वाचन दिवसाचा इतिहास :

पी. एन. पणिकर यांनी केरळ ग्रंथशाळा संघम (KGS) द्वारे केरळच्या साहित्यिक दृश्य आणि प्रसिद्ध त्रावणकोर पॅलेस लायब्ररीच्या वाढीचे नेतृत्व केले. मूलतः त्रावणकोर लिटररी असोसिएशन असे नाव असलेल्या केजीएसची सुरुवात ४७ स्थानिक ग्रंथालयांच्या नेटवर्कने झाली. पणिकर यांच्या नेतृत्वाखाली, शिक्षण थेट समुदायांपर्यंत पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित केले.

अंतरीक्ष रिअल्टर्स प्रा. लि. :

१९५६ मध्ये केरळ राज्याच्या निर्मितीनंतर, KGS ने नाटकीयरीत्या विस्तार केला आणि त्याच्या नेटवर्कमध्ये १६०० पेक्षा जास्त ग्रंथालये जोडली. पॅनिकरच्या दूरदृष्टी आणि नेतृत्वाने KGS ला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून दिली, १९७५ मध्ये त्यांचा प्रतिष्ठित UNESCO Krupsakaya पुरस्कार प्राप्त झाला.

राष्ट्रीय वाचन दिनाचे महत्त्व :

राष्ट्रीय वाचन दिन PN पणिकर यांचा सन्मान करतो, ज्यांनी भारतात वाचनाची आवड निर्माण केली. "वाचनाचे जनक" असे टोपणनाव असलेले पणिकर यांचे १९ जून १९९५ रोजी निधन झाले. त्यांचा वारसा त्यांनी स्थापन केलेल्या केरळमधील पहिल्या सार्वजनिक वाचनालय सनदना धर्म ग्रंथालयापासून सुरू झाला. या कायद्यामुळे राज्यव्यापी ग्रंथालय चळवळ उभी राहिली.

केरळ राष्ट्रीय वाचन दिवसाच्या वर आणि पलीकडे जातो. ते प्रत्येक वर्षी १९ जून रोजी सुरू होणारा वायन वरम नावाचा समर्पित "वाचन सप्ताह" साजरा करतात. पणिकरचा प्रभाव केरळ असोसिएशन फॉर नॉन–फॉर्मल एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट (KANFED) पर्यंत विस्तारला. कानफेडने विशेषत: ग्रामीण भागात निरक्षरता कमी करण्यात आणि शिक्षणाचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पणिकर यांच्या प्रयत्नांमुळे केरळला साक्षरतेत अग्रेसर बनण्यास मदत झाली. राष्ट्रीय सर्वेक्षणे राज्याचे उच्च साक्षरता दर दर्शवतात, त्याच्या चळवळीच्या चिरस्थायी प्रभावाचा पुरावा. राष्ट्रीय वाचन दिवस हा पुस्तकांमध्ये सापडलेल्या आनंदाची आणि ज्ञानाची आठवण म्हणून काम करतो, हा संदेश पणिकरने आयुष्यभर जिंकला होता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २० जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, जेठ्ठ मासो, गुरूवार, जेष्ठ माहे.

२० जून १९१६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोटीने लंडनला पोहोचले.

२० जून १९२१ – रोजी "प्रोव्हिंशियल डिसेंटलायाझेशन ऑफ इंपरियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया" या प्रबंधावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लंडन विद्यापीठाने एम. एस. सी. ही बहुमाणाची पदवी बहाल केली.

२० जून १९२८ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई विधीमंडळात ऑन स्मॉल होलडर्स रिलीफ बिल या विधेयकावर प्रभावी भाषण.

२० जून १९३१ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पनवेल जवळील चिरनेर खेड्यात जंगल सत्याग्रहमधील तीन आरोपी यांच्या वतीने मुद्देसूद आणि परिणामकारक असा बचाव कोर्टात मांडला.

*२० जून १९३९ – रोजी आचार्य प्रल्हाद अत्रे स्मृतिदिवस निमित्त दामोदर गृह, मुंबई येथे देवदासी प्रथेवर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.*

२० जून १९४६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या अधिपत्याखाली मुंबई येथे सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, जेठ्ठ मासो, शुक्रवार, जेष्ठ माहे.

२१ जून १८९४ – रोजी सातारा जिल्ह्यातील महार सैनिक व अधिकारी यांच्यामार्फत सरकारला पहिला अर्ज रामजीबाबा आंबेडकर यांनी पाठविला.

२१ जून १९२७ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गव्हर्नमेंट लॉ कॉलेज मुंबई येथे प्राध्यापक पदी नियुक्ती.

२१ जून २०१४ – रोजी आंतरराष्ट्रीय (विश्व/जागतिक) योग दिन. ११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात योग साजरा केला जातो, त्याची ओळख म्हणून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. योग व्यायामामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे दिसून आले आहेत, प्राचीन भारतात उगम पावलेल्या या निरोगीपणाच्या पद्धतीचा जागतिक स्तरावर प्रचार करणे संयुक्त राष्ट्रांनी महत्त्वाचे मानले होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 आंतरराष्ट्रीय (विश्व/जागतिक) योग दिन. 💎🦚🦚🦚☸☸

योग दिनासाठी पुढाकार भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या संयुक्त राष्ट्रांच्या भाषणात घेतला होता, आणि संबंधित ठरावाला व्यापक जागतिक पाठिंबा मिळाला, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत १७७ राष्ट्रांनी सह–प्रायोजकत्व घेतले, जिथे तो एकमताने मंजूर झाला. त्यानंतर, २१ जून २०१५ रोजी न्यू यॉर्क, पॅरिस, बीजिंग, बँकॉक, क्वालालंपूर, सोल आणि नवी दिल्लीसह जगभरात पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन यशस्वीरित्या साजरा करण्यात आला.

११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात योग साजरा केला जातो, त्याची ओळख म्हणून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. योग व्यायामामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे दिसून आले आहेत, प्राचीन भारतात उगम पावलेल्या या निरोगीपणाच्या पद्धतीचा जागतिक स्तरावर प्रचार करणे संयुक्त राष्ट्रांनी महत्त्वाचे मानले होते.

☸☸🦚🦚🦚💎 २०२५ थीम: एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग. 💎🦚🦚🦚☸☸

या वर्षी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" या संकल्पनेसह साजरा केला जात आहे, जो वैयक्तिक आरोग्य आणि ग्रहांचे आरोग्य अविभाज्यपणे जोडलेले आहेत या महत्त्वाच्या सत्याचे प्रतिध्वनी करतो. योग शरीराला बळकटी देतो, मन शांत करतो आणि दैनंदिन जीवनात जागरूकता आणि जबाबदारीची भावना वाढवतो. ही जागरूकता एखाद्याला निरोगी आणि अधिक शाश्वत जीवनशैली निवडण्याची परवानगी देते. स्वतःची काळजी घेताना, आपण पृथ्वीची काळजी घेण्यास सुरुवात करतो, वसुधैव कुटुंबकम – जग एक कुटुंब आहे या चिरस्थायी भारतीय नीतिमत्तेचे प्रतिबिंब.

योग म्हणजे काय आणि आपण तो का साजरा करतो?

योग ही एक प्राचीन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पद्धत आहे जी भारतात उगम पावली. 'योग' हा शब्द संस्कृतमधून आला आहे आणि त्याचा अर्थ जोडणे किंवा एकत्र येणे असा होतो, जो शरीर आणि चेतनेच्या मिलनाचे प्रतीक आहे.

आज जगभरात ते विविध स्वरूपात पाळले जाते आणि त्याची लोकप्रियता वाढतच आहे.

११ डिसेंबर २०१४ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला.

आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचे उद्दिष्ट जगभरात योगाभ्यासाच्या अनेक फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिन स्थापन करण्याचा मसुदा ठराव भारताने मांडला होता आणि त्याला विक्रमी १७५ सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली होती. हा प्रस्ताव सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६९ व्या महासभेच्या उद्घाटनप्रसंगी आपल्या भाषणात मांडला होता, ज्यामध्ये ते म्हणाले होते: "योग ही आपल्या प्राचीन परंपरेची एक अमूल्य देणगी आहे. योग मन आणि शरीर, विचार आणि कृती यांच्या एकतेचे प्रतीक आहे... एक समग्र दृष्टिकोन [जो] आपल्या आरोग्यासाठी आणि आपल्या कल्याणासाठी मौल्यवान आहे. योग केवळ व्यायामाबद्दल नाही; तो स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकतेची भावना शोधण्याचा एक मार्ग आहे."

या ठरावात "व्यक्ती आणि लोकसंख्येने निरोगी निवडी करणे आणि चांगल्या आरोग्याला चालना देणाऱ्या जीवनशैलीच्या पद्धतींचे पालन करणे" हे महत्त्वाचे नमूद केले आहे. या संदर्भात, जागतिक आरोग्य संघटनेने त्यांच्या सदस्य राष्ट्रांना त्यांच्या नागरिकांना शारीरिक निष्क्रियता कमी करण्यास मदत करण्याचे आवाहन केले आहे, जे जगभरातील मृत्यूच्या दहा प्रमुख कारणांपैकी एक आहे आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या असंसर्गजन्य रोगांसाठी एक प्रमुख जोखीम घटक आहे.

पण योग हा केवळ शारीरिक हालचालींपेक्षा जास्त आहे. त्याच्या सर्वात प्रसिद्ध अभ्यासकांपैकी एक, दिवंगत बीकेएस अय्यंगार यांच्या शब्दांत, "योग दैनंदिन जीवनात संतुलित दृष्टिकोन राखण्याचे मार्ग विकसित करतो आणि एखाद्याच्या कृती करण्याच्या कौशल्याला बहाल करतो."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, जेठ्ठ मासो, शनिवार, जेष्ठ माहे.

२२ जून १९३६ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धंम्मांतर संकल्पास पाठिंबा मिळण्यासाठी डॉ. मुंजे मुंबईतून रवाना झाले.

२२ जून १९४० – रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी बॅरिस्टर जीना, स्वातंत्र्यवीर सावरकर व विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेतली.

२२ जून १९४७ – रोजी मुंबईतील सिद्धार्थ कॉलेजच्या पटांगणात विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री. दादासाहेब गायकवाड यांना थैली अर्पण करण्यात आली. त्यावेळी बाबासाहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, "मला कर्तृत्ववान माणसे पाहिजे त्यांच्या कर्तृत्त्वाबद्दल माझी खात्री झाली पाहिजे. मला फक्त कामाशी घेणेदेणे आहे, निवडणुकीशी नाही.

२२ जून १९८८ – रोजी भदंत आनंद कौसल्यायन स्मृतिदिन.

२२ जून २०२४ – रोजी जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि).

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🔵🔵🔵 जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵☸☸

१. पहिली घटना : ब्रम्हदेशाचे दोन व्यापारी तपस्सू व भल्लिक यांना उपासक केले. २. दुसरी घटना : त्या दोन व्यापाऱ्यांच्या विनंतीवरून भगवान बुद्धांनी त्यांना केश धातू भेट दिले. ३. तिसरे महत्व : तथागत भगवान बुद्धांनी सेनानी कन्या सुजाताला सेनानी गावात जाऊन धम्माचा उपदेश केला. ४. चौथी घटना : सम्राट अशोक महानने आपले पुत्र महेंद्र व पुत्री संघमित्राला बोधिवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेत पाठविले होते. ५. पाचवी घटना : भिक्खू महेंद्र यांचे निर्वाण.

प्रत्येक पौर्णिमा तथागत बुद्धांच्या कोणत्या न कोणत्या जीवन घटनेशी रेखांकित करते.

१. पहिले उपासक तपुस्स आणि भल्लीक यांची धम्मदीक्षा :

भगवंतास ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर एक महिना बोधिवृक्षाखाली राहिले आणि पाचव्या आठवड्यात ते गोथर्ड च्या पर्वताकडे गेले आणि एक आठवडा तेथे वास्तव्य केले. नंतर मुचलिंद नावाच्या पर्वताकडे आपला मोर्चा वळवला. तेथील राजयतन वृक्षाखाली एक आठवडा वास्तव्य केले. पुढील आठवड्याच्या शेवटच्या दिवशी त्यांच्या दिशेने येतांना दोन गृहस्थ दिसले. ते दोन गृहस्थ म्हणजे तपुस्स आणि भल्लीक गे दोन बंधू होते. ते दोन बंधू व्यापारी होते. ते पाच गाड्यावर माल लादून त्या रस्त्याने जात होते. व्यापारी बंधूंना भगवंत दिसताच त्यांना वंदन करून त्यांच्या जवळ असलेल्या मध व पोळ्या दिल्या व खाद्यपदार्थ स्वीकारण्याची विनंती केली. भगवंतांनी त्यांची भेट स्वीकारली. आपली भेट स्वीकारल्याचे पाहून त्या व्यापाऱ्यांनी भगवंतास वंदन केले आणि आम्ही आपणास शरण आलो आहोत. आपले अनुयायी म्हणून धम्माचे सर्व नियम आम्ही पाळू व आम्हास सदधम्माची दिक्षा द्यावी अशी नम्र प्रार्थना केली.

भोजन झाल्यावर तथागताने या व्यापाऱ्यांना आपला पहिला धम्म उपदेश केला. दोन सरणं देऊन त्यांना उपासक केले. दोन सरणं म्हणजे "बुद्धं सरणं गच्छामि | धम्मं सरणं गच्छामि ||" तेव्हा भगवंतांनी त्यांना उपासक या नावाने संबोधले व त्यांना धम्मात प्रवेश दिला. त्यावेळी संघ नावाची संस्था अस्तित्वात नव्हती. ज्या दिवशी ह्या दोन व्यापारी बंधूना सदधम्माची शिकवण देऊन उपासक म्हणून दीक्षित केले तो दिवस जेष्ठ पौर्णिमा होय.

भगवान बुद्धाच्या उपासनेचे काही तरी साधन असावे म्हणून अशी इच्छा व्यक्त केली तेव्हा भगवंतांनी त्यांचे आठ केस जटा स्मृतिचिन्ह म्हणून दिले. त्या व्यापाऱ्यांनी ब्रम्हदेशात जाऊन भगवान बुद्धांच्या केश धातूवर १५० फुट उंच स्तूप बांधलेला आहे. तेथील लोक प्रत्येक जेष्ठ पौर्णिमेला फार श्रद्धेने जमतात आणि पूजापाठ, वंदना, प्रवचन यांचे ओयोजन केले जाते. हा स्तूप आजही ब्रम्हदेशात आहे.

२. जेष्ठ उपासिका सुजातास धम्मदिक्षा :

बुद्धगया येथे ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर तेव्हा त्यांना सुजाताने चैत्र पौर्णिमेला अर्पण केलेल्या खीर ची आठवण झाली आणि सुजाताला दिलेल्या वचनाची (सत्याचा मार्ग प्राप्त झाल्यानंतर मला येऊन भेटावे.) आठवण झाली. त्या वचनपूर्ती साठी सुजताचा शोध घेतला. सुजताच्या पतीस व तिचा पुत्र यश यास सदधम्माची दिक्षा दिली. सुजाताचे वाराणसीत एकमेव कुटुंब होते की ज्यांनी सर्वप्रथम सहपरिवार दिक्षा ग्रहण केली. सुजाता विषयी भगवंत म्हणाले की "भिक्खुंनो ! माझ्या उपासिकांमध्ये प्रथम येणाऱ्या मध्ये सुजाता सर्वश्रेष्ठ आहे." सहपरिवार सुजातास दीक्षित केलेला दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

३. संघमित्रा आणि महेंद्र यांनी श्रीलंकेत बोधिवृक्ष लावला :

सम्राट अशोकांनी जेव्हा त्यांचे धम्मगुरु महास्थाविर मोग्गलीपुत्त तिस्स यांना विचारणा केली की "मला धम्माचा दायाद बनण्यासाठी आणखी काय करावे लागेल? तेव्हा भन्ते म्हणाले "जो कोणी आपला स्वतःचा मुलगा मुलगी धम्मास दान देतो त्यांना धम्मामध्ये प्रवज्जीत करून भिक्खू बनवितो तोच 'दायक' आणि 'दायाद' या दोन्ही उपाधीसाठी पात्र बनतो." तेव्हा सम्राट अशोकाने आपला पुत्र महेंद्र आणि पुत्री संघमित्रा यांना प्रवज्जा धारण करणार का? अशी विचारणा केली तेव्हा दोघांनीही उत्तर दिले की "आपली इच्छा असेल तर आम्ही आजच प्रवज्जीत होऊ, प्रवज्जा ग्रहण केल्याने आमचे व आपलेही कल्याण होईल असे आम्हाला वाटते." यानुसार आपल्या पित्याच्या इच्छेपोटी महेंद्र आणि संघमित्रा यांनी गृहस्थ जीवनाचा त्याग करून प्रवज्जा घेतली. त्यावेळी महेंद्रचे वय २० वर्षे तर संघमित्राचे वय १९ वर्षे होते.

महापती महेंद्र यास प्रवज्जीत होऊन बारा वर्षे झाल्यानंतर त्यांच्या उपाध्यायाने (मोग्गलीपुत्त तिस्स) आणि संघाने त्यांना लंकाद्वीप मध्ये जाऊन बौद्ध धम्माच्या स्थापनेची आज्ञा केली, ती शिरसावंद्य मानून स्थविर उपाध्यायांना वंदन करून सोबत पांच स्थविर इत्थिया, उत्तिया, संबला, भद्दसला आणि सामनेर सुमना सोबत घेऊन धम्माचा प्रचार व प्रसारासाठी लंकाद्वीप गाठले. तो दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

पुढे काही वर्षांनी भिक्खूनी माता संघमित्राशी बोधिवृक्षाच्या फांदीसह स्थविर महेंद्र यांनी श्रीलंकेस बोलवून घेतले. संघमित्रा अनेक श्रामनेरी सोबत घेऊन लंका द्विपातील अनुराधापूर येथे जम्बुद्वीपातून आणलेली बोधिवृक्षाची एक शाखा तेथील राजा देवानंप्रिय तिस्सला भेटून लावली व तेथे भिक्खूनी संघ स्थापन केला. आजही अनुराधपूर येथे त्या फांदीपासून निर्माण झालेला वृक्ष उभा आहे. हा बोधिवृक्ष भगवान बुद्धांनी दुःख मुक्तीसाठी सांगितलेल्या आर्य अष्टांगिक मार्गाचे पालन करण्यासाठी सर्व मानवामध्ये उत्साह निर्माण करण्याचे महान कार्य करीत आहे. संघमित्रा विवाहित होती व तिला सुमन नावाचा मुलगा होता. आपल्या वडिलांच्या सूचनेवरून ती वयाच्या १९ व्या वर्षी भिक्खूनी झाली. तिचा मुलगाही श्रामणेर झाला व पुढे अर्हंत पदाला पोहचला.

३ अ. थेरी संघमित्ता कृतज्ञता दिवस :

सम्राट अशोकाची कन्या अरहंत थेरी संघमित्रा हिचे जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) दिवशी श्रीलंकेत आगमन झाले होते. ज्या सौम्य शितल बौधीवृक्षाखाली सिध्दार्थ गौतमाला संम्बोधी प्राप्त झाली होती, त्या पवित्र बोधीवृक्षची शाखा, इतर बरेच धार्मिक साहित्य व सहकारी घेऊन थेरी संघमित्ता हिने श्रीलंकेत प्रवेश केला होता त्या स्मृतिप्रीत्यर्थ जेष्ठ पौर्णिमेला मोठा स्मरणोत्सव साजरा केला जातो.

थेरी संघमित्ता हिच्या श्रीलंका भेटीमुळे पवित्र बोधीवृक्षची शाखा अनुराधापूर येथे स्थापना झाली. तसेच भिक्खूणी संघाची स्थापना झाली. या दोन अतिशय महत्त्वाच्या प्रसंगामुळे स्त्रियांच्या आध्यात्मिक उत्थानाला प्रेरणा व बळ मिळाले. मानसिक निष्क्रियता आणि आध्यात्मिक उदासिनता यातून त्यांची निश्चितच मुक्तता झाली. आंतरिक उंची आणि नैतिक उन्नती साधण्याकरिता त्यांना धैर्य प्राप्त झाले.

भगवान बुद्धाच्या विचारांच्या सुप्रसिद्ध शिष्येने अर्थात थेरी संघमित्ताने जो भिक्खूणी संघ निर्माण केला. त्यामुळे अनेक स्त्रियांना भिक्खूणी बनण्याची प्रेरणा मिळाली. थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील स्त्रियांमध्ये जो अथक उत्साह आणि आध्यात्मिक उर्जा संचारित केली. त्यामुळे अनेक स्त्रियांनी भिक्खूणी संघात प्रवेश केला. त्यांनी उच्च आदर्शाचे जीवन अंगीकारून उत्कृष्ट धम्मपोदेश म्हणून नावलौकिक मिळविला.

थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील अनुराधापूर येथे लावलेला बोधीवृक्ष आध्यात्मिक आदेशांचे मूर्त रूप आहे. तो श्रीलंकेतील जनतेमध्ये धम्मभावना चेतविण्यास कारणीभूत ठरला

आहे. बुध्दाच्या अतुलनीय गुणांचे स्मरण आणि चिंतन अनेक स्त्रियांना आणि भिक्खूणीना करून देण्याची प्रेरणा ही बोधीवृक्षमुळे मिळाली आहे. श्रीलंकेच्या इतिहासात बोधीवृक्ष आणि त्याचा आसपासचा परिसर हे राष्ट्रीय सन्माननीय आध्यात्मिक केन्द्र राहिले आहे.

श्रीलंकेच्या सर्वात मोठय़ा श्रध्दास्थानात बोधीवृक्षाची व तेथील अतिविशाल महाविहाराची गणना होते. त्या काळात भिक्खू आणि भिक्खूणींनी बोधीवृक्षाची महत्ता जोपासली.

थेरी संघमित्रा हिच्या सोबत स्थापत्य शास्त्रातील पारंगत, मूर्तिकार, चित्रकार, रंगकर्मी, वैद्यक आणि बुध्दशासनात प्रतिष्ठत असे साधक यांचे श्रीलंकेत आगमन झाले. त्यामुळे श्रीलंकेत सांस्कृतिक जागृती झाली. श्रीलंकेतील तरुण वर्ग, सम्राट अशोक कालीन कला व विज्ञान क्षेत्रात पारंगत झाला. त्यांनी श्रीलंकेतील वातावरणाशी जुळणारी कला निर्माण केली. शेवटी थेरी संघमित्रा हिचे धम्मकार्य आणि जनतेच्या हितासाठी महामंगल कार्य करतांना श्रीलंकेच्या हत्थाळ_हक विहारात परिनिब्बाण झाले.

सम्राट अशोकाने ज्यापध्दतीने भारतात बुध्दशासन प्रत्यक्षात आणले होते. त्याचीच पुनरावृत्ती श्रीलंकेत दिसली यामागची प्रेरणा थेरी संघमित्रा आणि तिने लावलेला बोधीवृक्ष आहे म्हणून जेष्ठ पौर्णिमा (जेठ्ठ मासो पुंन्नमि) महिन्याच्या पवित्र पौर्णिमेला थेरी संघमित्रा स्मरण दिवस म्हणून साजरा केला जातो.

४. भिक्खू महेंद्र यांचे निर्वाण :

बौद्ध धम्माचे विरोधक आणि धर्मांध आक्रमकांनी चौदाव्या शतकापर्यंत भारतातून बौद्ध साहित्य नष्ट केले होते. अशा अवस्थेत महामहेंद्र यांनी श्रीलंकेत ते साहित्य सुरक्षित ठेवले. तसेच अडतीस वर्षे श्रीलंकेत धम्मसेवा करून वयाच्या ८० व्या वर्षी महामहेंद्र यांनी जगाचा निरोप घेतला. श्रीलंकेच्या अनुराधापुरम त्यांचे निर्वाण झाले तो दिवस होता जेष्ठ पौर्णिमेचा.

🔹 कपिलवस्तूच्या जनतेला महासमय सुत्ताचा उपदेश याच पौर्णिमेला केला आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, जेठ्ठ मासो, रविवार, जेष्ठ माहे.

२३ जून १९३८ – रोजी डिलाईट रोड मुंबई येथे दलित महिला मंडळाची स्थापना करण्यात आली.

२३ जून १९४७ – रोजी स्वतंत्र भारताच्या ध्वज कमिटीत विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती झाली.

२३ जून १९५६ – रोजी "एकेकाळी अफगाणिस्तान हा संपूर्ण देश बौद्ध होता." विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे भाषण. दिल्ली येथे बुद्ध जयंतीनिमित्त बुद्धजन महासभा (अखिल भारतीय बौद्ध समिती) च्या वतीने आयोजित केली गेली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, जेठ्ठ मासो, सोमवार, जेष्ठ माहे.

२४ जून १५६४ – रोजी राणी दुर्गावती स्मृतिदिन.

२४ जून १९२४ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आंबेडकर मास्तरांना पाच पाने, सुपारी, धोतरपान आणि सव्वा रुपया गुरू दक्षिणा दिली.

२४ जून १९२७ – रोजी श्रीमती मालिनिबाई पाणंदिकर या हिंदू मुलीने गुलाब खान बशिरुद्दन या मुसलमान गृहस्थाशी नोंदणी पद्धतीने विवाह केला, साक्षीदार डॉ. केतकर व त्यांची जर्मन पत्नी शिलवंतीबाई.

२४ जून १९४५ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे पुस्तक "अस्पृश्यांसाठी काँग्रेस आणि गांधींनी काय केले?" हे प्रकाशित केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 गोंडची राणी दुर्गावती 💎🦚🦚🦚☸☸

जन्म :– ५ ऑक्टोबर १५२४, कालंजर किल्ला, बांदा, उत्तर प्रदेश, भारत.

मृत्यू :– २४ जून १५६४, एलिचपूर, महाराष्ट्र, भारत.

धर्म :– गोंडी धर्म.

पती :– दलपत शाह.

अपत्ये :– वीर नारायण.

राणी दुर्गावती (५ ऑक्टोबर १५२४ – २४ जून १५६४) यांचा जन्म प्रसिद्ध राजपूत राजा चंडेल सम्राट किरत राय यांच्या कुटुंबात झाला. कालंजर किल्ला (बांदा, उत्तर प्रदेश, भारत) हे त्यांचे जन्मस्थान होय. महंमद गझनी याला पळता भुई थोडी करणाऱ्या राणा विद्याधर यांचा बचाव करण्यामुळे चंदेल राजघराणे इतिहासात प्रसिद्ध झाले. राणा विद्याधर यांच्या शिल्पकलेवरील प्रेमाची प्रचिती जगप्रसिद्ध खजुराहो मंदिर व कालंजर किल्ल्याकडे पाहून येते. राणी दुर्गावती यांच्या पराक्रमामुळे त्यांच्या वंशपरंपरगात धैर्य व कलाभक्तीच्या परंपरेला आणखी प्रतिष्ठा लाभली.

१५४२ साली, राणी दुर्गावती यांचा विवाह, गोंड राजघराण्यातील राजा संग्राम शाह यांचे सुपुत्र दलपत शाह यांचेशी बऱ्याच संघर्षानंतर झाला. या विवाहामुळे चंडेल व गोंड राजघराणी एकत्र आली. याच कारणामुळे शेर शाह सुरीचा पाडाव करते समयी राणा किरत सिंह यांना आपले जावई दलपत शाह यांचेकडून मदत मिळाली.

इ.स. १५४५ साली राणी दुर्गावती यांनी एका मुलास जन्म दिला. त्यांनी मुलाचे नाव वीर नारायण ठेवले. इ.स. १५५० च्या सुमारास दुर्गावतींचे पति दलपत शाह यांचे निधन झाले. वीर नारायण त्या वेळेस वयाने खूपच लहान असल्याने गोंड राज्याची सूत्रे राणी दुर्गावतींनी आपल्या हाती घेतली. दिवाण किंवा प्रधान मंत्री व मंत्री मान ठाकूर यांनी राणी दुर्गावती यांना यशस्वी व प्रभावी राज्यकारभारासाठी मदत केली. नंतर राणीने आपली राजधानी सिंगौरगडावरून हलवून चौरंगगडावर नेली. सातपुडा पर्वतरांगांमधील या किल्ल्याला राजकीय महत्त्व होते.

शेर शाहच्या मृत्यूनंतर सुजात खान याने माळवा प्रांतावर कब्जा केला. त्याच्यानंतर इ.स. १५५६ मधे त्याचा मुलगा बाज बहादूर गादीवर आला. राज्यकारभाराची धुरा सांभाळताच त्याने राणी दुर्गावतीवर हल्ला केला पण या युद्धात त्याचा दारुण पराभव झाला. या पराभवानंतर बाज बहादूरला गप्प बसण्याशिवाय पर्याय उरला नाही व राणी दुर्गावतीचे नाव अतिशय प्रसिद्ध झाले.

१५६२ मधे अकबर राजाने माळवा प्रांताचा राजा बाज बहादूर याचा पराभव केला व माळवा प्रांत मुघल साम्राज्याखाली आणला. यामुळे आपसूकच राणी दुर्गावतीच्या साम्राज्याची हद्द, मुघल साम्राज्याच्या हद्दीला स्पर्श करू लागली.

रेवा साम्राज्याच्या रामचंद्र राजाचा पराभव करणारा, राणीचा एक समकालिन मुघल सेनापती, ख्वाजा अब्दुल माजिद असफ खान हा अतिश्य महत्त्वाकांक्षी मनुष्य होता. राणीच्या साम्राज्यातील समृद्धीने हा प्रदेश आपल्या अंकित करण्याची त्याची लालसा बळावली आणि अकबर राजाच्या परवानगीने त्याने राणीच्या राज्यावर हल्ला केला.

राणीला जेव्हा असफ खानच्या आक्रमणाविषयी कळलं, तेव्हा त्यांचे दिवाण ब्योहर आधार सिंह यांनी मुघल सैन्यबलाविषयी पूर्ण कल्पना दिली. मात्र राणीने आपल्या सर्वशक्तीनीशी असफ खानला तोंड द्यायचं ठरवलं. अपमानित जगण्यापेक्षा सन्मानाने मृत्यूला कवटाळणं त्यांना जास्त पसंत होतं.

बचावात्मक लढा देता यावा म्हणून त्या नराईला गेल्या. या प्रदेशाच्या एका बाजूस गौर व नर्मदा नदी आणि एका बाजूस पर्वतांची रांग होती. हे एक असमान युद्ध होतं. एका बाजूला आधुनिक शस्त्रास्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या सैनिकांचे अफाट सैन्यदळ व दुसऱ्या बाजूला जुनी हत्यारे चालवणारे अपुरे अप्रशिक्षित सैनिक. राणीचा फौजदार

अर्जुन दास युद्धात कामी आला व मग राणीने बचावाच्या या लढाईमधे आघाडी घेतली. शत्रूच्या सैन्याने घाटात प्रवेश केल्यावर राणीच्या सैन्याने त्यांच्यावर हल्ला चढवला. दोन्ही बाजूला काही सैनिक मेले पण राणीचा या युद्धात विजय झाला. घाटात शिरलेल्या मुघल सैन्याचा तिने पाठलाग केला व ती बाहेर आली.

आता राणीने आपल्या सल्लागारांसोबत युद्धनीतीची चर्चा केली. राणीचं मत होतं की शत्रूवर रात्री हल्ला करावा म्हणजे तो कमजोर पडेल पण राणीच्या सल्लागारांनी याला नकार दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी असफ खानाने अवाढव्य तोफा युद्धासाठी आणल्या. राणी आपल्या सरमन नावाच्या हत्तीवर स्वार झाली आणि युद्धाला सामोरी गेली. तिचा मुलगा राजपुत्र वीर नारायण यानेदेखील या युद्धात भाग घेतला होता. त्याने तीन वेळा मुघल सैन्याची पिछेहाट केली होती पण एके क्षणी तो जखमी झाल्यामुळे एका सुरक्षित स्थळी तो मागे फिरला. या युद्धादरम्यान राणीला देखील एका बाणामुळे कानावर जखम झाली. दुसरा बाण थेट त्यांच्या गळ्यात घुसला व त्यांची शुद्ध हरपली. शुद्धीवर आल्यावर त्यांच्या लक्षात आलं की या युद्धात पराभव अटळ आहे. त्यांच्या माहूताने त्यांना युद्धभूमीवरून परत फिरण्याचा सल्ला दिला पण राणीने तो मानला नाही. त्यांनी आपला खंजिर काढला व स्वतःचे जीवन संपवले. तो दिवस होता २४ जून १५६४. त्यांचा मृत्यू दिन भारतामधे शहीदांचा दिवस म्हणून २४ जूनला साजरा केला जातो. १९८३ साली, मध्य प्रदेश सरकारने राणी दुर्गावती यांच्या स्मरणार्थ जबलपूर युनिव्हर्सिटीचे नामकरण दुर्गावती विश्वविद्यालय असे केले. २४ जून १९८८ला त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारत सरकार कडून एक पोस्टाचा स्टॅम्प काढून श्रद्धांजली वाहिली गेली. राणीच्या नावावरून नामकरण झालेली जबलपूर जंक्शन व जम्मूतवी दरम्यान धावणारी ट्रेन दुर्गावती एक्सप्रेस (११४४९/११४५०) या नावाने प्रसिद्ध आहे.

☸☸🌿🌿🌿💎 राणी दुर्गावती (Durgawati) 💎🌿🌿🌿☸☸

माहिती प्रकाशित : २४/०६/२०२२; माहिती लेखक : रंजना संतोष गेडाम; माहिती दर्जा : मध्ययुगीन इतिहास.

राणी दुर्गावती : (५ ऑक्टोबर १५२४ – २४ जून १५६४). सोळाव्या शतकातील गोंडवाना (गडामंडला) साम्राज्याची कर्तृत्ववान व पराक्रमी राणी. त्यांचा जन्म चंदेलवंशीय महोबा येथील राजपूत घराण्यात झाला. किरातराय (कीर्तिसिंह) व राणी कमलावती यांच्या त्या एकुलत्या राजकन्या. दुर्गावतींना तीरकमठा, तलवारबाजी, घोडेस्वारी, नेमबाजी, गोळाफेक, भालाफेक इत्यादी शस्त्रविद्येचे शिक्षण मिळाले. त्याचबरोबर त्यांनी संस्कृतशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास केला होता.

दुर्गावती महोबाच्या राजदरबारात राजकुमाराच्या वेषात सहभागी होत. शिकार करणे हा त्यांचा आवडता छंद होता. अशाच एका शिकारीच्या प्रसंगी त्यांची गोंडवाना साम्राज्यातील जंगलात गोंडवानाचे राजकुमार वीर दलपतशाह मडावी यांच्याशी भेट झाली. पुढे त्यांनी त्यांच्याशी आंतर्विवाह केला (१५४२); परंतु दुर्गावतींनी राजपूताशी विवाह न केल्यामुळे महोबाचे जमीनदार व राजपूत सरदार बदनसिंह आणि गिरिधारीसिंह हे त्यांच्या विरोधात गेले. दलपतशाह व दुर्गावतींना वीरनारायण हा मुलगा झाला (१५४५). पुढे दलपतशाहाचे अल्पकाळातच निधन झाले (१५४८). त्यामुळे वीर नारायण यास गादीवर बसवून दुर्गावतींनी अधेर कायस्थ आणि मान ब्राह्मण या दोन प्रमुख दिवाणांच्या मदतीने राज्यकारभार केला.

दुर्गावतींनी सुमारे पंधरा वर्षे गडामंडलाचा कारभार चालविला. त्यांच्या काळात गडामंडला हे गोंड राज्यातील एक संपन्न व समृद्ध राज्य म्हणून उदयास आले. गडामंडलातील सु. १२,००० गावे थेट दुर्गावतींच्या ताब्यात असल्याचे उल्लेख सापडतात. त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी दुर्ग, महाल, तलाव, मंदिर इत्यादींचे बांधकाम केल्याचे अवशेष पाहायला मिळतात. उदा. जबलपूर जवळील राणीतल अथवा राणी तलाव. तसेच त्यांनी इतर राज्यांसोबत व्यापारी संबंध जोपासले होते. गोंडवाना साम्राज्याचा हा सुवर्णकाळ होता. राज्यात सुवर्णचलनाद्वारे वस्तुविनिमय होत. दुर्गावतींच्या ताब्यात ५२ गड आणि ५७ परगणे मिळून राज्याचा विस्तार हा सुमारे ७७,७०० चौ. किमी. पर्यंत होता. तसेच २०,००० घोडेस्वार, १००० हत्ती आणि मोठ्या प्रमाणात पायदळ असे विशाल सैन्य बळ त्यांच्याकडे होते. त्यांनी माळवा प्रदेशातील बहादुरशहा व मिआणा अफगाण यांचा लढाईत पराभव केल्याचे उल्लेख सापडतात (१५५५; १५६०).

दुर्गावतींच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे महोबा राज्याची प्रजा विखुरली गेली. याचा मोगलांनी फायदा घेतला. मोगलांच्या आक्रमणानंतर बदनसिंह आणि गिरिधारीसिंह यांनी कपटनीतीने गोंडवाना राजदरबारात आश्रय घेतला. दुर्गावातींनी तत्कालीन मोगल राजवटीला लागून असलेल्या इतर भागांतही आपली सत्ता वाढविली होती. त्यामुळे मोगल सम्राट अकबराने गडामंडला काबीज करण्याचे प्रयत्न सुरू केले. अकबराने माळव्यातील करा माणिकपूरचा सुभेदार असफखान (ख्वाजा अब्दुल मजीद) याच्यावर गोंडवाना ताब्यात घेण्याची जबाबदारी सोपविली. असफखानाने गोंडवानाच्या विरोधकांना एकत्र आणले आणि बिहडच्या जंगलात दुर्गावतींविरुद्ध युद्ध पुकारले. दुर्गावती आपल्या सैन्यांसह असफखानवर तुटून पडल्या. यात मोगल सैन्याची धूळदान झाली. या वेळी असफखानाने पळ काढला. त्यानंतर त्याने रणनीती बदलून मोगल सैन्यांची एक तुकडी आणि बदनसिंह व गिरधारीसिंहासह रजपूत सैन्यांची दुसरी तुकडी घेऊन पहाटे दोनच्या सुमारास दुर्गावतींवर नरई नाल्याच्या परिसरात पुन्हा नव्याने हल्ला केला. या युद्धात राजकुमार वीरनारायण मोठ्या हिमतीने लढला; परंतु जखमी झाल्याने त्याला चौरागड येथे पाठविण्यात आले.

गोंडवाना सैन्य पहाडी युद्धात तरबेज असल्याचे बदनसिंह याला कल्पना होती. त्यामुळे त्याने गोंड सैन्याला नरई नाल्याच्या पलीकडे जाऊ देऊ नये, असे असफखानाला सांगितले. त्यानुसार नरई नाल्याचा बांध फोडण्यात आला, त्यामुळे नाल्याला पूर येऊन गोंड सैन्य अडकून पडले. त्यातच असफखानाकडील तोफा आणि बंदुकांच्या अचानक माऱ्यामुळे गोंड सैन्यांत गोंधळ माजला. यात अनेक गोंड सैन्य मारले गेले आणि दुर्गावतीही जखमी झाल्या. दुर्गावतींनी शत्रूच्या हातून मृत्यू न पतकरता पोटात खंजीर खुपसून वीरांगनेचे मरण पतकरले.

कार्यक्षम शासनकर्त्री म्हणून त्या इतिहासात प्रसिद्ध आहेत. जबलपूरजवळ त्यांची समाधी आहे.

☸☸🌿🌿🌿💎 राणी दुर्गावती 💎🌿🌿🌿☸☸

जन्म :– ५ ऑक्टोबर १५२४ कालिंजर किल्ला;

मृत्यू :– २४ जून १५६४ (वय ३९) नरराई नाला, जबलपूर, मध्य प्रदेश.

जोडीदार :– दलपत शाह.

समस्या :– वीर नारायण.

वडील :– सालबाहम

धर्म :– गोंडी.

राणी दुर्गावती (५ ऑक्टोबर १५२४ – २४ जून १५६४) ही १५५०–१५६४ मध्ये गोंडवानाची राणी होती. तिने गोंडवानाचा राजा संग्राम शाह यांचा मुलगा राजा दलपत शाह यांच्याशी लग्न केले. तिचा मुलगा वीर नारायण याच्या अल्पवयीन काळात १५५० ते १५६४ पर्यंत तिने गोंडवानाची राजे म्हणून काम केले. मुघल साम्राज्याविरुद्ध गोंडवानाचे रक्षण करण्यासाठी तिला प्रामुख्याने आठवले जाते.

दुर्गावतीचा जन्म ५ ऑक्टोबर १५२४ रोजी कालिंजर किल्ल्यावर झाला. तिचा जन्म महोबा राज्यावर राज्य करणाऱ्या चंडेला राजपूत राजा शालबहम यांच्या कुटुंबात झाला.

१५४२ मध्ये, तिने गढ़ा राज्याचे राजा संग्राम शाह यांचे ज्येष्ठ पुत्र दलपत शाह यांच्याशी लग्न केले. या लग्नाद्वारे महोबाचे चंडेला आणि गढ़ा–मंडला राजवंशांचे कच्छवा राजपूत हे मित्र बनले.

राणी रीजेंट :–

१५५० मध्ये राजा दलपत शाह यांचे निधन झाले जेव्हा त्यांचे उत्तराधिकारी युवराज वीर नारायण हे फक्त ५ वर्षांचे होते. नवीन राजाच्या अल्पसंख्याक काळात त्यांची पत्नी, राणी दुर्गावती यांनी गोंडवाना राज्याची सूत्रे हाती घेतली. दिवाण आधार कायस्थ आणि मंत्री मान ठाकूर यांनी राणीला प्रशासन यशस्वीपणे आणि प्रभावीपणे सांभाळण्यास मदत केली. राणी दुर्गावती यांनी तिच्या राज्यात शांतता, व्यापार आणि सद्भावना वाढवली.

राणी दुर्गावतीने तिची राजधानी सिंगोरगड किल्ल्यावरून चौरागड किल्ल्यावर हलवली. सातपुडा पर्वतरांगेवर वसलेला हा एक सामरिक महत्त्वाचा किल्ला होता.

शेरशाह सुरीच्या मृत्युनंतर, शुजा खानने माळवा काबीज केला आणि १५५६ मध्ये त्याचा मुलगा बाज बहादूर त्याच्या जागी आला. गादीवर आल्यानंतर, बाजने राणी दुर्गावतीच्या गोंडवाना येथे आक्रमण केले परंतु हे आक्रमण परतवून लावण्यात आले आणि दुर्गावतीला मोठे नुकसान झाले आणि त्यामुळे दुर्गावतीला खूप प्रतिष्ठा मिळाली.

गोंडवानावरील मुघल आक्रमण :–

१५६२ मध्ये, अकबरने माळवा शासक बाज बहादूरचा पराभव केला आणि माळवा जिंकला, तो मुघल अधिपत्याखाली आला. परिणामी, राणीची राज्य सीमा मुघल साम्राज्याला स्पर्शून गेली. राणीचे समकालीन मुघल सेनापती ख्वाजा अब्दुल मजीद असफ खान होते ज्यांनी रेवाचे सम्राट राजा रामचंद्र सिंग यांचा पराभव केला. त्यांना राणी दुर्गावती आणि गोंडवानाची संपत्ती हवी होती. मुघल सम्राट अकबर यांच्याकडून परवानगी घेतल्यानंतर त्यांनी राणीच्या राज्यावर मुघल आक्रमण केले.

जेव्हा राणीने मुघल सेनापती असफ खानच्या आक्रमणांबद्दल ऐकले तेव्हा तिने तिच्या सर्व शक्तीनिशी तिच्या राज्याचे रक्षण करण्याचा निर्णय घेतला, जरी तिचे दिवाण, बियोहर आधार सिंह (आधार कायस्थ) यांनी आक्रमण करणाऱ्या मुघल सैन्याच्या ताकदीबद्दल इशारा दिला होता. राणीने असा युक्तिवाद केला की अपमानास्पद जीवन जगण्यापेक्षा सन्मानाने मरणे चांगले.

बचावात्मक लढाई लढण्यासाठी, ती एका बाजूला डोंगराळ रांग आणि दुसऱ्या बाजूला गौर आणि नर्मदा या दोन नद्यांच्या मध्ये वसलेल्या नराई येथे गेली. आक्रमण करणाऱ्या मुघल बाजूने प्रशिक्षित सैनिक आणि आधुनिक शस्त्रे मोठ्या संख्येने होती आणि राणी दुर्गावतीच्या बाजूने जुनी शस्त्रे असलेले काही अप्रशिक्षित सैनिक होते. या युद्धात तिचा फौजदार अर्जुन दास मारला गेला. त्यानंतर राणीने स्वतः बचावाचे नेतृत्व करण्याचा निर्णय घेतला. शत्रू दरीत प्रवेश करताच, राणीच्या सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला केला. दोन्ही बाजूंनी काही माणसे गमावली परंतु राणीने जास्त गमावले.

राणींचे राज्यक्षेत्र खूपच संघराज्यीय होते, सामान्य गैर–आदिवासी राज्यापेक्षा खूपच विकेंद्रित होते. काही किल्लेदार जिल्हे होते, जे प्रशासकीय एकके होती आणि ती थेट सम्राट किंवा अधीनस्थ सामंत (जहागीरदार) आणि कनिष्ठ राजांच्या माध्यमातून नियंत्रित केली जात होती. जवळजवळ अर्धी गावे सामंतांच्या ताब्यात होती. हे स्थानिक राजे युद्धाच्या काळात सैनिकांची भरती करत आणि त्यांचे योगदान देत असत आणि त्यांच्या सार्वभौमत्वाला शस्त्रे देखील देत असत. या सैनिकांच्या भरतीचे मानक, प्रशिक्षण आणि उपकरणे एकसारखी नसत आणि बहुतेकदा ती निकृष्ट दर्जाची असत. तसेच, युद्धादरम्यान सामंतांचे सैन्याच्या काही भागांवर बरेच वर्चस्व होते. या विकेंद्रित रचनेमुळे आक्रमण करणाऱ्या मुघलांविरुद्धच्या युद्धादरम्यान तोटे निर्माण झाले.

या टप्प्यावर, राणीने तिच्या सल्लागारांसोबत तिच्या रणनीतीचा आढावा घेतला. तिला रात्रीच्या वेळी आक्रमण करणाऱ्या मुघल सैन्यावर गनिमी हल्ले सुरू ठेवायचे होते, परंतु तिच्या सरदारांनी तिला निराश केले आणि रात्रीच्या प्रकाशात उघडपणे लढाईत आक्रमण करणाऱ्या सैन्याचा सामना करण्याचा आग्रह धरला. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी, मुघल सेनापती असफ खानने मोठ्या तोफा बोलावल्या. राणी तिच्या हत्ती सरमनवर स्वार होऊन युद्धासाठी आली. तिचा मुलगा, युवराज वीर नारायण यांनीही या युद्धात भाग घेतला. त्याने आक्रमण करणाऱ्या मुघल सैन्याला तीन वेळा मागे हटण्यास भाग पाडले परंतु शेवटी, तो जखमी झाला आणि त्याला सुरक्षित ठिकाणी माघार घ्यावी लागली. युद्धादरम्यान, राणीलाही तिच्या कानाजवळ बाण लागला. दुसरा बाण तिच्या मानेला भोसकला आणि ती बेशुद्ध झाली. शुद्धीवर आल्यावर तिला पराभव जवळ आल्याचे जाणवले. तिच्या माहूतने तिला युद्धभूमी सोडण्याचा सल्ला दिला पण तिने नकार दिला आणि तिचा खंजीर बाहेर काढला आणि २४ जून १५६४ रोजी आत्महत्या केली. तिचा शहीद दिवस (२४ जून १५६४) "बलिदान दिवस" म्हणून साजरा केला जातो.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, जेठ्ठ मासो, मंगळवार, जेष्ठ माहे.

२५ जून १९१८ – रोजी शाहू महाराजांनी परंपरागत कुलकर्णी वतने रद्द केली.

२५ जून १९२३ – रोजी विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वकिलीची सनद (वकील म्हणून सराव करण्याची परवानगी) मिळावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला.

२५ जून १९४५ – रोजी शिमला परिषद सुरू.

२५ जून १९४६ – रोजी बॉम्बे सेंट्रल स्थानकावर विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य स्तकार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपली संघटना अभेद्य करा. आपसातील मतभेदांना मूठमाती द्या. स्वतःच्या कुटुंबाच्या पलीकडे नजर टाकून स्वतःच्या समाजासाठी थोडा स्वार्थ त्याग करा. आम्ही आज कदाचित लढाई हरलो असो पण युद्ध मात्र आंम्ही जिंकणारच."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, जेठ्ठ मासो, बुधवार, जेष्ठ माहे.

२६ जून १८७४ – रोजी कोल्हापूर संस्थानचे राजे, कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५०% आरक्षण देणारे, आरक्षणाचे जनक संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देणारे, सुधारणांचे कृतिशील पुरस्कर्ते, लोककल्याणकारी राजे, वंचितांचे राजे, महाराजांचे महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती दिनानिमित्त विनम्र प्रणाम.

२६ जून १९२० – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने अमरावती येथे चोखामेळा फ्री बोर्डिंग उघडण्यात आले.

२६ जून १९२७ – रोजी चवदार तलावाच्या तथाकथित शुद्धीकरणाच्या वृत्ताने उदास वर्गाच्या मनावर परिणाम झाला आणि विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हृदयावर ईतका परिणाम झाला की ते शांतच राहिले आणि आपल्या लोकांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्यासाठी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी संताप व्यक्त केल्याने ते म्हणाले की, "शिक्षणाचा प्रसार आणि शास्त्रांचा विस्तार यामुळे त्या काळाचा आजार दूर होऊ शकणार नाही. हा रोग खोलवर रुजलेला आहे आणि तो केवळ ज्ञानाच्या पट्ट्या किंवा सोप्या योजनांनी परिधान केल्यास बरा होऊ शकत नाही. प्राणघातक रोगांना कठोर उपचारांची आवश्यकता असते."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, जेठ्ठ मासो, गुरूवार, जेष्ठ माहे.

२७ जून १९०६ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना छोट्या बॉम्बच्या सहाय्याने ठार मारण्याचा प्रयत्न.

२७ जून १९२४ – रोजी तुमसर रोड येथे श्री. लक्ष्मण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भंडारा जिल्हा दलित अधिवेशन.

२७ जून १९२७ – रोजी पेरियार रामस्वामी नायकर यांनी महात्मा गांधींना वेडे म्हंटले आणि वेडेपणा हे सर्व महात्म्यांचे वैशिष्ट्ये आहे.

२७ जून १९४४ – रोजी स्थायी कामगार समितीची नवी दिल्ली येथे बैठक. भारतीय कामगार संघटना दुरुस्ती विधेयक, १९४३ मध्ये भारत सरकारचे कामगार सदस्य माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झालेल्या ट्रेड युनियनच्या मान्यताप्राप्त मंडळाच्या नियुक्ती आणि मान्यता देण्याच्या प्रस्तावांवर चर्चा झाली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, जेठ्ठ मासो, शुक्रवार, जेष्ठ माहे.

२८ जून १९२२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लंडनच्या ग्रेज इन या संस्थेच्या न्यायसभेने बार–ॲट–लॉ (बॅरिस्टर) ही पदवी प्रदान केली.

२८ जून १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या उपस्थितीत मुंबई येथील महार जातीतील पहिला वैदिक विवाह पार पडला.

२८ जून १९३१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहमदाबाद येथील प्रेमाभाई गृहामधे आपल्या भाषणात अस्पृश्य तरुणांना संबोधित करतांना सांगितले की, "त्यांची लढाई सर्व प्रकारच्या गुलामांविरूद्ध आहे. अस्पृश्यतेच्या प्रचलित गुलामीच्या जगात गुलामगिरीच्या सर्व पद्धती भयंकर आणि भीषण आहेत."

२८ जून १९३३ – रोजी नागपूर येथे दलित फेडरेशनच्या वार्ड शाखा स्थापन करून २४ जून ते ६ जुलै जाहीर सभांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्धं, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, जेठ्ठ मासो, शनिवार, जेष्ठ माहे.

२९ जून १९२८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करण्यासाठी "समता पाक्षिक" हे वृत्तपत्र सुरू केले व देवराव विष्णू नायक यांची संपादक म्हणून नियुक्ती केली.

२९ जून १९२९ – रोजी परळ मुंबई येथे दामोदर गृहामध्ये रावबहादूर बोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आणि माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत बहिष्कृत वर्गाच्या जंगी (मोकळ्या/खुल्या) जाहीर सभेत चार ठराव पास करण्यात आले.

२९ जून १९२९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढाकाराने, समाज समता संघाच्या विद्यमाने, गोविंद आंबेडकर यांचा मुलगा केशव यांचा विवाह विठाबाई तिडेकर हिच्याशी दामोदर गृह परळ येथील वैदिक पद्धतीने संप्पंन्न झाला.

२९ जून १९३२ – रोजी मध्य प्रांतीय दलित परिषद अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या विद्यमाने चंद्रपूर येथे वीरनायक तुलाराम साखरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्धं, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० जून २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, जेठ्ठ मासो, रविवार, जेष्ठ माहे.

३० जून १९२८– रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "छोट्या धारकांच्या सवलती विधेयक : २ On small holder's relief bill : 2" वर चर्चा केली.

३० जून १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धंम्मांतरास पाठिंबा संबंधी डॉकटर मुंजे यांनी एम. सी. राजा या अस्पृश्य नेत्याला पत्र लिहिले.

३० जून १९३९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नागपूर जिल्ह्यातील कोतवालांच्या सभेत भाषण.

३० जून १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेवर त्वरित निवड व्हावी याबाबत संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे मुख्यमंत्री श्री. बी. जी. खैर यांना पत्राद्वारे सुचविले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, जेठ्ठ मासो, सोमवार, जेष्ठ माहे.

१ जुलै १९०४ – रोजी शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरू केले.

१ जुलै १९१३ – रोजी महाराष्ट्र कृषी दिन. वसंतराव फुलसिंग नाईक जयंती.

१ जुलै १९१६ – रोजी कर्मवीर बाबू हरीदास आवळे जयंती.

१ जुलै १९५४ – रोजी मुंबई प्रदेश अनुसूचित वर्ग महासंघाच्या सर्व प्रभाग समित्यांची बैठक कामा गृह मुंबई येथे झाली. या बैठकीत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भाषणात म्हणाले की, "समाजाची दिशाभूल करणाऱ्या पुढार्यांवर कडक नजर ठेवा."

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २१ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, आसाळ्ह मासो, रविवार, आषाढ माहे.

२१ जुलै १९४२ – काल रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये अधिकार स्वीकारला आणि २१ जुलै १९४२ रोजी ताजमहाल हॉटेलमध्ये राष्ट्रीय सिमेन्स युनियनचे अध्यक्ष व सदस्य भारत सरकार याच्या सन्मानार्थ दिलेल्या टी पार्टीमध्ये बोलताना कामगार सदस्य डॉ. आंबेडकर यांनी आश्वासन दिले की, "या देशातील कामगार वर्गाचे जीवनमान सुधारण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू."

२१ जुलै १९४६ – रोजी पुणे येथील अहिल्याश्रमात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रचंड जनसमुदायाला संबोधित करताना म्हणाले की, "या देशातील कोणतेही राजकीय पक्ष आमच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देत नाहीत."

२१ जुलै १९४८ – रोजी घटना समितीचे अध्यक्ष राजेंद्र प्रसाद यांनी हिंदू कोड बिलाला विरोध केला.

*२१ जुलै १९५० – रोजी भारत सरकारचे कायदेमंत्री माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुपारी दीडच्या सुमारास मनमाड मार्गाने स्पेशल सलूनकडे जाण्यासाठी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे दाखल झाले. रोटेगाव–लासूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असंख्य जनसमुदायाने मोठ्या

आदराने व निष्ठेने स्वागत केले. स्टेशनवर पोलिसांनी त्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला.*

२१ जुलै २०२४ – रोजी आषाढी पौर्णिमा [धम्मचक्रप्रवर्तन दिन] (आसाळ्ह मासो पुंन्नमि.)

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🔵🔵🔵 आषाढी पौर्णिमा [धम्मचक्रप्रवर्तन दिन] (आसाळ्ह मासो पुंन्नमि) 🔵🔵🔵

● आषाढ़ी पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व ●

आषाढ पौर्णिमेला पुढील घटनेंमुळे प्रमुख मानल्या जाते.

आजच्याच दिवसी सिद्धार्थ गौतमाने माता महामया यांच्या गर्भात गर्भाधारण केले.

आजच्याच दिवसी राजकुमार सिद्धार्थने लोककल्याणाच्या भावनेने महानिभिष्क्रमण केले होते.

आजच्याच दिवसी बुद्धांनी सारनाथच्या पावन भूमीवर पंच्चवर्गीय भिक्षुंना 'धम्मचक्कप्पवत्तन सुत्त' याचा उपदेश केला.

आजच्याच दिवसी बुद्धांनी भिक्षुंसाठी पावसाळ्याचे तीन महिने त्रासदायक होऊ नये यासाठी वर्षावास जाहीर केला.

जगात आषाढी पौर्णिमा सर्वात मोठा सण व आनंद उत्सव म्हणून साजरा केला जातो. कारण याच दिनी भगवान बुध्दांनी समस्त मानवाला अविद्येच्या अज्ञान अंधःकरातून मुक्त करणारे आणि प्रज्ञेच्या प्रकाशामध्ये आणणारे ज्ञान उपदेशिले. यासोबतच आषाढ पौर्णिमेचे इतरही अनेक महत्व आहेत याबद्दल ही माहिती वाचा..

पहिले महत्व :– बुद्धांच्या बाबतीत एक कथा सांगितली जाते की गौतम बुद्धांची आई महामाया यांच्या स्वप्नात सुमेध नावाचा बोधिसत्व हत्तीच्या रुपात आला व आपल्या सोंडेने पांढरे कमळाचे फूल महामायेला देऊन तो बोधिसत्व म्हणाला, "माते! मी माझा शेवटचा जन्म तुझ्या कुशीत घेणार आहे. तू माझी आई होशील का?" महामाया म्हणाली, "हो, आनंदाने!" आणि तो सुमेध बोधिसत्व संपूर्ण तिच्या शरीरात सामावला. असा तिला स्वप्नात भास झाला आणि ती जागी झाली. आणि खरोखरच या पौर्णिमेला महामायेला गर्भधारणा झाल्याचे निश्चित झाले. म्हणून या आषाढ पौर्णिमेला गर्भमंगल दिन असेही म्हणतात.

दुसरे महत्व :– सिद्धार्थ गौतम २८ वर्षांचा झाला तेव्हा रोहिणी नदीच्या वाटपावरून शाक्य संघ आणि कोलीय यांच्यात वाद सुरू झाला. शाक्य संघाने कोलीयांविरुद्ध युद्ध करण्याचा संघाच्या बैठकीमध्ये ठराव पास झाला. त्या ठरावाला सिद्धार्थ गौतमाने विरोध केला व चर्चेतून मार्ग काढण्याचा सल्ला दिला. परंतु सिद्धार्थ गौतम संघाच्या विरोधात गेल्यामुळे सिद्धार्थ गौतमासमोर शिक्षेचे पर्याय ठेवले. देहदंड, आईवडिलांची मालमत्ता जप्त, कुटुंबावर सामाजिक बहिष्कार, इ. गौतम बुद्धांनी जे घडले ते स्वतःमुळे घडल्याने शिक्षा स्वतःला व्हावी आईवडिलांना नको असे सांगून गृहत्याग केला. त्या दिवशी आषाढ पौर्णिमा होती.

तिसरे महत्व :– गृहत्याग केल्यावर सिद्धार्थ गौतमाला वेगवेगळ्या गुरुंच्या आश्रमात ज्ञान संपादन केल्यावर तसेच स्वानुभवाने वयाच्या ३५ व्या वर्षी इ. स. पूर्व ५२८ ला वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गया येथे सम्यक संबोधी प्राप्त झाली व ते सम्यक संबुद्ध झाले. ज्ञानप्राप्ती नंतर बुद्धांनी आपला प्रथम धंम्मोपदेश सारनाथ येथे कौण्डिण्य, वप्प, भद्दीय, अस्सजि आणि महानाम या पाच भिख्खूंना दिला. बौद्ध इतिहासामध्ये पहिल्या धंम्मोपदेशाला धम्मचक्र प्रवर्तन सूत्राने संबोधले जाते आणि पाच भिक्षूंना पंचवर्गीय भिक्षु म्हणून ओळखले जाते. आषाढ़ पौर्णिमेच्या ज्या दिवशी बुद्धांनी पाच भिक्षुणां पहिला धंम्मोपदेश दिला ती पौर्णिमा आज धम्मचक्रप्रवर्तन दिन नावाने प्रचलित आहे.

चौथे महत्व :– भगवान बुद्धांनी भिक्षुंसाठी पावसाळ्याचे तीन महिने त्रासदायक होऊ नये यासाठी वर्षावास जाहीर केला. भिक्षूने तीन महिने कुठेतरी विहारात, चैत्यस्तूपात आपला वर्षावास करावा आणि स्थानिक उपासक–उपासिकांना धम्म उपदेश करावा, असे सांगितले. (वर्षा म्हणजे पाऊस, वास म्हणजे निवास, निवारा.) भगवान बुद्धाने आपला पहिला वर्षावास सारनाथ येथील ऋषीपत्तन येथेच केला. त्यांनी आपल्या जीवनात एकूण ४६ वर्षावास केले. शेवटचा वर्षावास वैशाली येथे केला. याच पौर्णिमेला भगवान बुद्धांनी साठ भिक्षुंचा समूह झाल्यावर संघाची स्थापना केली.

अशा कारणांनी आषाढ पौर्णिमा महत्त्वाची आहे. आषाढ पौर्णिमा कंबोडिया, थायलंड, श्रीलंका, लाओस, म्यानमार आणि वेगवेगळ्या बौद्ध राष्ट्रांमध्ये साजरी केली जाते.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्धं, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २२ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, आसाळ्ह मासो, सोमवार, आषाढ माहे.

२२ जुलै १९४० – रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई येथे भेट घेऊन नियोजित फेडरेशन स्थापनेबद्दल चर्चा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यात अस्पृश्यांचे काय स्थान व महत्त्व राहील? याची विचारणा केली.

२२ जुलै १९४२ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रात्री भट हायस्कूल सभागृह, मुंबई येथे समता सैनिक दलाच्या स्वागताच्या भाषणात म्हणाले होते की, "देशाच्या स्वातंत्र्याच्या माझ्या ईच्छेसाठी मी कोणासमोरही झुकत नाही."

२२ जुलै १९४७ – रोजी घटना समितीने अशोक चाक्रांकित चौरंगी ध्वज (चौरंगा; केशरी [नारंगी], पांढरा, निळा, हिरवा.) राष्ट्रध्वज म्हणून भारताच्या संविधानातकारी सभेद्वारे स्विकारला गेला. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ध्वज समितीचे सदस्य होते. त्यांनीच राष्ट्रीय ध्वजावर अशोक चक्रासाठी पुराव्यानिशी शिफारिष केली व अशोकचक्र राष्ट्रीय ध्वजावर घेतले.

२२ जुलै १९४८ – रोजी पंडित जवाहरलाल यांचा हिंदू कोडबिलाला पूर्ण पाठिंबा असल्याचे सविस्तर पत्र त्यांनी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाठविले.

२२ जुलै १९५० – रोजी अखिल हैद्राबाद स्टेट शेड्युल्ड कास्टस फेडरेशन संभाजीनगर (औरंगाबाद) च्या विद्यमाने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना २००१ रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. ती थैली बाबासाहेबांनी श्री. सुबय्या साहेब यांना आगामी निवडणुकीसाठी खर्च करण्याकरिता दिली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸ राष्ट्रीय ध्वजावर अशोक चक्र ☸☸

अशोक चक्र यासाठी बाबासाहेबांनी खूप संघर्ष केला. अशोक चक्राच्या मुद्याने संसद मध्ये खूप तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पूर्ण संसद हादरली होती.

पहिले राष्ट्रध्वजाचा रंग बनविण्यासाठी बाबासाहेबांनी 'पेंगाली वेंकैय्या' यांना निवडले होते. ...पेंगाली वेंकैय्या यांना रंगांची माहिती होती. त्यांची संवैधानिक निवड बाबासाहेबांनी केली होती. पेंगाली वेंकैय्याने ध्वजाचे रंग तर बनविले पण रंग वर खाली होते. ...म्हणजे पांढरा रंग सर्वात वर्ती, नंतर केशरी आणि मग हिरवा...

बाबासाहेबांनी विचार केला, जर अशोक चक्र आम्ही ठेऊ तर ते निळ्या रंगात पाहिजे व झेंड्याच्या मध्ये हवे. केसरी रंगावर अशोक चक्र उठून दिसणार नाही. बाबासाहेबांनी विचार केला, जर पांढरा रंग मध्ये ठेवला तर जे शांतीचे प्रतिक आहे, त्यावर अशोक चक्र शोभून दिसेल. ...आणि शांतीचे प्रतिक पांढऱ्या रंगावर तथागत बुद्धांचा शांतीचा संदेश देणारे अशोक चक्र त्याचा अर्थ खूप गहण होईल. यासाठी बाबासाहेबांनी ते रंग व्यवस्थित लावले. ...आणि पांढरा रंग मध्ये ठेवला की ज्यावर अशोक चक्र ठेवल्या जाईल. ...

दुसरीकडे ते रंग गांधीच्या काँग्रेस पक्षाच्या झेंड्याचे होत होते. ...बाबासाहेबांनी जेव्हा संसदेत अशोक चक्राचा मुद्दा उठवला तेव्हा सर्वांनी विरोध केला. गांधी, नेहरुनचे म्हणणे होते की झेंड्यावर गांधींचा "चरखा" ठेवल्या जावो, जो काँग्रेस पक्षाचि मुख्य निशाणी होती. बाबासाहेब एकटे अभेद्य भिंतीसारखे उभे होते. बाबासाहेब बोलले होते, जेव्हा पर्यंत झेंड्यावर अशोक चक्र ठेवल्या जात नाही, तेव्हा पर्यंत झेंड्याला "संवैधानिक राष्ट्राध्वज" मी संविधानात लिहिणार नाही.

बाबासाहेब आपल्या जिद्दीवर अडिग होते. ...बाबासाहेबांनी खूप विस्तृत अर्थ दिलेत. ...कुणाला विरोध करायला शब्द उरले नाहीत. शेवटी बाबासाहेबांच्या वतीने संसदेत "अशोक चक्राचा" मुद्दा संमत झाला. ...आणि अशोक चक्राचा स्वीकार केल्या गेला.

भारताचा राष्ट्रीय ध्वज चौरंगा, यावर सर्वात वर्ती केसरी, मध्ये पांढरा व सर्वात खालती हिरवा रंग आहे. सर्व रंग बरोबर समान अनुपतात आहेत. पांढऱ्या रंगाच्या पट्टीवर बरोबर मध्ये निळ्या रंगाचे अशोक चक्र आहे.

केसरी रंग देशाची ताकत व साहसाचे प्रतिक आहे. मध्ये पांढरा रंग शांती व सत्यता दर्शवितो. हिरवा रंग धरतीची उर्धव्ता, विकास व पवित्रतेचे प्रतिक आहे. अशोक चक्र या गोष्टीला दर्शविते की जीवन गतिमान आहे, जेव्हा मृत्यू निच्चलतेचे नाव आहे. झेंड्याची लंबाई आणि रुंदी याचा अनुपात ३:२ आहे. अशोक चक्राचा व्यास पांढऱ्या पट्टीच्या बरोबर रुंदी एवढा आहे.

भारतीय राष्ट्रीय ध्वजाच्या रूपात तिरंग्याला भारताच्या संविधानकारी सभेद्वारा २२ जुलै १९४७ ला अंगिकृत केल्या गेले.

अशोक चक्राला "कर्तव्याचे चाक" पण म्हटल्या जाते. अशोक चक्राची २४ आरे मनुष्याच्या २४ गुणांना दर्शवितात. दुसऱ्या शब्दात त्याला मनुष्यासाठी बनविलेले २४ धम्म मार्ग पण बोलल्या जाऊ शकते, जे कोणत्याही देशाला उन्नतीच्या मार्गावर पोहचऊ शकते. या कारणाने आमच्या राष्ट्रीय ध्वज निर्मात्यांनी जेव्हा याचे अंतिम रूप तयार केले, तेव्हा त्यांनी मधल्या चरख्याला हटवुन अशोक चक्र मध्ये ठेवले. हे चक्र धम्माचे प्रतिक आहे.

अशोक चक्रामधील २४ आऱ्यान्चा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

१. पहिला आरा :– संयम; (संयमीत जीवन जगण्याची प्रेरणा देते.)

२. दुसरा आरा :– आरोग्य; (निरोगी जीवन जगण्यासाठी प्रेरित करते.)

३. तिसरा आरा :– शांती; (देशात शांती व्यवस्था कायम ठेवण्याची सल्ला देते.)

४. चौथा आरा :– त्याग; (देश आणि समाजासाठी त्यागाच्या भावनेचा विकास.)

५. पाचवा आरा :– शील; (व्यक्तिगत शिलाची शिक्षा.)

६. सहावा आरा :– सेवा; (देश आणि समाजाच्या सेवेची शिक्षा.)

७. सातवा आरा :– क्षमा; (मनुष्य आणि प्रान्यांसाठी क्षमेची भावना.)

८. आठवा आरा :– प्रेम; (देश आणि समाजासाठी प्रेमाची भावना.)

९. नौवा आरा :– मैत्री; (समाजात मैत्रीची भावना.)

१०. दहावा आरा :– बंधुत्व; (देश प्रेम आणि बंधुत्वाला प्रोत्साहन देणे.)

११. अकरावा आरा :– संगठन; (राष्ट्राची अखंडता व एकतेला मजबूत ठेवणे.)

१२. बारावा आरा :– कल्याण; (देश व समाजासाठी कल्याणकारी कार्यात भाग घेणे.)

१३. तेरावा आरा :– संमृद्धी; (देश आणि समाजाच्या संमृद्धीसाठी योगदान देणे.)

१४. चौदावा आरा :– उद्योग; (देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी सहायता करणे.)

१५. पंधरावा आरा :– सुरक्षा; (देशाच्या सुरक्षेसाठी सदैव तयार राहणे.)

१६. सोळावा आरा :– नियम; (निजी जीवनात नियम संयमाने वागावे.)

१७. सत्रावा आरा :– समता; (समतायुक्त समाजाची स्थापना करणे.)

१८. अठरावा आरा :– अर्थ; (धनाचा सदुपयोग करणे.)

१९. एकोनविसावा आरा :– निती; (देशाच्या नितीसाठी निष्ठा ठेवणे.)

२०. विसावा आरा :– न्याय; (सर्वांसाठी न्यायाची गोष्ट करणे.)

२१. एकविसावा आरा :– सहयोग; (आपापसात मिळूनमिसळून कार्य करणे.)

२२. बाविसावा आरा :– कर्तव्य; (आपल्या कर्तव्याचे इमानदारीने पालन करणे.)

२३. तेविसावा आरा :– अधिकार; (अधिकाराचे दुरुपयोग न करणे.)

२४. चोवीसावा आरा :– बुद्धिमत्ता; (देशाच्या संमृद्धीसाठी स्वतःचा विकास करणे.)

सर्व आरे मिळून देश आणि समाजाच्या चौमुखी विकासाची गोष्ट करतात. हे आरे सर्व देशवासियांना त्यांचे अधिकार आणि कर्तव्य यांचा उपदेश देण्याबरोबर हे पण सांगतात की, आपल्याला रंग, रूप, जाती आणि धर्माचे अंतर विसरून पूर्ण देशाला एका धाग्यात ओऊन संमृद्धीच्या शिखरावर घेऊन जाण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहले पाहिजे.

सर्वांचे मंगल होवो. सर्व प्राणी सुखी होवो. स्वयंप्रकाशित बना. जय भिम, नमो बुध्दाय, जय भारत, जय संविधान. !!!

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २३ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, आसाळह मासो, मंगळवार, आषाढ माहे.

२३ जुलै १८६० – रोजी जागतिक वनसंवर्धन दिन : वनसंवर्धन–मानव जीवन समृद्धीसाठी आवश्यक.

२३ जुलै १९४७ – रोजी मुंबई विधिमंडळातून घटना समितीचे सदस्य डॉ. मुकुंदराव जयकर राजीनामा. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटना समितीवर निवड जाहीर झाली.

२३ जुलै १९५० – रोजी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजच्या समारंभात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित. या सोहळ्यासाठी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात सांगितले की, "महाविद्यालयाने आपली उच्च परंपरा कायम ठेवेल आणि त्यांनी विद्यार्थ्यांना शुर व्हा, सामर्थ्यवान व्हा व सहनशील व्हा."

२३ जुलै १९५० – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) येथील सेंशन कोर्टाला भेट दिली. त्यावेळी गोडसे जज यांनी बाबासाहेबांसंबंधी बोलतांना, "डॉ. आंबेडकर हे आधुनिक हे आधुनिक मनू आहे." असे उद्गार काढले.

२३ जुलै १९५३ – रोजी केशव उर्फ बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रत्नागिरी येथे भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

जागतिक वनसंवर्धन दिन : वनसंवर्धन–मानव जीवन समृद्धीसाठी आवश्यक.

सुमारे साडेचारशे वर्षापूर्वी संतश्रेष्ठ जगतगुरु तुकाराम महाराज यांनी वृक्षांविषयी आपल्या मनातील भावना व्यक्त करतांना वृक्षांना सोयरे म्हणून सम्बोधले आहे. त्याच राष्ट्रसंत तुकाराम महाराज यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या आणि संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक माणसांच्या हृदयामध्ये आपले स्थान निश्चित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा वृक्ष लागवड आणी संवर्धन अत्यंत जागरूकतेने स्वतंत्र आज्ञापत्र काढून वृक्षतोड करण्यावर सक्त बंदी घातली होती. परंतु कालांतराने मात्र आपण वनांचे महत्व जाणून घेण्यात व त्यांचे संवर्धन करण्यामध्ये कुठे तरी कमी पडलोत. लोकांमध्ये वृक्षसंवर्धनाच्या बाबतीत जाणीव जागृती व्हावी यासाठी “२१ मार्च”हा दिवस “जागतिक वन दिन” म्हणून १९७१ मध्ये युरोपियन कॉनफिडरेषण ऑफ अग्रिकल्चर च्या २३ व्या बैठकीत हा दिन साजरा करण्याची संकल्पना पुढे आली.

भारतासारख्या कृषिप्रधान राष्ट्रात तर वनांचे महत्व विशेषच आहे. केवळ एक इंच जमिनीचा सुपीक थर निर्माण होण्यासाठी शेकडो वर्षाचा काळ लोटावा लागतो. परंतु जमिनीची धूप वनांच्या अभावी केवळ एखाद्या पावसाळयातच होऊ शकते. म्हणून वनांच्या संरक्षणात्मक, उत्पादक आणि आर्थिक क्षमतेमुळे त्यांना शेतकी अर्थव्यवस्थेत मोलाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रगत राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक भरभराटीत समुद्ध वनांनी फार मोठा हातभार लावला आहे पण, एकेंकाळी उन्नत असलेले मेसापोटेमिया, सिरिया व पॅलेस्टाईन इत्यादी सुपीक प्रदेश अविवेकी वनसंहाराने उजाड झाले आहेत, हे एक कटु सत्य आहे. हवामान बदलांशी जुळवून घेणे तसेच जैवविविधतेच्या रक्षण करण्याच्या कामी वन–परिसंस्था महत्त्वाची भूमिका बजावते. हवामान बदलास कारणीभूत असलेल्या हरितगृह वायुंना शोषून घेण्याचे तसेच ग्लोबल वार्मिंग व ओझोन वायूचे कमी होणारे थर नियंत्रित ठेवण्याचे काम वनांकडून केले जाते.

जागतिक वन वर्षाच्या निमित्ताने याबाबत जागरुकता करण्यासाठी तसेच समृध्द वने, माणूस आणि अर्थकारण यांच्यातील नाते उलगडण्याची संधी सर्वांना मिळाली आहे. या अनुषंगाने जगभरात निरनिराळे कार्यक्रम, उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. ज्यायोगे शाश्वत वन व्यवस्थापनाला चालना दिली जाईल.

जागतिक व राष्ट्रीय वननितीनुसार ३३% भूभाग, वनक्षेत्र असावे त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील वनांकडे एक कटाक्ष टाकला तर आपल्याला आशादायी चित्र दिसेल. वनाचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन १८६० पासून आपल्या देशात सुरु झाले, ते स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत चालू होते. स्वातंत्र्योत्तर काळात यात आमुलाग्र बदल करण्यात आले. आता तर राष्ट्रीय वन आयोगाच्या शिफारसीनुसार वन व वन्यजीवांच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी राज्याने आपले स्वतंत्र वन धोरण जाहीर केले आहे. शास्त्रशुद्ध व्यवस्थापन तंत्राचा वापर करुन नैसर्गिक आणि मानवनिर्मित वनांचे संवर्धन, जैव विविधतचे संरक्षण आणि शाश्वत विकास करणे हा वन धोरणाचा महत्वपूर्ण उद्देश आहे.

वनाच्या संवर्धनाबरोबर वनाचे महत्व, निसर्गाच्या सान्निद्यात मिळणारा आनंद पर्यटकांना मिळावा यासाठी वन विभागाने निसर्ग पर्यटन धोरणही जाहीर केले आहे. पर्यटकांना दैनंदिन सुविधा पुरवून निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणे, स्थानिकांना रोजगार मिळवून देणे, त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करणे हा या मागचा उद्देश आहे.

वन व्यवस्थापन चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी वनांचे संरक्षण आणि संवर्धन यात लोकांचा सहभाग वाढविण्याकरीता संयुक्त काम करण्याचे धोरण हाती घेण्यात आले आहे. या समित्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संत तुकाराम वनग्राम योजनेंतर्गत पुरस्कार सुरू केले आहेत. जिल्हास्तरावर ५१ हजारांचे पहिले, २१ हजारांचे द्वितीय, तर ११ हजारांचे तृतीय पारितोषिक देण्यात येते. राज्यस्तरावर १० लाखांचे पहिले, पाच लाखांचे द्वितीय, तर तीन लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक दिले जाते.

दुर्मिळ औषधी वनस्पतींची जोपासना व्हावी व वनांत राहणाऱ्यांना रोजगार मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य वनौषधी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वनसंरक्षण आणि वन–वृद्धी हे आपले राष्ट्रीय कार्य आहे याची समाजातील प्रत्येक थराला जाणीव करून देण्यासाठीच १९५० सालापासून वनमहोत्सव साजरा करण्याची योजना आखण्यात आली. राष्ट्राचा एक घटक या नात्याने प्रत्यकाने या राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण केले पाहिजे. वनसंपत्ती ही राष्ट्राची व पर्यायाने प्रत्येकाच्या मालकीची आहे व तिच्या संरक्षणाची जबाबदारी केवळ शासनाची, या दृढ दुर्देवाने रूढ झालेल्या कल्पनेच्या अनिष्ट परिणामांची जाणीव जनतेला करून देणे हे वनमहोत्सवाचे महत्वाचे अंग आहे. निष्कारण व अयोग्य वनसंहार हा आपल्या व भावी पिढीच्या प्रगतीला मारक आहे याची प्रत्येकाने जाणीव ठेवली पाहिजे.

वर्षा ऋतुच्या आगमनाबरोबरच तसेच ता. १५ ऑगस्ट, ता. दोन ऑक्टोबर वनजीव सप्ताह, ता. २१ मार्च जागतिक वन दिन, पाच जून जागतिक पर्यावरण दिन या राष्ट्रीय दिनी आपण शक्य त्या ठिकाणी अधिकाधिक झाडें लावून व वन संवर्धन करून राष्ट्राच्या जंगल संपत्तीत वाढ करावी व आपला देश 'सुजलाम् सुफलाम्' करण्यासाठी वैयक्तीक प्रयत्नांबरोबरच सामुदायिकरीत्या प्रयत्न करावे कारण, "वृक्ष रक्षति रक्षता" जग हे जगवायचे असेल तर ते झाडेच जगवू शकतात.

जाता जाता, एक झाड मानवास म्हणतो की,

जेथे जातो तेथे तू माझा संगती

हे मानवा कृपा करून विसरू नको

हिवाळ्यात तुझ्या शेकोटितील उब मी आहे

उन्हाळ्यात तुझ्या डोक्यावरील छाया मी आहे

माझी फळे प्रवासात तुझी भूक भागवितात

आणि त्यांचे रस तुझा सुकलेला घसा ओला करतात

तुझ्या घराचा मी खांब आहे

नदी नाल्यातून नेणारी तुझी नाव मी आहे

विश्रांती देणारा तुझा मेचक मीच आहे

मी तुझ्या कुदळीचा दांडाही आहे

मी नांगराचा फाल आहे, मी गाडीचे चाक आहे

पाळण्यामध्ये तुला जोजवनाराही मीच होतो

आणि स्वर्गाच्या स्वारीचा वाहकही मीच असणार आहे

हे मानवा कृपा करून विसरू नको.

लेखक :– कामाजी पवार, विभागीय वन अधिकारी, हिंगोली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २४ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, आसाळह मासो, बुधवार, आषाढ माहे.

२४ जुलै १९१७ – रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा राजर्षी शाहू महाराजांचां आदेश काढला.

२४ जुलै १९२१ – रोजी शाहू महाराजांनी दान केलेल्या कोल्हापुरातील रंकाळा जागेवर "नाभिक स्टुडंट्स वसतिगृह" सुरू करण्यात आले.

२४ जुलै १९२९ – रोजी वतनदारी ही महारांच्या उत्कर्षाच्या मार्गातील धोंड आहे हे जाणून माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वतनदारी पद्धत नष्ट होण्यासंबंधीचे विधेयक विधिमंडळात मांडले होते. पण सनातनी वर्गातल्या जवळजवळ सर्वच सदस्यांनी विधेयकाकडे आपली पाठ फिरवली. काही सदस्यांनी सरकार पक्षाची पाठरांखणी केली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैतागून आपले विधेयक मागे घेतले.

२४ जुलै १९३५ – रोजी नाशिक जिल्हा कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन.

२४ जुलै १९३६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठामपणे सांगितले की त्यांनी हिंदुत्व सोडल्यास त्यांच्या समुदायाच्या राजकीय हक्कांवर परिणाम होणार नाही.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २५ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, आसाळह मासो, गुरूवार, आषाढ माहे.

२५ जुलै १८५६ – रोजी विधवा विवाहाचा कायदा हिंदी सरकारने संम्मतबकेला.

२५ जुलै १९४६ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेवटी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "एक मोठा समुदाय असूनही, आम्हाला कित्येक दशके मूलभूत न्याय नाकारला जात आहे. आमच्यावर अत्याचार करण्यात आले, आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले गेले. आम्हाला दोन्ही बाजुंकडून सहानुभूती मिळाली नाही. आम्ही न्याय आणि चांगुलपणा शोधला आहे. चला आपण त्यांना मिळविण्याचा प्रयत्न करूया, अन्यथा त्याचे परिणाम खूप भयानक असतील."

२५ जुलै १९५० – रोजी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या विद्यमाने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बुद्ध धंम्मावर व्याख्यान.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २६ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, आसाळह मासो, शुक्रवार, आषाढ माहे.

२६ जुलै १९०२ – रोजी मागासलेल्या वर्गाकरिता सरकारी नोकरीत ५०% जागा राखीव ठेवण्याचा जाहीरनामा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी काढला.

२६ जुलै १९४२ – रोजी एक हरिजन एम. एल. सी. यांनी गांधींना विचारलेल्या पाच प्रश्नांना दिलेली उत्तरे हरिजन पत्रकात प्रसिद्ध.

२६ जुलै १९४३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विधानसभेतील वादविवाद मध्यवर्ती मध्ये "वॉर इंजेरिज विधेयक (नुकसान भरपाई विमा)" तसेच "भारतीय बॉयलर दुरुस्ती विधेयक" यावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २७ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, आसाळ्ह मासो, शनिवार, आषाढ माहे.

२७ जुलै १९१७ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी विधवा पुनर्विवाहाचा कायदा व विवाह नोंदणी कायदा लागू केला.

२७ जुलै १९२७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई विधानसभेच्या चर्चेत "बाँबे युनिव्हर्सिटी ॲक्ट दुरुस्ती विधेयक : १" यावर चर्चा केली.

२७ जुलै १९२८ – रोजी सातारा तालुक्यातील एका खेड्यातील महाराचा खटला चालविण्यासाठी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे साताऱ्याला पोहोचले.

२७ जुलै १९४२ – रोजी व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री पदावर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुजू.

२७ जुलै १९४६ – रोजी काँग्रेस नेत्यांना डॉ. आंबेडकरांशी तडजोड व्हावी अशी आवश्यकता वाटू लागल्याणे प्रांतिक काँग्रेसचे नेते स. का. पाटील यांनी सिद्धार्थ महाविद्यालयात जाऊन माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेतली.

२७ जुलै २०१५ – रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईलमॅन, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन. यांचा मृत्यू शिलाँग, मेघालय येथे झाला होता.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २८ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, आसाळ्ह मासो, रविवार, आषाढ माहे.

२८ जुलै १९२८ – रोजी मुंबई विधिमंडळात मांडलेल्या स्त्री कामगारांना प्रसूती काळात रजा वगैरे सवलती संबंधीच्या विधेयकास माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठाम पाठिंबा जाहीर केला.

*२८ जुलै १९४० – रोजी "निश्चयाने, निष्ठेने आणि निमुटपणे कार्य करणारे कार्यकर्ते हवेत." दामोदर ठाकरसी गृह, परळ, मुंबई येथील ठाणे येथील अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृह

सहायक मंडळाच्या विद्यमाने अस्पृश्य समाजाच्या झालेल्या खुल्या जाहीर सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले. सदर भाषण जनता वृत्तपत्रात ३ ऑगस्ट १९४० रोजी प्रसिद्ध करण्यात आले.*

२८ जुलै १९८४ – रोजी भदंत धंम्मकीर्ती स्मृतिदिन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २९ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, आसाळह मासो, सोमवार, आषाढ माहे.

२९ जुलै १८५२ – रोजी पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांच्या हस्ते विश्रामबाग वाड्यात स्त्री शिक्षणाचे भारतीय उद्गाते म्हणून महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा सन्मान करण्यात आला.

२९ जुलै १९२७ – रोजी बहिष्कृत भारतचा नववा (९) अंक प्रकाशित झाला.

२९ जुलै १९३३ – रोजी कन्हान नदीला महापूर, कामठी शहरातील अस्पृश्यांची ४० घरे जमीनदोस्त, बाबू हरदास यांनी पुढाकार घेऊन पूरग्रस्तांना निवारा दिला.

२९ जुलै १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे "अनुसूचित जाती सुधार ट्रस्ट Scheduled Caste Improvement Trust" याची स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३० जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, आसाळह मासो, मंगळवार, आषाढ माहे.

३० जुलै १९३३ – रोजी पुणे करारावर जॉईट पार्लमेंटरी कमिटीत चर्चा.

३० जुलै १९३५ – रोजी 'जागतिक मैत्री दिन.'

३० जुलै १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ज्ञान म्हणजे शक्ती आहे असा माझा नेहमीचा विश्वास आहे. अनुसूचित जाती स्वातंत्र्य मिळविण्याचे उद्दिष्ट्य साध्य करणार नाहीत जोपर्यंत सर्व प्रकारच्या ज्ञानाची सखोल माहिती घेत नाहीत. मला विश्वास आहे की आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स, पूना त्या दिशेने विश्वासार्ह प्रयत्न करेल.

*३० जुलै १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेवर त्वरित निवड व्हावी असे डॉ.

राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांना पत्र पाठविले.*

३० जुलै १९४८ – रोजी घटना समितीचे अधिवेशन सुरू झाले.

३० जुलै १९५३ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मराठवाडा शेड्युल्ड कास्टस फेडरेशनच्या परिषदेत भाषण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🦚🦚☸☸☸🔵🔵🔵💎 जागतिक मैत्री दिन (ज्याला आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस किंवा मित्र दिवस म्हणून देखील ओळखले जाते.) 💎🔵🔵🔵☸☸☸🦚🦚

मैत्री दिन (ज्याला आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस किंवा मित्र दिवस म्हणून देखील ओळखले जाते.) हा अनेक देशांमध्ये मैत्री साजरा करण्याचा दिवस आहे. सुरुवातीला ग्रीटिंग कार्ड उद्योगाने त्याचा प्रचार केला; सोशल नेटवर्किंग साइट्सवरील पुराव्यांवरून मैत्री दिवस मधील स्वारस्याचे पुनरुज्जीवन दिसून येते जे इंटरनेटच्या प्रसारामुळे, विशेषतः भारत, बांगलादेश आणि मलेशियामध्ये वाढले असावे. मोबाईल फोन, डिजिटल कम्युनिकेशन आणि सोशल मीडियाने प्रथा लोकप्रिय होण्यास हातभार लावला आहे. दक्षिण आशियात या दिवसाचा प्रचार करणारे १९३५ मध्ये युनायटेड स्टेट्समध्ये सुरू झालेल्या मित्रांच्या सन्मानार्थ एक दिवस समर्पित करण्याच्या परंपरेचे श्रेय देतात.

१९५८ मध्ये जॉयस हॉलने पॅराग्वेमध्ये पहिल्यांदा फ्रेंडशिप डेचा प्रस्ताव ठेवला होता. ही एक सुट्टी होती ज्यामध्ये जागतिक सुट्टीद्वारे मैत्री साजरी होते. उत्सवाची मूळ तारीख २ ऑगस्ट होती, तरीही युनायटेड स्टेट्समधील डी-सिंक्रोनायझेशनमुळे ती ७ ऑगस्टपर्यंत हलवली गेली आहे.

फ्रेंडशिप डेच्या सन्मानार्थ, २९९८ मध्ये, नाने अन्नान यांनी विनी द पूह यांना संयुक्त राष्ट्रांमध्ये मैत्रीचे जागतिक राजदूत म्हणून नियुक्त केले. हा कार्यक्रम संयुक्त राष्ट्र सार्वजनिक माहिती विभाग आणि डिस्ने एंटरप्रायझेसने सह–प्रायोजित केला होता, ज्याचे सह–होस्ट कॅथी ली गिफर्ड होते.

जागतिक मैत्री दिनाची कल्पना सर्वप्रथम २० जुलै २९५८ रोजी डॉ. रॅमन आर्टेमियो ब्राचो यांनी पॅराग्वे, पॅराग्वेच्या असुनसिओनच्या उत्तरेला सुमारे २०० मैल (३२० किमी) नदीवरील पॅराग्वे नदीवर असलेल्या प्युर्टो पिनास्को येथे मित्रांसोबत जेवणाच्या वेळी मांडली होती.

या भेटीदरम्यान, जागतिक मैत्री धर्मयुद्धाचा जन्म झाला. वर्ल्ड फ्रेंडशिप क्रुसेड हा एक पाया आहे जो वंश, रंग किंवा धर्माचा विचार न करता सर्व मानवांमध्ये मैत्री आणि सहवास वाढवतो. तेव्हापासून, ३० जुलै हा दरवर्षी पॅराग्वेमध्ये फ्रेंडशिप डे म्हणून साजरा केला जातो आणि इतर अनेक देशांनीही तो स्वीकारला आहे.

वर्ल्ड फ्रेंडशिप क्रुसेडने ३० जुलै हा जागतिक मैत्री दिन म्हणून ओळखण्यासाठी अनेक वर्षांपासून युनायटेड नेशन्सकडे लॉबिंग केले आहे; शेवटी, २०११ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ३० जुलै हा आंतरराष्ट्रीय मैत्री दिवस म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आणि सर्व सदस्य राष्ट्रांना त्यांच्या स्थानिक, राष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्कृती आणि रीतिरिवाजानुसार आंतरराष्ट्रीय मैत्री दिन पाळण्यासाठी आमंत्रित केले. समुदाय, ज्यामध्ये शिक्षण आणि जनजागृती–उभारणी उपक्रमांचा समावेश आहे.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३१ जुलै २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, आसाळ्ह मासो, बुधवार, आषाढ माहे.

३१ जुलै १९३७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धुळे येथील विजयानंद नाट्यगृहामध्ये भाषण. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "आपल्या समाजाच्या हिताकडे कानाडोळा करणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या जागी सामाजिक जीवनात आपल्याला चालणाऱ्या पक्षाचे प्रतिनिधी आता आरूढ झालेले आहेत. काँग्रेसने तयार केलेल्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून ब्राम्हणवाद फुलत आहे. काँग्रेसच्या सर्व मंत्रिमंडळाचे नेतृत्व ब्राम्हणांच्या ताब्यात आहे आणि कोणतेही मंत्री आपले मूळनिवासी नाहीत." सदर भाषण जनता वृत्तपत्रात ७ आणि १४ ऑगस्ट १९३७ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

३१ जुलै १९४१ रोजी भारतमंत्री कर्नल अमेरी यांना माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तार.

३१ जुलै १९५५ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई राज्य कनिष्ठ गावकामागार असोसियशन या संस्थेची मुंबईत स्थापना केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. १ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, आसाळह मासो, गुरूवार, आषाढ माहे.

१ ऑगस्ट १९१८ – रोजी गुन्हेगार लोकांच्या जातीची हजेरी बंद करणारे आज्ञापत्रक राजर्षी शाहू महाराजांनी काढले.

१ ऑगस्ट १९२० – रोजी प्रतिभावंत साहित्यिक, कादंबरीकार, लेखक, कवी, लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती.

१ ऑगस्ट १९४१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. अमेरी यांना संबोधित केलेल्या पत्रात म्हंटले होते की, "मूळनिवासी वर्ग स्वतःला व्हॉईसरॉयच्या पूनरगठित कौन्सिलमधून वागळण्याला घोर अपमान आणि विश्वासघात मानतो. मला मूळनिवासी वर्गासाठी न्याय हवा आहे. मी तुम्हाला चेतावणी देतो की, मूळनिवासी लोक परिषदेत त्यांचे प्रतिनिधित्त्व करण्याचां अधिकार सोडण्यास तयार नाहीत. मी तुम्हाला ठामपणे निक्षून सांगण्याची विनंती करतो की, तुम्ही परवानगी द्यावी. कौन्सिलचां एक सदस्य वाढविण्यात कोणतीही अडचण येणार नाही."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *विद्रोही साहित्यिक : अण्णा भाऊ साठे* 💎🦚🦚🦚☸☸

साहित्यरत्न, साहित्य सम्राट, लोकशाहीर बहुजननायक, विज्ञानवादी विचारवंत, वास्तववादी लेखक, कॉम्रेड (समाजसुधारक) अण्णा भाऊ साठे विद्रोही विचाराचे लेखक होते. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील “नाठाळाच्या माथी हाणावी काठी” हा विद्रोह किंवा “जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा,” याचा अर्थ जो दुसऱ्यांच्या दुःखात सामील होतो, रंजले–गांजलेल्यांना आपले मानतो, तोच खरा साधू आहे. देवही अशा ठिकाणी असतो. इथे संत तुकाराम महाराज सामाजिक समतेचा संदेश देतात. अगदी याचप्रमाणे ह्या आधुनिक तुकाराम उर्फ अण्णा भाऊ साठे यांचे लेखनही वास्तववादी व विद्रोही आहे.

प्रत्येक महान महापुरुषांच्या जीवनाची वैयक्तिक जीवनव्यथा, तीच अवस्था काँम्रेड (साजसुधारक/सहकारी) अण्णा भाऊ साठे यांचीही आहे, त्यामुळे मी जास्त त्यावर भाष्य करणार नाही.

०१/०८/१९२० वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली येथील जन्म, दीड दिवसाची शाळा, वाटेगाव ते मुंबई पायी प्रवास, मुंबईचं हलाखीच जगणं, ते जगणं कसलं? रोजचं मरणं, यातून तावून सुलाखून लेखक होणं, त्या काळी आपल्या लेखनीच्या जोरावर मुंबई ते रशिया विमानाने प्रवास करणं, हा दैदिप्यमान प्रवास खडतर होता, हा एक सामान्य माणूस ते एका महापुरुषापर्यंतचा प्रवास आपल्यासाठी निश्चित प्रेरणादायक आहे व प्रेरणादायी राहिल. पण, त्यांचा झालेला करूण अंत ही देखील विचार करायला लावणारी गोष्ट आहे. त्यांचे जीवन हेही वास्तवात एक व्यवस्थेविरोधी केलेला विद्रोहच होता.

साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची साहित्य संपदा काळजाला भिडणारी आहे, ती जात, पात, धर्म या पलीकडे जावून माणसाचे गीत गाते. त्यात समाजवाद मानवतावाद, वास्तवतावाद, साम्यवाद ठासून भरला आहे. यात खरी धन्यता आहे. त्यांनी साहित्यात जी पात्रे निर्माण केली ते समाजाचे प्रतिनिधीत्व अर्थात माणसाचे प्रतिनिधीत्व करतात व ही पात्रे माणूस म्हणून कसे जगावे? याचा आदर्श घालून देतात. हाच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा विजय आहे! तोही त्या काळातील समाज व्यवस्थे विरुद्ध केलेला विद्रोहच होता.

साहित्याला सोंदर्य नसतं असं म्हणणाऱ्यांना अण्णा भाऊ साठे फार समर्पक उत्तर देताना दिसतात, साहित्य हे लिहून–लिहून, आणि जे लिहिले ते जगून सुंदर होते. साहित्याचे प्रयोजन काय? किंवा साहित्य कशासाठी याचे उत्तर शोधताना ते म्हणतात. –

‘उर ब्रम्हांडाचे फोडी,

काळाची हाडे मोडी,

आकाशा खाली ओढी,

तो मी आज नमिला!'

अशा कर्तबगार मानवाच्या कार्याचे गोडवे गाण्यासाठी माझी लेखणी मी पाजळली आहे, असे अण्णा भाऊ साठे म्हणतात.

कला वर्गातीत असावी, ही अपेक्षाही त्यांनी तोडून काढली आहे. जी डमडमच्या गोळ्या मोजते ती आमची कला असावी. जी माडीतल्या मांडीवरच्या खुणा मोजते ती आमची कला नव्हे. 'बोक्याची कामवासना शमवण्याचा प्रयत्न करणारी मुलगी आमची कला होऊ शकत नाही. दलितांवर, कष्टकऱ्यांवर, श्रमिकांवर व त्याच्या संघर्षावर, आणि अंतिम विजय आमचाच आहे, यावर आमचा विश्वास आहे.' यापेक्षा अधिक सुंदर साहित्य प्रयोजन ते काय असते? हा एक प्रकारचा विद्रोह नाही का?

तुम्हाला काही नवीन घडवायचं असेल, व्यवस्था बदलायची असेल, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ले परतवून लावायचे असतील, मूलतत्त्ववाद्यांविरूद्ध शड्डू ठोकायचा असेल, तर तुम्हाला भूमिका घ्यावीच लागते, राजकारण करावंच लागतं. भूमिकेतून पळ काढून चालणार नाही, जगण्यात, लिहण्यात, गाण्यात, नाटकात भूमिका घ्यावीच लागते. ती घेताना एक भान ठेवावं लागतं. साहित्य ही एक कलाकृती असते याचं. आणि अण्णा भाऊ साठे यांनी तेच केले.

'कामगार आहे मी तळपती तलवार आहे, सारस्वतांनो, याद राखा थोडासा गुन्हा करणार आहे.' असं सांगत सुर्वेनी कलात्मकतेचे भान ठेवले, तेच भान 'जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेले मज भीमराव' असे म्हणत अण्णा भाऊ साठेंनी जपलं. काळजातून किंवा स्मृतीपटलांच्या तरंग लहरीतून येणारा प्रत्येक शब्द सुंदरच असतो, त्या त्या गोष्टीचे सौंदर्य त्या त्या गोष्टीतून व्यक्त होत असते, तलवारीचं सौंदर्य धारेत, तर फुलाचे सौंदर्य त्याच्या रंगागंधात असतं, तलवारीला रंग गंध का नाही? हे विचारणं मुर्खपणाच होय! अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याला लाभलेली कलात्मकता अवर्णनीय आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात अवतरणारी मराठी भाषा म्हणजे सौंदर्याचा कळस आहे! तिला कधी अंकुर फुटतात, तर कधी भाले! अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला विचारांची झळाळी आहे, गंज नाही, त्यांनी स्विकारला मार्क्सवाद येथील विषमतेला कुरवाळणारा नव्हता, तर इथलं जातवास्तव, वर्गवास्तव, धर्मवास्तव, हे पुन्हा पुन्हा मांडण्याला कुणी प्रचार म्हणत असले तर जरूर म्हणावं, असं अण्णा भाऊ साठे ठणकावून सांगतात.अण्णा भाऊ साठेंचं साहित्य आणि लढण्याच्या प्रेरणा या साम्यवादातून आल्या आहेत,ते आतून बाहेरून कम्युनिस्ट होते,हे पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज नाही! या मुसीतूनच त्याच्यातील साहित्यिक, कवि, शाहीर, कलावंत व कार्यकर्ता बनला होता. आपल्यातील कॉम्रेड (सहकारी) जीवंत ठेवतच त्यांनी शाहू, फुले, आंबेडकरी प्रेरणांना जवळ केलं होतं. त्यांनी वैश्विक मार्क्सवाद जेवढ्या निष्ठेने स्विकारला होता, तसा इथल्या पुरोगामी, परिवर्तनवादी परंपराशी त्यांनी इमान राखलं होतं! एवढं सारं असूनही आपण सातत्याने अण्णा भाऊ साठे यांची तात्विक ओळख कोणती यावर वाद घालत बसतो. अण्णा भाऊ साठे यांना आंबेडकरवादी, फुलेवादी, समतावादी, म्हणण्यात गैर काहीच नाही, पण त्यांच्यात भरलेला मार्क्सवाद खोडून काढणं हे केवळ गैर आणि गैरच आहे. अण्णा भाऊ साठे यांनी मार्क्सवाद कधी सोडला नाही आणि दलितांच्या म्हणजे येथील जातीय प्रश्नाकडे कधी डोळेझाक केली नाही. किती मोठा विद्रोह आहे हा!

"हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दलितांच्या, कष्टकऱ्यांच्या, तळहातावर तरली आहे." या वाक्याचा अर्थ खूप गांभीर्याने समजुन घेतला पाहिजे, ईश्वर, परमेश्वर, अल्ला, देव, गॉड, यांची अनैसर्गिक मालकी असणारी ही पृथ्वी तिचा सातबाराच कॉम्रेड अण्णा भाऊ साठेयांनी माणसाच्या नावे केला! खूप मोठ्या उत्क्रांतीकडे झेप घेणारं हे वाक्य आहे. ही पृथ्वी, नसलेल्या देवांनी बळकावली होती, ती मानवाच्या, विशेषत्वाने, दलितांच्या, श्रमणाऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या तळहातावर येणं, तिच्यावर श्रमाचं गोंदण लागणं, ही अतुलनीय गोष्ट होय! ती गोष्ट अण्णा भाऊ साठेंनी केली, हा फार मोठा विद्रोह अण्णा भाऊ साठे यांनी केला असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही! हे जग श्रम करणारे घडवतात, आणि भांडवलदार ते धनाच्या आणि मनगटाच्या जोरावर बळकावतात, हा खेळ अनंत काळापासून चालू आहे. अण्णा भाऊ साठेंनी या खेळाचा फैसला केला. शेषाच्या मस्तकावरची ही पृथ्वी, जी खगोलीय वस्तु आहे ती दलितांना, कष्टकऱ्यांना, कामगारांना, श्रमीकांना देऊन टाकली. तिचं लालन पालन करण्याची जबाबदारीही अर्थात पर्यायानं याच मानवावर व मानवता धर्मावर आली. धर्म, आध्यात्म, अंधश्रद्धा, आणि कष्टकरी याच्या लढाईत शेवटी कष्टकरी, मानवच, विजयी झाला! असा अर्थ अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून प्रतित होतो. ही विद्रोही भूमिका त्या काळी घेणे, त्या मुसीतून लेखन करणे, हे अण्णा भाऊ साठे यांच्या सारखा लेखकच करू शकतो.

आता पुन्हा नव्याने या जगाचा मालक कोण? हा प्रश्न ऐरणीवर आला आहे, जुन्या कढ्यांना नव्याने ऊतू येत आहे, नव्याने या धरतीचा मालक कोण? याचा फैसला होतो आहे, नव्या भांडवलशाहीने सन १९९० नंतर पुन्हा एकदा जगावर कब्जा केला आहे. खाजगीकरणाच्या रेट्यात सगळं नव्या भांडवलदारांच्या हातात जात आहे. खाजगीकरण निसर्ग ओरबाडून खात आहे, हवा, पाणी, जमीन, जंगल, डोंगर, नद्या, सुर्य, चंद्र, तारे, ग्रह समुद्र, रस्ते, गॅस ही नैसर्गिक साधनसंपत्ती नव्या भांडवलदारांच्या मालकीची होत आहे, अशा परिस्थितीत नवी लढाई अटळ आहे, आणि ती बहुजन, श्रमिक, कामगारांनी एकत्र येऊन लढाईची आहे. जगावरची अण्णा भाऊ साठेंना अभिप्रेत असणारी मालकी आपण नीट प्रस्थापित केली नाही तर पुन्हा गुलामीचं जग तयार व्हायला वेळ लागणार नाही! म्हणून सर्वांनी मिळून एकत्र येऊन ही लढाई लढायची आहे, कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचे जीवनकार्य हे सर्व मानव कल्याणासाठीचे होते हे कोण्या एका जातीपुरते मर्यादित नव्हते, त्यांना जातीत बंदिस्त करणे हा देखील गुन्हा ठरेल, म्हणूनच मानवी कल्याणासाठी सध्यस्थितीत वरील परिस्थितीला मानव म्हणून सामोरे जात असताना प्रत्येक मानवाला वरील सर्वच बाबी विरोधात विद्रोह करावा लागेल, त्यांची शिकवण लक्षात ठेवली पाहिजे. –

"रणी पळू नका,

मागे वळू नका,

कुणी चळू नका,

बिनी मारायची अजूनही राहिली,

माझ्या जिवाची होतीया काह्यलि!" ......

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांची ही आर्त हाक लक्षात घेऊन या मानवी कल्याणाच्या लढाईत अग्रेसर राहण्याचा माझ्यासह सर्वांनी प्रयन्त करू या व त्यांची विद्रोहाची ज्योत जी मानव्याचे हीत साधते ती, तेवत ठेवू या.🙏🤝

– लेखक, भारतीपुत्र, टी. एस. क्षीरसागर, सोलापूर

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. २ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सुक्कवारो, आसाळह मासो, शुक्रवार, आषाढ माहे.

२ ऑगस्ट १८७६ – रोजी पिंगाली वेंकय्या जयंती.

२ ऑगस्ट १९०२ – रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी, स्त्रियांचा छळ आणि घटस्फोट (काडीमोड) याविषयी स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा केला.

२ ऑगस्ट १९४२ – रोजी भावी राज्यघटनेत हरिजनाधी जातीचा दर्जा कायम राहील वगैरे पाच प्रश्नांवर गांधींनी हरिजन पत्रकात दिलेली उत्तरे दैनिक महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध.

२ ऑगस्ट १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री पदावर नेमणूक.

२ ऑगस्ट १९४९ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभा चर्चेत कलम २१३, २१४ यावर चर्चा केली.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

💎 पिंगाली वेंकय्या 💎

पिंगाली वेंकय्या (नामभेद व्यंकय्या) (२ ऑगस्ट १८७६ - ४ जुलै १९६३) हे एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक होते. ते महात्मा गांधींचे कट्टर अनुयायी होते आणि ज्या ध्वजावर भारतीय राष्ट्रध्वज आधारित होता त्याचे डिझायनर होते. त्यांचा जन्म एका तेलुगू ब्राह्मण कुटुंबात भातलापेनुमारु, मछलीपट्टणमजवळ, आंध्र प्रदेश राज्यात झाला.

💎 भारतीय राष्ट्रध्वजाचे कल्पक

इ. स. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी विविध तथाकथित राष्ट्रीय ध्वज भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सदस्यांनी वापरले होते. कृष्णा जिल्ह्यातील पिंगली व्यंकय्या यांनी राष्ट्रध्वजाची रचना केली आणि एप्रिल १९२१ रोजी विजयवाडा शहराच्या नंतरच्या भेटीदरम्यान महात्मा गांधींना तो सादर केला.

द हिंदू मधील माहिती नुसार, "पिंगली व्यंकय्या हे शेतकरी आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी मछलीपट्टणम मध्ये एक शैक्षणिक संस्था स्थापन केली होती. इ. स. १९६३ मध्ये त्यांचा गरिबीत मृत्यू झाला. भारतीय समाजाने मात्र त्यांची दखल त्यावेळी घेतली नाही. इ. स. २००९ मध्ये त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकार तर्फे एक टपाल तिकीट जारी करण्यात आले. तसेच २०११ मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न प्रदान करण्याचा प्रस्ताव देखील ठेवण्यात आला. परंतु या प्रस्तावावर केंद्र सरकारचा निर्णय अद्याप झालेला नाही.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ३ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, सनिवारो, आसाळह मासो, शनिवार, आषाढ माहे.

३ ऑगस्ट १९२८ – रोजी मुंबई प्रांतिक समितीवर माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सदस्य म्हणून निवड. मुंबई कौन्सिलमध्ये (विधीमंडळात) महार वतने नष्ट करण्यासंबंधीचे आंबेडकरांनी विधेयक मांडले.

३ ऑगस्ट १९४७ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले, आज केबिनेट मंत्र्यांची नावे जाहीर केली गेली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायदामंत्री केले गेले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ४ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, आदिच्चवारो, आसाळ्ह मासो, रविवार, आषाढ माहे.

४ ऑगस्ट १९२३ – रोजी रावबहादूर सी. के. बोले यांनी सरकारी व सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालय व न्यायालय या सर्व ठिकाणी अस्पृश्यांना मुक्तसंचार असावा असा क्रांतीकारक ठराव मुंबई विधिमंडळात मांडला.

४ ऑगस्ट १९२७ – रोजी सार्वजनिक पाणवठ्यावर अस्पृश्यांना बंदी घालणारा जुना ठराव महाड म्युंसिपालटीने रद्दबातल केला.

४ ऑगस्ट १९३८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारत सेवक समाजाचे दिवाणखान्यात मध्यप्रांताचे माजी मुख्यप्रधान डॉ. खरे यांचे स्वागत करण्यासाठी झालेल्या समारंभात बाबासाहेबांनी "महाराष्ट्रीयांची पिछेहाट का होते? आज फक्त पैसा बोलतो. पैशाने बुद्धिवर कब्जा केला आहे. बुद्धी आणि शिल् या दोघांना पैशाने पराभूत केले आहे, हे सत्य आहे." असे भाषण केले. सदर भाषण विविध वृतात १४ ऑगस्ट १९३८ रोजी प्रसिद्ध झाले.

४ ऑगस्ट १९४५ – रोजी डॉ. आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स या संस्थेच्या उद्घाटन प्रसंगी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुणे येथे भाषण.

४ ऑगस्ट १९५८ – रोजी "मैत्री साजरी करण्याचा दिवस." भारतामध्ये ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस किंवा मैत्री दिन साजरा केला जातो. इ. स. १९५८ पासून पेरुग्वेमध्ये सुरू झालेला हा जागतिक मैत्री दिन उपक्रम दक्षिण अमेरिकेतील बहुतांशी देशात आवर्जून साजरा केला जातो. परंतु मैत्री दिन २५६८ वर्षापूर्वीच गौतम बुद्धांनी सुरू केला आहे तो सर्वांना करुणेने वागवावे.

४ ऑगस्ट १९७८ – रोजी मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातील शहीद पोचिराम कांबळे व जनार्दन मावाडे यांच्या स्मृतिदिना निमित्त विनम्र अभिवादन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ५ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, चंदवारो, सावणो मासो, सोमवार, श्रावण माहे.

५ ऑगस्ट १९२८ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सायमन कमिशनवर (प्रांतिक समिती) काम करण्यासाठी मुंबई विधिमंडळाने निवड केली.

५ ऑगस्ट १९३८ – रोजी परळ येथील हिंदू पुढाऱ्यांच्या सभेत माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण.

५ ऑगस्ट १९३८ – रोजी श्री. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली, मुंबईच्या परळ येथील सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीच्या दिवाणखान्यात, डॉ. खरे यांचा आणखी एक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या समारंभाच्या भाषणात सांगितले की, "प्रत्येकाने काँग्रेसमधे यावे, असे डॉ. खरे म्हणाले. काही काँग्रेसवाले असे म्हणतात की, तुम्ही काँग्रेसमधे सामिल व्हा आणि काँग्रेसमधे जी घाण आहे ती उद्ध्वस्त करा. यावर मी असे म्हणतो की, जर तुम्ही घाण पसराल तर तुम्हालाच ते साफ करावे लागेल. मी माझे स्वच्छ कपडे घालून तुमची ती घाण का स्वच्छ करावी? तुम्ही तुमची घाण स्वच्छ करा मग आम्ही विचार करू की, आपल्या स्वच्छ कपड्यांसह काँग्रेसमधे जावे की नाही." सदर भाषण विविध वृत्तांत २० ऑगस्ट १९३८ रोजी प्रसिद्ध झाले.

५ ऑगस्ट १९४६ – रोजी नवे हंगामी सरकार बनविताना काँग्रेसने मूळनिवास्यांना ज्याप्रकारे वागविले आहे तो प्रकार लक्षात घेता या नव्या हंगामी स्वराज्याला वर्गिकृतांच्या फेडरेशनची मान्यता मिळणार नाही. अशा आशयाचे विचार वर्गिकृतांचे पुढारी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नव्या हंगामी स्वराज्य सरकार विषयी बोलताना पुणे येथे प्रकट केले. सदर भाषण गरुड या अंकात १ सप्टेंबर १९४६ रोजी प्रसिद्ध झाले.

५ ऑगस्ट १९४७ – रोजी मुंबई म्युंसिपल कामगारांतर्फे माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रू. २००१ ची थैली अर्पण.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ६ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, कुंजवारो, सावणो मासो, मंगळवार, श्रावण माहे.

६ ऑगस्ट १९२० – रोजी पंढरपूर येथे संतपेठ महारवाड्यात बहिष्कृत वर्गाची जाहीर सभा.

६ ऑगस्ट १९३१ – रोजी गांधी गोलमेज परिषदेत भाग घेतील की नाही हे अद्याप ठरलेले नव्हते. गांधींना शर्यतीच्या काळात आणि घाईत त्यांच्या मागण्यांविषयी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माहिती द्यावयाची होती. म्हणून गांधींनी आंबेडकरांना एक पत्र लिहिले की, "डॉ. आंबेडकर यांना थोडा वेळ मिळाला तर त्या रात्री ते आठ वाजता त्यांना भेटायला येतील. आंबेडकरांना सोयीस्कर असल्यास ते आनंदाने डॉ. आंबेडकरांच्या निवासस्थानी येतील."

६ ऑगस्ट १९४४ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाठविलेल्या पत्राला गांधीजींनी उत्तर दिले की, "दलित वर्गाचा प्रश्न हा धार्मिक नि सामाजिक आहे. मला तुमच्या कर्तृत्वाची पूर्ण कल्पना आहे. तुमच्या सारखा पुरुष माझा सहकारी झाल्यास मला आनंद वाटेल, तथापि ह्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी आपले मतभेद आहेत. ते एकदा मी मोठी किंमत दिल्यामुळे मला माहीत झाले आहे."

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ७ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, बुधवारो, सावणो मासो, बुधवार, श्रावण माहे.

७ ऑगस्ट १९३७ – रोजी नागपाडा, नेबरहुड हाऊस, मुंबई येथे स्वतंत्र मजूर पक्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून निवड.

७ ऑगस्ट १९४२ – रोजी भारत सरकारचे मजूरमंत्री या नात्याने माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अध्यक्षतेखाली चौथी (४) मजूर परिषद महायुद्धामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी नवी दिल्ली येथे बोलावली व उद्घाटन केले.

७ ऑगस्ट १९५१ – रोजी माननीय विश्वरत्न, बोधिसत्त्व, प. पू. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदीय वादविवादामध्ये "Parliament – Prevention of Disqualification Bill संसद – अपात्रता प्रतिबंधक विधेयक" यावर चर्चा केली.

७ ऑगस्ट १९९० – रोजी केंद्रातील श्री. व्ही. पी. सिंह यांच्या सरकारने मंडळ आयोगाने २७% आरक्षणाची तरतूद केली आणि इतर मागासवर्गीय लोकांसाठी (OBC) २७% आरक्षण लागू केले.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

☸☸🦚🦚🦚💎 *सविनय जयभीम* 💎🦚🦚🦚☸☸

🌷🔵☸ *रोजच धम्म प्रसार*☸🔵🌷

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय। *लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।*

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं। *परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।*

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. ८ ऑगस्ट २०२४, बुद्धाब्द २५६८, अशोकाब्द २३२८, भीमाब्द १३३, गुरूवारो, सावणो मासो, गुरूवार, श्रावण माहे.

८ ऑगस्ट १९२६ – रोजी राव बहादुर बोले यांनी विधिमंडळात मांडलेला सुधारित बोले ठराव मुंबई विधिमंडळाने पुन्हा संमत केला. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी मुक्तसंचार.

